८८८
इ. ग्रंथ - ७१८

# दैनंदिनी

## ( एक अभिनव वाङ्मयप्रकार )

आ. ८८
२९४

लेखक
प्रा. म. अ. करंदीकर
एम्. ए. पीएच्. डी.

प्रकाशक
श्री समर्थ बुकडेपो.
गिरगांव ट्रॅमनाका, मुंबई ४

सन १९५० ] [ किं. १॥ रु.

# दैनंदिनी

## ( एक अभिनव वाङ्मयप्रकार )

भाषा
११४

भा.
९८

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

सन १९५०

म. अ. करंदीकर

मुद्रकः
न. मो जोशी
हिंद मुद्रणालय, आंग्रेवाडी,
गिरगांव, मुंबई ४

सर्व हक्क स्वाधीन

प्रकाशक
रामचंद्र व्यंकटेश देशपांडे
श्री. समर्थ बुकडेपो
गिरगांव, मुंबई ४

# प्रस्तावना

दैनंदिनी-एक अभिनव वाङ्मयप्रकार-ही पुस्तिका वाचकांच्या हातीं देतांना मला आनंद होत आहे. बॉस्वेलच्या डायरीची माहिती मराठी वाचकांना पूर्वीच झालेली आहे; परंतु इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध झालेल्या इतर दैनंदिन्यांचा किंवा दैनंदिनी या वाङ्मयप्रकाराचा परिचय मराठी वाचकांना अजिबात नाहीं. मराठी भाषेंतील या विषयासंबंधीच्या ज्ञानाची उणीव भरून काढावी येवढाच माझा उद्देश ही पुस्तिका प्रसिद्ध करण्यांत आहे. या वर्षी मुंबई विद्यापीठानें प्रथम वर्षाच्या परीक्षेस सुप्रसिद्ध समाजवादी पुढारी ना. ग. गोरे, यांच्या 'कारागृहाच्या भिंती' या डायरीची संक्षिप्त आवृत्ति नेमलेली असल्यानें त्या अभ्यासाच्या अनुषंगानें ही पुस्तिका मराठींत मी लिहिली आहे. आर्थर पॉन्सॉन्बी याच्या 'इंग्लिश डायरीज' या पुस्तकांतील व त्याच्या इतर ग्रंथांतीलहि माहितीचा उपयोग मी मुख्यतः केला आहे. इतर संदर्भ पुस्तिकेच्या शेवटीं दिलेले आहेत; त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

पुस्तिकेचें प्रकाशन करण्याचें मान्य केल्याबद्दल समर्थ बुकडेपोचे मालक, रा. रा. रा. व्यं. देशपांडे यांचे आणि पुस्तक छापण्यासंबंधांत केलेल्या साहाय्याबद्दल हिंद मुद्रणालयाचे चालक श्री. न. मो. जोशी यांचे मनःपूर्वक आभार मी मानतों. ही पुस्तिका लिहीत असतांना आणि छापली जात असतांना केलेल्या बहुविध साहाय्याबद्दल माझी पत्नी, प्रा. शैला करंदीकर, हिचा पण मी आभारी आहे.

५१ अ तेजपाळस्कीम
विलेपार्लें-पूर्व
मुंबई २४

म. अ. करंदीकर

## आधारभूत पुस्तकांची यादी


1 Samuel Pepys ( E M L series )—A. Ponsonby.

2 English Diaries—Arthur Ponsonby.

3 More English Diaries—A. Ponsonby.

4 Scottish and Irish Diaries—A. Ponsonby.

5 Diary—Edmund Gosse ( Encyclopaedia Britannica ) 11 th Edition

6 Diaries—W. R. Inge ( in Essays by modern writers, Ed. R. W. Jepson )

७ चरित्र, आत्मचरित्र, टीका—जोशी, माचवे.

८ गतगोष्टी—न. चिं. केळकर.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
669

# दैनंदिनी

## स्वतंत्र वाङ्मयप्रकार

### १ डायरी किंवा दैनंदिनी आणि इतर वाङ्मय

दैनंदिनी आणि इतर वाङ्मयप्रकार यांच्या लेखनांत बरेंच अंतर आहे. एक पत्रलेखन वगळल्यास इतर सर्व वाङ्मयलेखनाच्या मुळाशीं एक तऱ्हेची लेखनकलाप्रावीण्याची जाणीव सामान्यतः असते. प्रत्येक वाङ्मयप्रकाराच्या लेखनामागें अशी जाणीव असते हें म्हणणें जरा धाष्टर्याचेंच असलें तरी त्यांत सत्याचा अंश असण्याचा बराच संभव आहे. डायरीलेखनाला मात्र प्रतिभेच्या जाणिवेचीच नव्हे तर अस्तित्वाचीसुद्धां आवश्यकता नसते. ज्याला म्हणून पांढऱ्यावर काळें करतां येतें तो डायरी लिहूं शकेल हें निश्चित. असा हा वाङ्मयांतील एकमेवाद्वितीय प्रकार आहे. आजच्या लोकशाहीच्या काळांत, डायरी लेखनाच्या बाबतींत सर्वजण समपातळीवर येतात ही मोठी समाधानाची गोष्ट म्हटली पाहिजे. पत्रलेखकालाहि लेखनाकरितां कांहीं पूर्वतयारी किंवा प्रतिभा लागतेच असें नाहीं. आतां पतिपत्नी किंवा स्नेहीस्नेही यांच्या पत्रांत कधीं कधीं उत्कृष्ट प्रतीचा प्रतिभाविलास आढळत असेलहि; परंतु तो आवश्यकच आहे कां असा ठाम प्रश्न एकाद्यानें विचारल्यास त्याचें उत्तर नकारात्मकच द्यावें लागेल. हीच गोष्ट डायरीलेखनाचीही होय! कितीही वयाचा व कोणताही मनुष्य डायरी लिहूं शकेल. प्रतिभा आणि लेखनकौशल्य यांच्या अभावीं एखाद्या ग्रंथाकरितां एखादी ओळदेखील लिहिण्यास संकोचणारा मनुष्यसुद्धां मोकळेपणानें डायरी लिहूं शकेल. प्रतिभेचा किंवा लेखनकौशल्याचा अभाव

त्याच्या लेखनाला मारक ठरणार नाहीं, इतकेंच नव्हे तर कित्येक वेळां त्याच्या अस्तित्वाचीच त्याला अडचण होण्याचा संभव असतो. निष्कपटपणा व अकृत्रिमता आणि सरळपणा व प्रामाणिकपणा यांच्या पूर्णतेला प्रतिभा व नैपुण्य हीं अंशतः मारकच ठरतील. प्रत्येक दैनंदिनी ही वाङ्मयगुणांनीं युक्त असेलच असें म्हणणें थोडेंच नव्हे तर फारच कठीण आहे. काहीं दैनंदिन्यांना वाङ्मयांत एक निश्चित स्थान प्राप्त झालें आहे हें खरें तरीहि डायऱ्यांचें मूल्यमापन वाङ्मयीन मूल्यांच्या अनुरोधानें करणें हें नाटकाचें श्रेष्ठत्व वाङ्मयीन गुणांनीं मोजण्याइतकेंच हास्यास्पद आहे.

## २ इतिहास व डायरी

डायरी ही वैयक्तिक अनुभवांची व संस्कारांची रोजकीर्द किंवा दैनंदिन नोंद होय. सर्वच दैनंदिन्या दररोज लिहिलेल्या असतील असें नाहीं. परंतु प्रत्येक लेखकाच्या जीवनांत त्याच्या भावना, लहरी किंवा इतर अनेक कारणांमुळें असे कांहीं कालखंड येतात कीं त्यावेळीं त्याला दैनंदिन नोंद केल्यावांचून रहावत नाहीं. डायरी व इतिहास यांत सहाजिकपणेंच फरक पडतो. तरीही डायऱ्या इतिहासाची सामुग्री निश्चितपणें पुरवूं शकतात; उदाः–इंग्लंडमधील राजकारणी व्यक्तींच्या डायऱ्या, पेशवे, सातारकर छत्रपती वगैरेंच्या रोजनिशा इत्यादींचा इतिहासकारांना झालेला उपयोग अमोल आहे. डायरींत ऐतिहासिक सत्याचें पुनःस्मरण असतें इतकेंच नव्हे तर तत्कालीन अभिरुचि व मतें यांचेंहि दर्शन तींत होतें. इतिहास व डायरी यांतील खरा फरक डायरींतील एखाद्या नोंदीच्या अखेरीस काढलेल्या वैयक्तिक उद्गारांवरून स्पष्ट होतो. उदा० एखाद्या नोंदीच्या अंतीं लेखक लिहितो, "आतां फारच झोंप आल्यानें येथेंच पुरें करतो." हें एकच वाक्य त्याच्या व इतिहासकाराच्या भूमिकेंतील भेद स्पष्ट करण्यास पुरेसें आहे. तत्कालीन घटनांतच गुंगणारा दैनंदिनीलेखक व भूतकालीन घटनांची सर्व सामुग्री गोळा करून तिची संगतवार जुळणी करणारा इतिहासकार यांत दृष्टिकोनांप्रमाणेंच साधनांच्या बाबतींतहि फार अंतर

असतें. एकाचीं सर्व मदार स्वतःचीं ज्ञानेंद्रियें व स्मृति यांवर असते तर दुसरा तात्काळ मत देण्याच्या भरीस न पडतां स्वतःच्या मताला समतोलपणा आणणारा स्मृतिगत व लेखनगत असा दुहेरी पुरावा जमा करीत असतो. डायरीकार काटेकोरपणाकडे कधींच लक्ष देत नाहीं. त्याला स्वतःचें असें मत असतें, इतकेंच नाहीं तर त्याच्या इच्छा, आकांक्षा, लहरी व आवडी-निवडी या सर्वंच वैशिष्ट्यपूर्ण, क्वचित् छांदिष्टपणाच्याहि असतात. त्यामुळें त्याच्या लिहिण्यांत लहरीपणा किंवा तऱ्हेवाईकपणाहि येऊं शकेल; त्यांत कल्पनेलाहि स्वैर वाव मिळू शकेल. इतिहासकाराला मात्र या सर्वांपासून अलिप्त रहावें लागतें; वैयक्तिक वैशिष्ट्याला काट मारावा लागतो. शिवाय प्रत्यक्ष पाहिलेलें किंवा ऐकलेलें लिहिणाराच्या लेखनांत जी गोडी किंवा खुमारी, जो जिवंतपणा किंवा मौज येते तिला इतिहासकार मुकत असल्या-मुळें त्याच्या क्षेत्राचा संकोच होतो, त्याच्या लेखनांत एक तऱ्हेचा त्रयस्थपणा येतो. यामुळेंच दैनंदिनींतील प्रत्यक्ष हकीकतीच्या मानानें इतिहास बचव, फिका, नीरस व निर्जीव वाटतो.

## ३. आत्मचरित्र व डायरी

आत्मचरित्र व डायरी यांतहि साम्यापेक्षां अंतरच अधिक असतें. आत्मचरित्र प्रसिद्ध करण्यासाठींच लिहिलें जातें; उलट डायरी बहुधा प्रसिद्ध करण्यासाठीं नसतेच. स्वतःला विरंगुळा वाटावा म्हणून लिहिणाऱ्या दैनंदिनीलेखकाला, इतरांजवळ व्यक्त न करण्याजोगीं सुखदुःखें, विचार-विकार किंवा विक्षिप्त कल्पना व मतें, दैनंदिनींत स्पष्टपणें व मोकळेपणानें, कोणचाहि आडपडदा न ठेवतां लिहितां येतात. डायरींतील व्यक्ति आत्म-चरित्रांतील व्यक्तीसारखी मध्यवर्ती व एकजीव बनते. आत्मचरित्रांतील व्यक्ति एकतऱ्हेनें डायरींतील व्यक्तीच्या मानानें संकुचित असते. कारण डायरींतील क्षुद्र व तात्कालीक आशाआकांक्षांनीं रंगलेलें व्यक्तित्व अपूर्ण व अंशभागी असतें; उलट आत्मचरित्रांतील व्यक्तित्व संपूर्ण, अविकल, अखंड व बांधेसूद असतें. आत्मचरित्रांत न आढळणारें लज्जातीत अंतरंग

डायरीतच उघड होऊं शकतें. ढोंग व दंभ यांना दोहोंतहि सारखाच वाव मिळूं शकेल हें खरें. परंतु भूमिकाभेदामुळें डायरीलेखक ढोंगधत्तुऱ्याचा अवलंब फारसा करीत नाहीं. दर्शनी भपका व अंतर्दशांतील अडगळ यांत येवढा फरक साहाजिकपणें नेहेमींच रहाणार ! अर्थात् कांहीं विस्मरण होऊं नये म्हणून स्मरणार्थ लिहिलेलीं त्रोटक टाचणें व डायरी यांत महदंतर आहे हें नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. स्मारक टांचणांचा कथनात्मकता हा गाभाच असतो; उलट डायरीला हें सूत्र मुळींच नसलें तरी चालतें. यामुळें डायरी वाचतांना होणाऱ्या विरसाचा अनुभव स्मारक टीपा वाचतांना येत नाहीं; परंतु यामुळेंच डायरींत जिव्हाळा निर्माण करणारा जो भिन्न-भिन्न मानसिक प्रवृत्तींचाहि संघर्ष तो त्यांत आढळत नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. ज्याच्या त्याच दिवशीं लिहिलेली ताजी हकीगत आणि कालांतरानें स्मृतिचित्रांच्या साहाय्यानें लिहिलेला संगतवार वृत्तांत यांत इतपत तफावत पडणें अर्थातच अपरिहार्य आहे. एवढा भेद व दैनंदिनपणा सोडला म्हणजे मात्र आत्मचरित्र, आठवणी व स्मृत्यर्थ टिपणें आणि दैनंदिनी यांत फारच थोडें अंतर शिल्लक उरतें हें मान्य केलेंच पाहिजे.

## ४. पत्रें व डायरी

पत्रें व डायरी यांतहि थोडेंसें अंतर आहेच. दुसऱ्याचीं पत्रें वाचण्यांत जी गोडी वाटते तीच दुसऱ्याच्या डायऱ्या वाचण्यांतहि असते ही अनुभवाची गोष्ट आहे. व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिची किंवा त्याचीं पत्रें परवानगीवांचून प्रसिध्द करण्यांतील नैतिक युक्तायुक्ततेचा प्रश्न टाळल्यास, असले गुप्त कागदपत्र वाचण्यांत मनुष्यमात्राला कांहीं निराळाच आनंद, कांहीं आगळीच मौज वाटते हें निर्विवाद. पत्रें व डायऱ्या यांतील साम्यवैषम्यांचें दिग्दर्शन पुढीलप्रमाणें करितां येईल : पत्रांत मनाच्या नूतन, सद्योजनित व तत्कालिक संस्कारांची नोंद असून त्यांत व्यक्तिव्यक्तींतील रहस्यें व गुपितें प्रगट केलेलीं असतात. जिवलग मित्रांचे हृद्गत; प्रेमळ पतिपत्नींचीं रहस्यें, आणाभाका, कबुल्या, शपथा, पोटउकला, बहाण्या, काय म्हणून त्यांत येत नाहीं ?

नगर वाचनालय, सातारा.



थोडक्यांत उभ्या विश्वांतील रहस्यात्मक पार्श्वभूमि पत्रांतून दृग्गोचर होते. क्वचित् पत्रें डायरीच्या स्वरूपांतहि लिहिलीं जातात. पत्र ज्याच्याकरितां लिहिलेलें असतें तो तें हातांत पडल्याबरोबर वाचतो. यामुळें जें कालांचें अचिरत्व, जो संनिकटपणा, जी निरंतरता निर्माण होते ती पत्रलेखनाच्या बाबतींत महत्वाची असते. ती लेखकावर एक प्रकारें बंधन घालते, एक तऱ्हेची मर्यादा लादते. याशिवाय पत्रांत एक प्रकारची अहंकाराची जाणीव, आत्मनिष्ठा, अहमास्मिता निर्माण झालेली आढळते. कालाच्या नैरंतर्याची जाणीव डायरींत नसली तरी आत्मनिष्ठा मात्र डायरींतसुध्दां आढळते पण ती केवळ प्रसंगोपात असते. उलट दैनंदिनींतील पूर्वापर क्रम पत्रांत पाळला जातोच असें नाहीं. पत्र लिहिणाऱ्यांच्या मानानें डायरीलेखकांची संख्याही फारच कमी आहे. इतकें झालें तरी पत्रें व डायऱ्या यांच्यांत सामान्यतः सारखीच कुतुहलजनकता असते हें मात्र निश्चित. पत्रें ज्याला लिहिलेलीं असतील त्यावाचून इतरांना तीं वाचवतीलच असें नाहीं; हीच अवस्था डायऱ्यांचीही असते. पत्रांकरितां लेखक व वाचक यांची जोडी लागते तर डायरीला वास्तविक एकटा लेखकच लागतो. डायरी दुसऱ्यानें वाचण्याचा संभव असला तरी आवश्यकता वा खात्री मुळींच नसते. मोठ्या लोकांच्या पत्रांमागें जशी तीं कधीं काळीं प्रसिध्द केलीं जाण्याच्या संभवाची जाणीव क्वचित् असते, तशीच डायरीहि कोणाच्या तरी—मग तो प्रकाशक, वाचक वा टीकाकार, कोणीहि असो—दृष्टीस पडावी अशी सुप्त इच्छा दैनंदिनीलेखकाच्या मनांत क्वचित् असेलही. पण सामान्यतः डायरी दुसऱ्याकरितां नसते हेंच खरें. तिच्यांत यामुळेंच शब्दाची सफाई नसते, लेखनप्रकाराची जाणीव नसते, व्याकरणाची कदर नसते किंवा स्पष्टीकरणाची जबाबदारीहि नसते. हीं सर्वच बंधनें झुगारून देऊन दैनंदिनीलेखकाला वास्तव आणि काल्पनिक या दुहेरी पण अनिर्बंध अशा क्षेत्रांत मनाचा वारू सैल सोडूं शकतो आणि या विश्रम्भालापांतच आत्म्याला खरी विश्रांति मिळूं शकते.

वरील सर्व विवेचनावरून दैनंदिनीलेखनास स्वतःचें असें स्वतंत्र स्वरूप आहे हें निर्विवादपणें सिध्द होतें. साहित्यिक, पंडित वा महात्मे डायरी-

लेखनांत नैपुण्य प्राप्त करूं शकतीलच असा भरंवसा मुळींच देतां येत नाहीं. या लेखनप्रकाराला वर्ग, धंदा, वय, कसलाच निर्बंध नाहीं. राजेमहाराजे, शास्त्रीपंडित, व्यापारीउदमी, क्रीडापटू व मल्ल, तत्त्वजिज्ञासू व तत्वज्ञ, म्हातारे व म्हाताऱ्या आणि कुमारी व युवक या सर्वांनाच डायरी लिहितां येईल.

## ५ मराठींतील उद्गम

मराठींत प्रथम डायऱ्या केव्हां लिहिल्या जाऊं लागल्या हें सांगणें फार कठीण आहे. रोजकीर्दी लिहिल्या जात असत हें तुकारामाच्या अभंगांतील पुढील उल्लेखावरून स्पष्ट होतें; "रोजकीर्दी जमा धरून सकळ। खताविला काळ बराबरी" (तुकाराम गाथा १८९४). रोजकाम म्हणून दररोजच्या कामाची नोंद केलेली वही सर्व दप्तरांतून असे व रोजनाम्यांत पण दररोजची हकीकत लिहिली जाई. परंतु हे सर्व रोजनामे उपलब्ध असल्याचें आढळत नाहीं. ज्याला ज्याला लिहितां येत असे तो तो कांहीं-तरी टिपणें करून ठेवीत असेल अशीहि शक्यता आहे. बखरी, हकीकती जशा सांपडतात तशीं असलीं कांहीं प्रकरणें सांपडतीलहि; पण त्या सर्वांनाच डायऱ्या म्हणतां येईल असें नाहीं. वास्तविक रोजचे विचार व मनस्तरंग लिहिणें व आपल्या समोर घडणाऱ्या घटनांची नोंद करणें हा प्रकारच मुळीं अर्वाचीन मानावा लागतो. त्यांत कधीं अंतर्मुखता असेल तर कधीं नसेलहि. माणसाची बौद्धिक उन्नति जसजशी घडून येईल तसतशी त्याची आत्ममानिता त्याच प्रमाणांत वाढून तींतून डायऱ्यांचा जन्म होईल. यामुळेंच डायऱ्यांत मानवी जीवनाच्या मानसिक विकासाचा एखाद। विशिष्ट टप्पा आढळतो, अंतर्मुख होणाऱ्या मानवाच्या सूक्ष्मतर चिंतनशीलतेची साक्ष पटते, व रुंदावत जाणाऱ्या आत्मलक्षित्वाच्या क्षेत्राची प्रचीति येते.

## ६ डायऱ्यांचें 'खासगी' स्वरूप

आपण डायरी लिहीतों हें बरोबरच्यांना सांगण्याचासुध्दां पुष्कळांना संकोच वाटतो. म्हणूनच लेखकाच्या जीवनावधींत त्याच्या डायऱ्या नेहमींच

"खाजगी" रहातात. दुसऱ्याची डायरी वाचण्याची उत्कंठा मित्राला देखील असते. परंतु आपण डायरी लिहितो ही गोष्ट दुसऱ्याच्या लक्षांतसुध्दां येऊं न देणें डायरीलेखनाच्या दृष्टीनें उपकारकच ठरतें. ही डायरीची गोष्ट उघडकीस आल्यास डायरीलेखकाशीं बोलतांना त्याच्या नातलगांना व परिचितांनाच नव्हे तर, त्याच्या स्नेह्यांनासुध्दां, एक प्रकारचा मुग्धपणा येईल, त्यांचा संकोच वाढेल. डायरी लिहिणाऱ्याशीं बोलतांना लोक बिचकतील किंवा बुजतील; ते त्याच्याशीं बोलणें टाळतील तरी किंवा त्यांच्या भाषणांतील मोकळेपणा तरी नाहींसा होईल; त्यांच्या संवादांत आडपडदा आल्यानें सत्यापलाप होण्याचा संभव अर्थातच वाढेल. यामुळें त्याच्या डायरींतून भावी पिढ्यांना मिळणारी विश्वसनीय माहिती अर्थातच मिळणार नाहीं. संवय म्हणून डायरी लिहिणारासुध्दां आपलें डायरीलेखन गुप्त ठेवण्यास झटत असतो. आपण डायरी लिहितां का ? या प्रश्नाला त्याचें नकारार्थीं उत्तर ठेवलेलेंच असतें. त्यांचें डायरीलेखन गुपचूप लोकांच्या ध्यानांत न येईल अशा बेतानें, आंतल्याआंत सुरूं असतें इतकें असूनहि कित्येकदां डायऱ्या कोर्टांत पुराव्यादाखल हजर केलेल्या आहेत, व आजहि केल्या जातात; शिवाय कांहीं लेखकांच्या डायऱ्या त्यांच्या जिवंतपणीं प्रसिध्दहि होतात. परंतु सामान्यतः डायऱ्या या लेखकाच्या मृत्युनंतरच सांपडतात व प्रसिध्द होतात. कधीं कधीं तर त्या सांपडून प्रसिध्द होण्यास त्याच्या मृत्यूनंतरहि कित्येक वर्षें लागतात. कित्येकांना तर त्यांचें लिखाण त्यांच्या मतें वैयक्तिक व खाजगी असल्यामुळें लोकांच्या दृष्टीस सुध्दां पडूं नये असें वाटतें, इतकेंच नव्हे तर तें गुप्त ठेवण्याकरितां ते बुध्दीपुरसर खटपटहि करितात.

## ७ डायरींतून चरित्रें

एकट्या बॉस्वेलच्या डायरीचा उपयोग जॉन्सनच्या चरित्रासाठीं होऊन त्या डायरीलाच पुढें चरित्राचें स्वरूप आलें; परंतु हा प्रकार अनपेक्षित व अपवादात्मकच होय. ही डायरी खुद्द लेखकाचें चरित्र म्हणून प्रसिद्ध न

होतां लेखनविषयीभूत जॉन्सनचें चरित्र या नात्यानें तिचा उपयोग झाल्यानें तिचें स्वरूप पालटलें. जॉन्सनचें सर्वच्या सर्व संभाषण नोंदतां यावें म्हणून बॉस्वेल स्वतः जेवतांनासुद्धां लेखणी कागद घेऊन बसत असे आणि अपरात्रींसुद्धां लिहिण्याचा कंटाळा करीत नसे. आतां "हेब्रिडिसचा प्रवास" एवढाच भाग स्वतंत्रपणें त्याच्या डायरीचा भाग म्हणून उरला आहे. 'टेनिसन–स्मृती' मध्येंहि डायरीचा असाच उपयोग केलेला आहे. मुळांतील कालक्रमानुसारी घटनांच्या नोंदींतील उणीवा दैनंदिनीच्या साहाय्यानें भरून काढलेल्या आहेत.

## ८ डायऱ्यांचें विभाग

डायऱ्यांचें सामान्यतः तीन वर्ग पडतात. १ ल्या वर्गांत थोड्या फार खंडासहित पण सामान्यतः नियमितपणें लिहिलेल्या रोजनिशांचा अंतर्भाव होतो. २ ऱ्या वर्गांत पुष्कळ दिवसांची संगतवार हकीकत एकत्र देणाऱ्या विशिष्ट कालावधीनंतर लिहिलेल्या डायऱ्या समाविष्ट होतात. या लेखनांत कित्येक दिवस, आठवडे किंवा महिन्यांचा देखील खंड पडूं शकतो. ३. या दोन्ही प्रकारचें मिश्रण करून, प्रसिध्दीकरण्याच्या हेतूनें, मुळांतील तारखा जशाच्या तशाच ठेवून, स्वतः ग्रंथकारानें किंवा त्याच्याप्रीत्यर्थ दुसऱ्या कोणी तरी संपादित केलेल्या डायऱ्या तिसऱ्या गटांत येतात. अशा वेळीं मुळांत सुधारणा करून डायरींतील मजकुराचें स्वरूप सलग व कदाचित अधिक वाङ्मयीनसुध्दां करण्याचा संपादकांचा उद्देश असल्यामुळें तिच्यांतील तारतम्यरहित व अविवेकदर्शी भागास सहजच कात्री लावावी लागते.

## ९ दैनंदिन लेखन

डायरी रोज लिहितांना व मोठ्या कालावधीनंतर लिहितांना कित्येक महत्वाचे फरक पडतात. ज्याच्या त्याच दिवशीं लिहिलेल्या डायरींत प्रत्यक्ष त्या क्षणांतील आवेश व जोश दाखवणाऱ्या छटा सांपडतात; कारण

त्या त्यावेळची मनःस्थिति लेखकाच्या लिखाणांत सहजगत्याच प्रतिबिंबित होते व त्या वेळच्या संवेदना व संस्कार हुबेहुब उमटण्यास तीच वेळ अनुकूल असते. उलट कालांतरानें केलेल्या निवेदनांत मूळचा आवेग पुसट होऊन जातो किंवा कधीं कधीं तर संपूर्णपणें नाहींसाहि होतो. शिवाय पानावर दिलेल्या तारखेलाच तो मजकूर लिहिलेला असेल असाहि भरंवसा देतां येत नाहीं. पद्धतशीरपणें लिहिलेल्या डायरींत पुष्कळदां प्रत्यक्ष घटनेनंवर दोनतीन दिवसांनींसुद्धां त्या त्या तारखेला त्या दिवसाची ती ती नोंद केलेली असते. अर्थात् दररोज लिहिलेल्या डायरींतच बिनचूकपणा अधिक प्रमाणांत सांपडेल असेंहि म्हणतां येणार नाहीं. कारण मनाचें घटनेवरील तत्कालीन केंद्रीकरण फारच आवेशपूर्ण व आवेगयुक्त असतें; त्या वेळचा दृष्टिकोनहि मर्यादित असण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें तत्कालीन आभास, हर्षे व कल्पनाहि मनावर पडलेल्या ताणामुळें तेव्हा किंवा विपरीत झालेल्या असतात. वास्तविक डायरींत ऐतिहासिक सत्याचा शोध करावयाचा नसतो तेव्हां तिच्यांतील बिनचूकपणाच्या अभावाला किंवा अस्तित्वाला फारसें महत्व नसेंतच. उलट अधिक विचाराअंतीं ज्या सटरफटर क्षुद्र, तुच्छ, पाचकळ किंवा कुचाळ गोष्टींना कात्री लागली असती त्या गोष्टी डायरी ज्याच्या त्याच दिवशीं लिहिली गेल्यामुळेंच केवळ उपलब्ध होतात. आणि मनुष्यस्वभावांतील विसंगतीची मौज व त्याच्या मनांतील विविध रंगतरंग आपल्याला पहावयास सांपडतात ते, या तथाकथित क्षुद्र गोष्टींतूनच !

## १० अविवेक

पुष्कळदां दैनंदिनीतील अविवेकी भागच तिच्या गुणवत्तेचा घटक ठरतो व त्याला काट दिल्यानें डायरीच्या सर्वच मौजेला ग्रहण लागतें. आत्मचरित्रांचें व चरित्रांचे लेखक आणि डायऱ्यांचे संपादक, पुष्कळदां, जिवंत व्यक्तींबद्दलचीं विधानें बोचक, मानहानिकारक, प्रक्षोभक किंवा मनोभेदक वाटल्यामुळें गाळून टाकतात. पण यामुळें त्या त्या व्यक्तींची रूपरेखाच

समूळ लुप्त होते. फार काय इंग्रजींत प्रसिध्द झालेल्या जुन्या डायऱ्या अधिक मनोरंजक झाल्या त्या असल्या विधानांना कात्री न लागल्यामुळेंच ! आज त्यांतील त्या मजकुराविषयीं संकोच, किंतु अगर विकल्प वाटण्याचें कारणच न उरल्यामुळें तो मजकूर गाळण्याची आवश्यकताच नाहींशीं झालेली आहे. क्वचित् खुद्द डायरीलेखकालाच मानहानिकारक असाहि मजकूर डायरींत आढळणार नाहींच असेंहि नाहीं. अशा वेळीं चरित्रनायकाची नाचक्की होऊं नये या हेतूनें चरित्रकार किंवा संपादक जर असा मजकूर गाळीले तर त्यामुळें मानवी जीवनाचें एक दालन वाचकांना कायमचेंच बंद होईल. शिवाय सत्याची हानी होऊन वर डायरीहि नीरस व फिकी वाटूं लागेल हें निराळेंच. चरित्रनायकाचें विभूतिमत्त्व कमी होऊं नये म्हणून तो स्खलनशील नव्हता, त्याचें आचरण नियमबद्ध व ऋजु असेंच होतें असें भासवणें चरित्रकाराच्या व संपादकाच्या दृष्टीनें महत्वाचें असतें. अर्थातच त्यांमुळें नायकाला मिळणारा सन्मान कमी होऊन त्याच्या लोकप्रियतेला ओहोटी लागेल अशा गोष्टी प्रसिद्ध करण्यास नाखुष असते. पण यामुळेंच डायरींतील थोरपणाला न शोभणाऱ्या अशा पोरकट, गांभीर्यहीन व अप्रशस्त तपशीलाची हकालपट्टी होऊन सत्य व वस्तुस्थिति यांचा लोप होत असतो.

"खाजगी किंवा वैयक्तिक" डायऱ्या अर्थातच प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें लिहिलेल्या डायऱ्यांपेक्षां भिन्न असतात. मेकॉलेच्या मतें डायऱ्या प्रसिद्ध करण्याच्या हेतूनें लिहिल्यास त्यांतील डायरीची म्हणून जी विशिष्ट मोहिनी वा भुलावणी आहे ती निश्चित संपुष्टांत येते.

## ११ दुसरें वर्गीकरण

डायऱ्यांचें पुढीलप्रमाणें वर्गीकरण एका निराळयाच तत्त्वानुसार करतां येईल: ( १ ) ऐतिहासिक दृष्टया मूल्यवान डायऱ्या व ( २ ) मानशास्त्रीय मूल्यानें युक्त असलेल्या डायऱ्या असे ते दोन वर्ग होतील. यांपैकीं दुसऱ्या प्रकारांत डायरीलेखकाची प्रकृति व व्यक्तिमत्व ही अधिक ठळकपणें उमटलेलीं असतात. इंग्रजी टीकेंत 'जर्नल' हा शब्द पहिल्या

...र वाचनालय, ...



म्हणजे पूर्णपणें वस्तुगत अशा शास्त्रीय वा ऐतिहासिक लेखनाच्या द्योतक असून 'डायरी' या शब्दानें वैयक्तिक टिपणें, खुलासे वा फुटकळ शेरे यांचा म्हणजेच दुसऱ्या प्रकाराचा निर्देश केला जातो. अर्थात हेंहि वर्गीकरण निर्दोष नाहीं हें उघडच आहे.

लेखनपद्धति, नियमितपणा व लेखकाची शैली यांवर डायरी लेखनांतील विविधता अवलंबून असली तरी ती अमर्याद असूं शकते. इतिहास, कादंबऱ्या, किंबहुना पत्रेंसुद्धां लिहितांना वाटेल त्या लेखकाचें अनुकरण करतां येईल. डायरीलेखनांत मात्र एखाद्या विशिष्ट शैलीचा आदर्श ठेऊन लिहिणें अशक्यप्राय ठरेल. लेखक अगदीं प्रसिद्ध ग्रंथकारच असेल तर क्वचित् त्याच्या शैलीची प्रतिमा त्याच्या डायरींतहि आढळेल खरी, परंतु एकंदरीत रोज डायरी लिहिणाऱ्याला विशिष्ट शैलीकरितां खटाटोप करण्याकरितां वेळ मिळणें कठीणच जाईल. आधीं त्याला विचार करण्याची आवश्यकता आणि फुरसतहि नसते. सबंध दिवसांत काय घडलें याची स्मृति व त्यांपैकीं काय लिहावयाचें याची निवड येवढेंच काम त्याला करावयाचें असतें. लेखक कधीं त्रोटक, आवेगयुक्त, तर कधीं सविस्तर नोंद करीत असतो. अशा स्थितींत विशिष्ट शैलीचा कटाक्ष ठेवणें दुर्घट असलें तरी व्यक्तीच्या कांहीं वैशिष्ट्यांची छटा मात्र त्याच्या डायरींत आढळल्यावांचून राहात नाहीं.

## १२ डायरीलेखनामागील हेतू

लोक डायऱ्या कां लिहितात हाहि एक विचारार्ह प्रश्न असून त्याचें निश्चित असें एकच उत्तर देणें फारच कठीण आहे. मानवी मनाच्या इच्छा व त्यांचे हेतू, त्याच्या प्रेरणा व त्यांचीं फळें, हीं सर्वच अनंत आहेत. प्रत्येक डायरी सूक्ष्मपणें तपासूनदेखील प्रत्येक डायरीलेखकाच्या हेतूचा पत्ता लागेलच असें नाहीं. यामुळेंच या हेतूविषयीं सामान्य विधान करणें केवळ धाष्ट्यांचेंच नव्हे तर अज्ञानाचेंहि ठरेल. इंग्लंडमधील डायरीलेखनाच्या इतिहासांत लहान मुलांनीं सुद्धां डायऱ्या लिहिल्याचे उल्लेख

आहेत. व्हिक्टोरिया राणी तर वयाच्या तेराव्या वर्षींच डायरी लिहूं लागली! एलिझबेथ फ्रायनें डायरी लिहिण्यास सोळाव्या वर्षी प्रारंभ केला, तर प्रसिद्ध फेनी बूर्नें हिनें वयाच्या पंधराव्या वर्षीं तरी निदान डायरीलेखन सुरूं केलें असावें असें पुराव्यांनें सिध्द झालें आहे. ग्लॅडस्टननें तर ईटनला विद्यार्थीदशेंत असतांना डायरीलेखनाला जो प्रारंभ केला तो मरेपर्यंत सोडला नाहीं. सहाव्या एडवर्डनें बाराव्या वर्षींच डायरीलेखनास प्रारंभ केला असें सांगतात. वयाच्या विसाव्या वर्षीं डायरीलेखनास प्रारंभ करणारे तरूण तर पुष्कळच आहेत. प्रसिध्द डायरीकार पेपिस यानें सत्ताविसाव्या वर्षीं लेखनास सुरवात केली तर बायरननें तिसाव्या वर्षीं केली. नव्वदाव्या वर्षींसुध्दां डायरीलेखनांत खंड न पडलेले अनेक इंग्रज डायरीलेखक आहेत. डायरीलेखनाची संवय एकदां लागली कीं डायरीचें पुढें काय होईल याचे विचार लेखकाच्या मनांत येतच नसतील का असाहि प्रश्न उद्भवतो. कदाचित् विद्यार्थीदशेपासून लागलेली संवय येवढें एकच कारण शेवटपर्यंत डायरी ठेवण्यास पुरें पडतहि असेल. त्याप्रमाणेंच स्वतःच्या यशापयशाचे कित्येक घटक स्मृतिगत करण्यासाठीं मनुष्य जशीं टिपणें, याद्या व जमाखर्च लिहून ठेवतो तसेंच डायरीलेखनहि भविष्यकाळीं पूर्वीचा संदर्भ मिळावा म्हणूनच कांहींनीं तरी केलें असण्याचा संभव आहे. रोजकीर्द, खताबण्या, रोजनामे इ. व्यापारी हिशेबांची एकेरखी गणना ज्याप्रमाणेंच व्यापारी करीत आले आहेत त्याप्रमाणेंच डायरीचेंही आहे. इंग्रजी डायरीलेखकांपैकीं एक तर रोजची नोंद करितांना आदल्या वर्षी त्याच तारखेला आपण काय केलें याचीहि नोंद लक्षपूर्वक वाचीत असे असें सांगतात. मुलांना वळण लावण्याकरितां दररोज डायरी लिहावयास लावणें ही इंग्लंडांत एक शिस्तीची बाब असून ती रोजचा जमाखर्च लिहिण्याइतकीच महत्त्वाची आहे.

## १३ आत्मश्लाघा !

व्यापाराचे जमाखर्च व पाश्चात्य देशांत शिस्तीकरितां मुलांना लावलेलें वळण हीं वगळल्यास आत्मश्लाघा वा आत्मकौतुकाची प्रवृत्ति हेंहि

डायरीलेखनाचें कारण असूं शकेल काय असा प्रश्न येथें विचारा-वासा वाटतो. मुख्य कारण हेंच असावें असेंच पुष्कळांचें मतहि आहे. वास्तविक आत्मनिष्ठ लोक आत्मश्लाघेचे इतर प्रकार वापरीत नाहींत असें थोडेंच आहे ? आणि आत्मश्लाघा मर्यादित प्रमाणांत करणें वा करून घेणें ही वृत्ति दोषरूपहि नाहीं. डायरी हें आत्मश्लाघेचें अभयद्वार आहे आणि डायरी प्रसिद्धीकरणार्थ खरोखरच लिहिलेली नसेल तर ती मर्यादित आत्मश्लाघाहि स्वागतार्हच ठरेल. आत्मश्लाघी मनुष्य हा एरवीं इतरहि कित्येक उपायांचा अवलंब करीत असतो. तो मित्र, बायको, धंद्यांतील वरिष्ठकनिष्ठ यांपैकीं कोणालाही त्रास देईल हें सांगता येणें कठीणच ! आपलें नीरस काव्य वेळींअवेळीं श्रोत्यांना सुनवणाऱ्या कवींची केशवकुमारांनीं थट्टा केली आहे ती या आत्मश्लाघेप्रीत्यर्थच नव्हे कां ?

वास्तविक समाजांतील कल्लोळ व मानसिक दाब यांमुळें ज्याला आपलें मन हलकें करण्यास कोणतेंच स्थान उरलेलें नसतें त्यानें डायरीद्वारा आपलें हृदय शब्दांत व्यक्त केलें तर त्यांत विचित्र तें काय आहे ? डायरीलेखक नुसता आत्माभिमानी नव्हे तर आत्ममग्नहि असतो. डायरी लिहितांना ही आत्ममग्नता व आत्मतुष्टि विसरून किंवा बाजूला ठेऊन तिऱ्हाइताच्या दृष्टीनें स्वतःच्या किंवा इतरांच्या कृत्यांकडे पहाण्याची संधि त्याला मिळते हाहि लाभ लहानसहान नाहीं. या तटस्थ निरीक्षणाचा फायदा इतरांनाहि मिळतोच कारण त्रयस्थाचा भूमिकेवरून परीक्षण करणारा इतरांना अन्याय करील असाहि फारसा संभव नसतो; त्याचा स्वतःच्या समतोलहि यामुळेंच साधतो. केवळ आत्मश्लाघाच नव्हे तर गर्वहि पुष्कळशा डायरी लेखकांत थोड्या फार प्रमाणांत आढळतो. हा गर्व मात्र दुर्गुण म्हणून त्याज्यच होय.

आत्मचरित्रकारांच्या आत्मश्लाघाप्रियतेचा इतका बभ्रा झाला आहे कीं आत्मचरित्रकार हा स्तुतिपाठक मानला जातो. आत्मचरित्रकार बहुधा डायरी लिहिणाराहि असतो व त्या डायरीवरच तो आत्मचरित्राची उभारणी करीत असतो. पूर्णपणें वैयक्तिक असलेल्या गोष्टींचा डंका वाजूं नये म्हणून आत्म-

चरित्राचीं प्रकरणेंच्या प्रकरणें कादंबरीच्या वातावरणांत खपवणारे अनेक साहित्यिक सर्वच देशांत होऊन गेलेले आहेत. असें केल्यानें आत्मचरित्रांत वस्त्रहरण झाल्यानें हेंगाडीं दिसणारी हृदयें बुरख्याखालीं लपवितां येऊन तदनुषंगिक फजिती मात्र टाळतां येते.

आपल्या कृतींपैकीं एकसुद्धा लिहून ठेवण्याजोगी नाहीं असें मानणारा निर्विकार प्राणी निराळाच आढळेल ! तो डायरी ठेवणार नाहीं ! ! क्षणभर आपण त्याला मानवांच्या अत्युच्च कोटींतील एक आदर्श मनुष्य म्हणून बाजूस ठेवूं या. परंतु डायरी न ठेवणारा प्रत्येक मनुष्य अगदी शुकासारखा विरागी किंवा स्वसुखनिरभिलाष नव्हे हें विसरून मात्र चालण्यासारखें नाहीं. डायरी लिहिणारे किंवा न लिहिणारे दोघांचेही आपल्या कृत्यामागील हेतू इतके विविध, अनंत व परस्परविरोधी असतात कीं त्याजविषयीं कोणताहि निर्वाळा देणें फारच कठीण आहे. या दोन्हीहि वर्गांत अत्यंत सात्त्विक व नीच, पारंपरिक व प्रामतिक, स्वतंत्र व रूढिप्रिय, सर्वच तऱ्हेचे लोक सांपडतात.

अशा परिस्थितींत देखील डायरी लिहिण्याच्या हेतूंचा शोध केवळ निष्फळच ठरेल असें नाहीं. संवय किंवा शिस्त आणि आत्मश्लाघा या हेतूंचा उल्लेख वर आलाच आहे. याशिवाय लिहिण्याची उत्कट इच्छा किंवा ‘ खाज ’ ज्यांना आहे त्यांनाहि आत्माविष्काराची प्रबळ इच्छा साहाजिकच होणार, आणि ही इच्छा व्यापक व प्रबळ असल्यानें तिचा परिणाम म्हणूनहि डायरीलेखन होऊं शकेल. त्याचप्रमाणें ज्यांनीं ज्यांनीं महान् घटना पाहिल्या आहेत, ज्यांना ज्यांना मोठ्या व्यक्तींचें सान्निध्य लाभलें आहे, ज्यांनीं ज्यांनीं गमतीच्या प्रसंगाचा उत्कट अनुभव घेतला आहे, त्यांना त्यांना स्वतःच्या अनुभवात्मक प्रतिक्रिया नोंदून ठेवाव्याशा वाटणें अपरिहार्य आहे. या टिपणांचा वा स्मारकटांचणांचा उपयोग इतरांना व्हावा असा त्यांचा उद्देश कदाचित् नसेलहि. इतकेंच काय पण आपल्या कुटुंबीयांना तरी त्यांचा उपयोग व्हावा असासुद्धा हेतु असेल किंवा काय हेंहि ठरवणें सोपें नाहीं. शिवाय केवळ आपले अनुभव शब्दनिविष्ट करणें हाहि उद्देश संभवतोच. हा अनुभव कधीं नुसता काल्पनिकहि असेल. काहींजणांनीं स्वतः प्रत्यक्ष

पाहिलेल्या घटनांचं वर्णन केलें आहेच कीं ! इतर ठिकाणीं याच घटनांचें साग्र वर्णन उपलब्ध होण्याचा संभव त्यांच्या मनाला शिवतसुद्धां नाहीं !

## १४ विश्वनिरीक्षण

जगाकडे कुतूहलपूर्ण नजरेनें पाहून आपले त्यासंबंधींचे विचार व भावना ज्यांना लिहून ठेवावेसे वाटतात तेहि डायऱ्या लिहितात. यांत गर्व किंवा आत्मश्लाघा यांचा लेशसुद्धां नसतो. आपल्या स्वतःचें विश्वरचनेंतील स्थान शोधून आपण आणि इतर मंडळी यांमधील साम्य–विरोध अजमावण्याचें कार्य तो डायरीच्या द्वारा करीत असतो. भूतकाळाविषयीं त्याला आपुलकी वाटत असते, वर्तमानकाळाशीं तो समरस झालेला असतो आणि भूतकाळाविषयींहि साशंकतेचा त्याच्या मनांत लवलेशहि नसतो. म्हणूनच ज्याचा ज्याचा उत्कट संस्कार त्याच्या मनावर होतो तें तें लिहून ठेवणें त्याला आवडतें. आपलेच विचार विशद व्हावे म्हणून मानवी प्रश्नांची उत्तरें न सांपडलीं तरी त्यांच्या जाणीवेमुळें निर्माण होणाऱ्या अडचणींची तरी निदान नोंद ठेवणें त्याला अगत्याचें वाटतें. या जगाच्या तोकड्या प्रवासांत आपण काय पाहिलें, काय ऐकलें, आपणांस काय वाटलें इत्यादींची नोंद करणें आणि स्वतःचे विचार निश्चित व्हावे म्हणून ते लिहून काढणें त्याला अवश्यक वाटतें. भोंवतालची परिस्थिति, स्वतःवर आलेलीं संकटें, त्यांतून करण्याजोगी असलेलीं पण त्यांनीं न केलेलीं कर्तव्यें याविषयींच्या कार्यकारणांचें स्वतःला सुचणारें टिपण करणें त्याला केवळ स्वाभाविकच नव्हे तर पुढें पुढें अपरिहार्यहि वाटत असावें. भक्तांना देवदर्शनानें, गुरुसेवेनें, प्रार्थनेनें किंवा अन्य तऱ्हेच्या उपासनेनें जें समाधान वाटत असेल तेंच त्यांना दैनंदिनीलेखनांत मिळत असणार ! या वृत्तीच्या लेखकांचा कल डायरीच्या प्रसिद्धीकरणाकडे नसतो हेंहि तितकेंच खरें आहे.

## १५ आत्मदर्शन

आपल्यालाच आयुष्याच्या उत्तरकाळीं उपयोगी पडण्यासारखी माहिती, मतें व मानसिक प्रतिक्रिया लिहून ठेवण्यास, किंवा व्यवहारांत भेटणारी

माणसें आणि त्याचें स्वभाव यांविषयीं टिप्पणें करण्यासहि माणूस दूरदृष्टीनें उद्युक्त होतो. आपण विवक्षित वेळीं कोणकोणत्या प्रवृत्तींच्या संघर्षांतून गेलों, कोणत्या संकटांतून नेमकें काय करून पार पडलों, त्यावेळीं आपलें कर्तृत्व व पराक्रम, भीरुता व लज्जा, लैंगिक व धार्मिक भावना कशा व किती पमाणांत प्रकट झाल्या, आपल्याला कोणकोणते विचार व तत्वज्ञान सुचले इत्यादींची नुसती स्मृतीदेखील पुष्कळ वेळां सुखदायी ठरते. आपण स्वतःला विसरलेलों असतांना, तेंच जीवन पुन्हा स्मरणानें जगण्याची आणि अनुभवण्याची उत्कंठा ज्या मानानें उत्कट, त्या मानानें डायरीवाचनाचा आनंदहि श्रेष्ठ प्रतीचा ठरतो; आणि याच आनंदाचें बीज डायरीलेखनांतहि असतें. सदर लेखक स्वतःकरतांच लिहितों परंतु तशी स्पष्ट जाणीव त्याला प्रत्यक्ष लिहितांना असतेच असें नाहीं. तो केवळ पाहिलेलें दृश्य व ऐकलेलें श्राव्य सांठवून ठेवतो, त्याचा संग्रह करतो; त्यांतील कांहींहि गमवावयाची त्याची तयारी नसते. आपलें भावनात्मक चित्र भावी काळीं आपल्या मुला-बाळांना व वंशजांना वाचायला मिळावें हा विचार प्रामुख्यानें त्याच्या मनांत असतो. स्वतःच्या मित्रांपासूनच नव्हे; तर पतीपासून किंवा पत्नीपासूनहि जी डायरी व्यक्ति लपवूं पहाते तीच आपल्या वंशजांनीं वाचावी आणि आपलें चित्र त्यांच्यापुढें उभें रहावें हा, केवळ इतकाच, आत्मगौरवाचा भाग त्याच्या मनःचक्षूपुढें असतो. आणि याच मनोराज्यांत गुंग होऊन तो लिहीत असतो. समकालीनांनीं आपली जी किंमत केली, आपल्या वाट्याला त्यांच्यापासून जो मानसन्मान आला त्यापेक्षां आपली अधिक बरी संभावना भावी पिढी करील अशी त्याची श्रध्दा असते. या श्रध्देवाचून तो लिहिणारच नाहीं. आपल्या स्वतःचें जें आपल्याविषयी मत तेंच आपल्या वंशजांचें व्हावें या हेतूनें प्रांजलपणें आपली सर्व भावनिक सामुग्री भावी पिढीकरतां एकत्रित करून ठेवण्याची धडपड तो सतत करीत असतो. भावी पिढी आपल्याबद्दलचें मत समकालीनांपेक्षां अधिक सौम्यपणानें, समजुतदारपणानें व कदाचित् प्रेमानेंहि बनवील अशी त्याची प्रामाणिक समजूत असते. लेखकानें लिहिलेल्या मजकुरांत अप्रामाणिकपणाचा दोष येण्याचा कितपत संभव आहे हें त्याच्या मनोवृत्तीनुसारच ठरवावें लागेल.

[library stamp]

## १६ वाचक पाहिजेच

अशा डायऱ्यांत अर्थातच त्या कुणीतरी वाचील ही अपेक्षा सुप्त असण्याचा संभव असतो. मग तो वाचणारा स्वतःच्या वृद्धापकाळांतील स्वतः लेखकच असो, त्याचे कुटुंबीय असोत, स्नेही असोत किंवा इतर कोणी समानधर्मे असोत. कदाचित् समाजालाच ती माहिती मिळावी असाहि त्याचा गर्भित हेतु असेल. कधीं कधीं या हेतूची जाणीव लेखकाला नसण्याचाहि संभव आहे. पण बहुधा कोणीतरी वाचक मिळावा या हेतूनें लिहिलेल्या डायऱ्याहि बऱ्याच असतात. अशा तऱ्हेचें निश्चित अनुमान काढतां येण्यासारखा पुरावा पुष्कळशा पाश्चात्य डायऱ्यांतून आढळतो. आपल्या मृत्यूपूर्वी स्वतःच वाचून डायऱ्या फाडून वा जाळून टाकल्याचीं उदाहरणें असण्याची शक्यता दिसत नाहीं. जॉन्सननें मात्र आपली डायरी आपणच जाळणारा आपला एक मित्र असल्याचा निर्वाळा दिला आहे. मृत्युपत्रांतहि डायऱ्यांसंबंधींचे उल्लेख अवलोकनांत येत नाहींत.

डायरीला वाचकांचा लाभ व्हावा किंवा नाहीं या प्रश्नाचें उत्तर देण्यास मानसशास्त्रीय विवेचनाचा फारसा उपयोग होणार नाहीं असें वाटतें; कारण स्वतःलाच बदनामीकारक ठरणारा मजकूर लिहिणारे हरीचे लालहि थोडथोडके नसतात. स्वतःच्या भल्याबुऱ्या वासनांचें पृथक्करण करणें, स्वतःच्या कृत्यांची निष्ठुरपणें छाननी करणें, अंतर्मुख होऊन मनांतील सुप्त आकांक्षांचें पापुद्रे उलगडून पहाणें, आणि स्वतःच्या हेतूंचा गुप्त आविष्कार करणें हे लेखकाचे पुष्कळदां हेतू असतात. अश्लील व ग्राम्य विचार, लैंगिक वासना, स्वतःचीं दुष्कृत्यें व स्वतःचें समर्थन यांचा समावेश वरील प्रकारच्या निवेदनांत येईल. वास्तविक स्वतःच्याच दुष्कृत्यांचा पाढा वाचणें एकंदरींत कठीणच ! पण कांहीं व्यक्ती तो निदान डायरीपुरता वाचूं शकतात हे निश्चित. वास्तव परंतु सिद्ध करण्यास कठीण अशा तक्रारी, व्यावहारीक दृष्ट्या न्याय्य परंतु आपणांस अन्याय्य वाटणाऱ्या घटना यांचाहि उल्लेख लेखक करूं शकेल. कागाळ्या, नालस्ती, तोहमत, गाऱ्हाणें व कटकट

यांनाहि डायरींत स्थान मिळेल, कधीं केवळ स्वतःचीच कींव आल्यामुळें आत्मदुःखनिवृत्त्यर्थहि डायरीलेखक लिहील तर कधीं स्वतःचें आचरण पुनर्वाचनानें सुधारावें, स्वतःला शिस्त लागावी हाहि हेतु त्याच्या मनांत असेल. कदाचित् आत्मगौरवाच्या भावनेचें कोड पुरवण्याकरितांहि तो लेखणी उचलील.

## १७ अंतर्दर्शी डायऱ्या

आंतर मनांत दबून राहिलेल्या अवाच्य विषयवासनांना निरंकुश वाव देऊन मोकळ्या सोडण्याकरितांहि डायरीचा उपयोग केलेला पुष्कळदां आढळतो. या अश्लील उद्गारांवरून निदान लेखकाच्या प्रामाणिकपणाची तरी साक्ष पटते. भावी पिढीला आपल्या अंतरंगाचें नागडेंउघडें निरुपाधिक दर्शन घडावें अशी बेपर्वाईची इच्छासुद्धां कांहीं डायरीलेखकांत आढळते. असलीं विधानें नेहेमींच स्पष्ट व निश्चित नसतात. बरेच वेळां तीं मोघम व सामान्य स्वरूपाचीं असतात. त्यांत कधीं आत्मस्तुतिसुध्दां असते व तें स्वाभाविकहि आहे. पण त्यांत जेव्हां आत्मनिंदा आढळते तेव्हां मात्र आश्चर्य वाटतें. त्यांत स्वतःचीच अपकीर्ति करून निःस्पृहतेचा किंवा मोठेपणाचा आव आणण्याचा हेतु असतोच असेंहि म्हणतां येणार नाहीं. तसेंच तो तसा नसतोच असाहि निर्वाळा देणें कठीणच. स्वतःचे गुन्हे मान्य करून, दोषांचें भरपूर माप स्वतःच्या पदरांत घेऊन, नंतर मात्र आपण साधुत्वानें वागूं लागलों असें ढोंग करणाऱ्या व्यक्ती जगाच्या इतिहासांत विपुल आहेत. त्यांपैकीं कांहीं खरोखरच सन्मार्गालाहि लागलेल्या दिसतात. उलट कांहींचा भोंदूपणा इतका उघडा असतो कीं त्यांचें निवेदन अप्रयोजकच नव्हे तर किळसवाणेंहि वाटतें. पहिल्या प्रकारचे लोक स्वतःच्या दोषांच्या जाणिवेनें खरोखरच पश्चात्तापदग्ध झाले असून त्यांचा वर्तन सुधारण्याचा प्रयत्न सावधगिरीचा व प्रामाणिक असतो असें सामान्यपणें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रत्यक्ष दोषांचा उल्लेख तो आपल्या लहरीनुसार स्पष्टपणें करो किंवा न करो. परंतु त्याचा पश्चात्ताप त्याच्या प्रामाणिकपणाची साक्ष देत असल्यामुळें त्याच्या चांगुलपणाबद्दल शंका घेण्याचें अगदीं चोखंदळ वाचकाला

सुद्धां कारण नसतें. मात्र त्यानें केलेल्या अपराधाची नेहेमींच दोषांत गणना होत असल्यामुळें या अंतर्मुख डायरीलेखनांत एक तऱ्हेचा न्यूनगंड निर्माण होतो किंवा कसें याची चर्चा मात्र मानसशास्त्रदृष्ट्या मनोरंजक ठरेल. टॉलस्टॉय, आमील ( Amiel ), मारी बॅशकीर्टसेफ इत्यादींच्या डायऱ्या अशा अंतर्मुख वृत्तीच्या आहेत. इंग्रजींत मात्र हेडन व बर्बेलियन यांव्यतिरिक्त अंतर्मुख डायरीलेखक फारसे नाहींत.

## १८ स्वसंवित्

अंतर्मुखतेनें डायरी लिहिणारे स्वतःच्या खऱ्या स्वभावाचें दिग्दर्शन घडवूं शकतील असें मात्र नाहीं. अर्थात् एवढ्यानें त्यांच्या सत्यप्रियते-बद्दल किंवा प्रामाणिकतेविषयीं शंका घेण्याचें मुळींच कारण नाहीं.

पेपिसविषयींचीं भिन्न भिन्न शतकांतील मतें आणि त्याची डायरी प्रसिद्ध झाल्यानंतर झालेलें मत यांतील अंतर ध्यानांत घेतां डायरीद्वारा खरेंखुरें व्यक्तिचित्र मिळणें किती दुरापास्त आहे याचा प्रत्यय येतो. बुद्धिपुरःसर केलेल्या सहेतुक आत्माविष्करणांत कोणत्या घटकांना व किती प्रमाणांत कमीअधिक उठाव मिळाला असेल तें सांगणें दुर्घट आहे. मधून मधून आत्मनिष्ठा जागृत होऊन काहीं भागाला कृत्रिमता येईल अगर वास्तवाची हानीहि होऊं शकेल. म्हणूनच सहेतुक व बुद्धिपुरः-सर मारलेल्या शेऱ्यापेक्षां लिहिण्याच्या ओघाओघानें आलेल्या सहजस्फूर्त व प्रासंगिक उद्गारांतून दृग्गोचर होणारें व्यक्तिचित्रच अधिक सत्य व प्रांजल असण्याचा संभव जास्त. इंग्रजींतील टॉम्लिन्सनच्या डायरीकडे या सिद्धा-न्ताच्या निदर्शनार्थ बोट दाखवतां येईल.

आपल्याला लोकांपेक्षां आपणच चांगलें ओळखतों अशी घमेंड प्रत्येका-लाच असते. खरें पहातां मात्र आपली स्वतःविषयींची कल्पना बरीच अपूर्ण व कांहींशीं अर्धवटच असते. आपलें अंतरंग आपणास अधिक चांगलें कळूं शकेल हें मान्य करूनसुद्धां आपल्या अंतरंगाचें संपूर्ण व सत्य चित्र आप-णासमोर येऊं शकेलच असें म्हणतां येणार नाहीं. आपल्या सर्व विविध वृत्ती

समजून घेऊन त्यांचें शब्दचित्र काढणें वाटतें तितकें सोपें मुळींच नाहीं. शिवाय आपण आपल्या अंतश्चक्षूला जसे दिसतों त्यापेक्षां फारच निराळ्या स्वरूपांत लोकांच्या दृष्टीला दिसत असतों. दुसऱ्यांच्या ध्यानांत मुळींच न येणाऱ्या गोष्टींबद्दल आपल्याला आपुलकी वाटत असते तर उलट लोकांच्या नजरेंत हरघडीं ठळकपणें भरणाऱ्या गोष्टींचा आपल्याला थांगपत्ताहि लागत नाहीं. कॉलेजांतील विद्यार्थ्यांना प्राध्यापकांच्या नकला करतांना प्राध्यापकांनीं पाहिलें म्हणजे त्यांना या विधानाचा प्रत्यय येतो. विद्यार्थ्यांच्या दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या विशिष्ट गोष्टींवरूनच ते प्राध्यापकाचें चित्र वठवीत असतात. पुष्कळ दिवसांनीं परदेशाहून आलेला गृहस्थ आपल्या पाठमोऱ्या स्नेह्याला त्याच्या चालण्याच्या विशिष्ट लकबीवरून ओळखूं शकतो. उलट त्या स्नेह्याला मात्र या विशिष्ट लकबीची मुद्दाम सांगितल्यावांचून जाणीवसुद्धां नसते ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. आपली हालचाल, नजर, मुद्रा, हातवारे बोलणेंचालणें यांतील आपल्याला कल्पनाहि नसलेल्या वैशिष्ट्यांवरून इतरेजन आपणांस चटकन ओळखूं शकतात, हा अनुभव तर नित्याचाच आहे. अर्थात् हीं बाह्य वैशिष्ट्यें एकत्र करूनसुद्धां संपूर्ण व्यक्तिचित्र तयार होऊं शकत नाहीं; आणि म्हणूनच इतरांच्या ध्यानांतहि न आलेलीं स्वतःचीं वैगुण्यें लेखकानेंच लिहून काढल्यास व्यक्तित्वाच्या नवीन छटा प्रकाशमान होऊन व्यक्तिचित्राला अधिक पूर्णता व उठाव येतो.

## १९ आत्मवंचना

डायरीलेखकाचें आत्मवंचन हें त्याचें फार मोठें वैगुण्य होय. बायरन् आपल्या डायरींत म्हणतो, “ माणूस इतरांपेक्षां स्वतःशींच स्वतःसंबंधीं अधिक खोटें बोलतो.” “ मी मानसिक वैशिष्ट्यासंबंधीं लिहीत नाहीं; तसें लिहिणें अत्यंत सोपें आहे; परंतु तसें प्रामाणिकपणें लिहिणें मात्र जवळजवळ अशक्य आहे; ” हे ग्लॅड्स्टनच्या डायरींतील उद्गारही चिन्त्य आहेत ! स्वतःचें उणेंदुणें दाखवून आत्मनिंदा करणें किंवा स्वतःचें घडमलें दाखवून आत्मसमर्थन करणें हा प्रकारच इतका कृत्रिम आहे की त्या

क्लृप्तीचा अवलंब एकीकडे करीत असतांनाच दुसरीकडे लेखक स्वतःच्या व इतरांच्याहि सत्यान्वेषणांतच मुळीं विघ्न निर्माण करून ठेवतो. आपण दिसतों त्यापेक्षां बरें आहों हें सिद्ध करण्याचा हा प्रयत्न पुष्कळ वेळां आत्मनिंदा, स्वतःची अप्रतिष्ठा व आत्मावहेलना यांच्या साहाय्यानें यशस्वीहि होतो.

## २० अंतर्दर्शी डायऱ्यांचा उपयोग.

अंतर्मुखतेनें लिहिलेल्या डायऱ्यांत अगदीं अनपेक्षित असे विशेष उघडकीस येतात आणि त्यांत जो जिव्हाळा अनुभवाला येतो त्यामुळें त्या मनोरंजकहि होतात. त्यांतील छोट्यामोठ्या गमतींनीं व मतांनीं लेखकाच्या व्यक्तित्वावर जो छायाप्रकाशाचा खेळ चालतो त्यामुळें लेखकाच्या स्वभावाच्या विविध रंगछटांना उठाव येतो. मनांतून सहजगत्या निघून जाणाऱ्या अनिष्ट गोष्टी लिहून ठेवल्यानें मनांत पक्कया होतात, इतकेंच नव्हे तर त्या इतरांच्याहि स्मरणांत वज्रलेप होण्यास साहाय्य होतें. क्वचित् त्यांची मनावर कायमची पकडहि बसूं शकते. त्याचप्रमाणें कांहीं अति क्षणभंगूर व बिनटिकाऊ वा बिनबुडाच्या विचारांना स्थिरताहि अशा लिहिण्यानेंच प्राप्त होते हाही एक तोटा त्यांत असतो. शिवाय अशा उल्लेखांमुळें मनाला एक प्रकारचा रोगटपणा किंवा विकृतीहि जडण्याचा संभव असतो हें निराळेंच. यामुळें व्यक्ति स्वतःच्या परिस्थितीशीं मिळतें घेऊं शकत नाहीं, त्यामुळें नेहमीं उदास व चिरचिरी मनोवृत्ति त्या व्यक्तींत निर्माण होते. इतकेंच नव्हे तर जगाबद्दल उद्वेग व चीडही वाटूं लागते. हा प्रकार नुसत्या वस्तुस्थितीचेंच चित्र काढल्यानें टाळतां येईल. उलटपक्षीं स्वतःचीं मतें प्रकट केल्यामुळें कमालीची अशांतता विनाकारण निर्माण होईल. व अनिर्बंध, वायफट व बेताल विचारांना नसतें नांवरूप, महत्व व चिरंतनत्व प्राप्त होईल. कांहींच्या मतें मात्र लेखकाच्या मतांवाचून लिहिलेल्या डायऱ्या म्हणजे केवळ जमाखर्चाच्या जंत्र्या किंवा याद्यांच्या स्मरणवह्याच होत. इतक्या त्या त्यांना निर्जीव, नीरस व मानवताहीन भासतात. ज्यांत व्यक्तित्वाच्या विकासाचें प्रत्यक्ष दर्शन घडेल त्याच डायऱ्या

चिरकालीन महत्वाच्या होतात; त्यामुळें त्यांत लेखकाचा रागलोभ, रोगटपणा वा व्यक्तिद्वेष प्रकट झाला तरी हरकत नाहीं असेंच वाङ्मयाचा खरा विद्यार्थी म्हणेल. आणि निव्वळ वस्तुस्थितीची व्यक्तिरंगरहित नोंद करणारी डायरी पूर्णतया नीरस ठरेल यांत शंकाहि नाहीं. संपूर्णपणें व्यक्तित्वपूर्ण व पूर्णतया वस्तुनिष्ठ अशा दोनहि तऱ्हेच्या डायऱ्या आज उपलब्ध झालेल्या आहेत. व्यक्तिनिष्ठ डायऱ्यांतील लेखनपद्धतीमुळें म्हणा किंवा त्यांतील वैयक्तिक मतांच्या वैचित्र्यामुळें म्हणा तसल्याच डायऱ्या अधिक मनोरंजक ठरतात व तसलाच मजकूर लेखकांनीं लिहावा असें वाचकांस वाटतें. हा मजकूर वाचकांसमोर न येण्याला लेखकाच्या नाखुषीप्रमाणें वा अनिच्छेप्रमाणेंच त्याचा संकोचहि कारणीभूत होतो. आपल्याला आलेले विविध उपरोधिक, खोंचदार भेदक व तीव्र असे सर्वच संस्मरणीय अनुभव इतरांपुढें मांडतांना स्वाभाविक-पणेंच लेखक संकोचानें कानकोंडा होतो. क्षणिक दुराग्रहानें अतिरंजित झालेले स्वतःचे संस्कार, विचार आणि विकार लिहावेच असें मानणारे लेखक फारच थोडे असतात. आपली तात्कालीक मतें कालांतरानें बदलण्याचा संभव असल्यानें त्यांची निकडीनें नोंद करूं नये असें खुद्द लेखकालाच वाटण्याचा संभव असतो. कधीं विशिष्ट दोन घटनांसंबंधीं लेखकाची प्रतिक्रिया त्या घटनांच्या परस्पर संबंधाची निदर्शक ठरणार नाहीं तर कधीं लेखकाला भासमान होणारा संबंध त्या दोन घटनांत मुळांतच असणार नाहीं. क्वचित् लेखकाच्या तर्कटांत विसंगति, अनन्वय, अशुद्धता किंवा असंभाव्यता देखील आढळेल. याच भीतीनें लेखक स्वतःचे विचार, विकार वा मतें व्यक्त करणार नाहीं व त्याबद्दल त्याला दोषहि देतां येणार नाहीं. कारण लेखकाचा उद्देश प्रमाद टाळून बिनखोडपणा आणण्याचाच असतो. आणि ही सावधगिरी मानवतेच्या हिताला उपयुक्तच नव्हे तर आवश्यकहि असते.

## २१ डायरी न लिहिणारे

डायरी लिहिणारा व न लिहिणारा यांच्यांतील मानसिक अंतर स्पष्टच आहे. स्वतःसंबंधीं, स्वकीयांविषयीं व इतरांबद्दल मनाच्या अगदीं आंतल्या

कप्प्यांतील खाजगी गोष्टी लोकांना उघडपणें आणि प्रकटपणें सांगणें एकाद्याला आवडणार नाहीं इतकेंच. एरवीं बाह्यतः वरील दोन्ही वृत्तींत अंतर तें काय असणार ? हा निव्वळ मानसिक प्रगतीचा किंवा विकासाचा प्रश्न असून वेष, वागणूक, लकबी इत्यादि बाह्य बाबींत डायरीलिहिणारा व न लिहिणारा यांच्यांत थोडासुद्धां फरक आढळणार नाहीं.

## २२ डायऱ्यांतील संक्षिप्त नोंदी

तसें पाहिलें तर दैनंदिनीलेखकालाहि आपला प्रत्येक विचार नोंदून ठेवणें अशक्य होईल. त्याच्याहि स्मरणशक्तीला मर्यादा असतेच ना ? सामान्यतः प्रमुख गोष्टीच ध्यानांत राहून त्यांचीच नोंद केली जाते. कधीं कधीं तर एकादेंच साधेंसें वाक्य किंबहुना एखादा शब्दच एखाद्या दिवसाच्या नोंदीदाखल लिहिलेला आढळतो. घरांतील किंवा समाजांतील जन्ममृत्यु-विवाहासारखे प्रसंग, मेजवान्या किंवा इतर सामाजिक उत्सव, मोठाले प्रवास किंवा जिव्हाळ्याच्या भेटीगाठी इत्यादींसारख्या महत्वाच्या संधीला देखील मोठासा तपशीलयुक्त मजकूर न लिहितां एखाददुसरें वाक्यच लिहिलेलें आढळून येतें. रात्रीं जेवढें आठवेल व सुचेल तेवढेंच दैनंदिनींत लिहितां येतें. एखादें दिवशीं कांहींच विशेष असें घडलें नसल्यास त्या तारखेचें पान कोरेंच सोडावें लागतें. शिवाय कधीं विचाराच्या प्रवाहाला तीव्रताच नसते, तर कधीं लेखक दमलेला असतो. कधीं कधीं तर जीवनकलहाच्या धकाधकींत त्याला वेळच मिळत नाहीं. साहाजीकच त्या तारखेखालीं फार तर एखादेंच वाक्य मुष्किलीनें नोंदलें जातें.

## २३. डायऱ्यांतील विषय.

डायरींत कोणते विषय येतील व कोणते नाहींं हें सांगणें फार कठीण आहे. मानव हा अनंत घटनांच्या भोंवऱ्यांत सांपडलेला असतो व त्याच्या प्रतिक्रियाहि तशाच अनंत असतात. तज्जन्य विषयांचें वर्गीकरण शारीरिक व मानसिक अशा दोन गटांत ठोकळ मानानें, करितां येईल. पुष्कळशा

डायऱ्या वाचल्यानंतर विषयांची अधिक सूक्ष्म वर्गवारीहि करतां येईल. त्यांत प्रामुख्यानें खालील विषयांचा समावेश करावा लागेल; १. आरोग्य, २. हवामान, ३. खाद्यपेयें, ४. घरगुती बाबी, ५. धर्म, ६. दृश्यें व देखावे, ७. प्रवास, ८. सभासमारंभ, ९. वाचलेलीं पुस्तकें व त्यावरील टीका, १०. कपडेलत्ते, ११. अपघात, १२. सामाजिक, राजकीय व इतर सार्वजनिक घडामोडी, १३. लढाया, १४. खेळ व व्यायाम, १५. उपजीविकेचा व्यवसाय, १६. गमतीच्या गोष्टी, चुटके किंवा उतारे, १७. गप्पागप्पा व कंड्या.

वरील यादींत सामान्यतः बहुतेक विषय अंतर्भूत होतील, परंतु सर्व विषय मिळून इतकेच असें म्हणतां येणार नाहीं. पुढें या विषयांसंबधींचा विचार प्रामुख्यानें केलेला आहे.

## २४ शरीरप्रकृति.

स्वतःच्या प्रकृतीसंबंधानें लिहिणं बहुधा सर्वच डायरीलेखकांना आवडतें हें साहाजिकच म्हटलें पाहिजे. स्वतःला चावलेल्या माशांपासून तों पडसें, खोकला, पित्तप्रकोप, मस्तकशूल, अंगदुखी इ. सामान्य व असामान्य तक्रारी डायरींत वारंवार लिहिलेल्या आढळतात. लहानसहान दुखणीं येतील त्याच दिवशीं त्यांचा उल्लेख सामान्यतः अटळ असतो. दोन तीन दिवस लोटल्यानंतर मात्र ती क्षणिक बाधा वा विकृति नाहींशी झाल्यानें त्यासंबंधीं कोणींच लिहीत नाही. उलट शस्त्रक्रिया, दीर्घकालीन आजार, कमालीची मानसिक अस्वस्थता इत्यादींचा उल्लेख कालांतरानें कां होईना पण डायरींत येणार हें निश्चित. शस्त्रक्रिया किंवा दीर्घ आजार यांमुळें कांहीं दिवस तरी जीवनाला निष्क्रियता येते, नित्याच्या कार्यक्रमांत खंड पडतो व रोजचे व्यवहारहि स्थगित झाल्यासारखे होतात. कांहींजणांना कदाचित् स्वतःच्या आजारीपणाचें समाधानहि वाटत असेल, ते त्या अगतिकत्वांतच सुख मानीत असतील, तर त्यांना त्यांतच आनंदहि होईल. त्यांना आपल्या आजाराचा बारिकसारीक तपशील, लहानसहान चढउतार, क्षुद्रतम फेरबदल

दैनंदिनी. म.अ.कुरंदीकर



आ. ८८

महत्वाचे वाटूं लागून तो त्यांतच रमेल. साहाजिक त्याला त्यांविषयीं लिहि-त्यावांचून राहवणार नाहीं. अशा लिखाणांतून तत्कालीन औषधांची माहिती मिळते इतकेंच नाहीं तर रेंगाळणारे असे कित्येक लोकभ्रम व पूर्वग्रह यांची देखील प्रचीती येते. अशा स्वरूपाचे शारीरिक आरोग्याचे व अनारोग्याचे उल्लेख मोठ्याच प्रमाणांत डायऱ्यांतून आढळतात. डायऱ्यांतून डॉक्टर लोकांनीं केलेल्या दैनंदिन आरोग्याच्या टांचणांचा धंद्याचा दृष्टीनेंसुद्धा मोठाच उपयोग रोग्यांच्यां होऊ शकेल.

आंक ५५८

## २५. हवापाणी.

संख्येच्या दृष्टीनें आरोग्याच्या खालोखाल हवापाण्याच्या उल्लेखांचा अनुक्रम लागेल. निरभ्र आकाशाचा आनंद व दुर्दिनजन्य उदासपणा हे सार्वत्रिक अनुभवाचे विषय आहेत. या वृत्ती इतक्या पुरातन आहेत कीं महाकवींच्या काव्यांत त्यांचीं वर्णनें सर्वत्र आढळतात. विशिष्ट दिवशीं पडलेला पाऊस जर पडला नसता तर लेखकाचीच नव्हे तर बाह्य विश्वा-चीच स्थिति व वृत्ति पालटली असती असें कोणीहि म्हणूं शकेल. आजचा पाऊस म्हणून आजच त्याचें महत्व. उद्यां त्याचें काय होय ? यामुळेंच अशा हवामानविषयक नोंदी डायरींत येणें अपरिहार्य होतें. या नोंदी रोज दैनंदिनी लिहिणाऱ्याला दैनंदिन हवापाण्याचें महत्व किती वाटतें याच्याच निदर्शक असतात. हवेच्या मनावरील परिणामाच्या उत्कंठतेचा अनुभव सर्वसामान्य असल्यामुळें त्याविषयींच्या नोंदींना वैयक्तिक लहरीचें स्वरूप राहूंच शकत नाहीं. नाविक दैनंदिन्या फारशा उपलब्धच नाहींत म्हणून, नाहींतर त्यांतील व आधुनिक वैमानिकांच्या डायऱ्यांतील हवामानाचे उल्लेख विशेषच महत्वाचे ठरले असते यांत मुळींच शंका नाहीं. अशा डायऱ्यांत वादळें व झंझावात, थंडी व उन्हाळा, शुष्क हवा व हिमवर्षाव इत्यादि उल्लेख क्रमप्राप्तच ठरतील. भूकंप, धूमकेतु व पूर यांसारख्या लहानमोठ्या आधिभौतिक अरिष्टांची नोंदहि यांतच सापडूं शकेल.

नगर वाचनालय सातारा वाचनालय, सातारा.
संगणकीकृत

## २६. अन्नपान

भोजन व खाद्यपेयें वगैरेंचा उल्लेखहि पुष्कळच डायऱ्यांतून आढळतो हेंहि मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. आकंठ मधुर भोजनाचा आनंद हा कामानंदाखालोखाल इतर सर्व दैहिक आनंदाइतकाच किंवा त्याहूनहि अधिक उत्कट असतो. अन्नाची रुचि, स्वाद आणि घमघमाट, खाद्यांचे प्रकार व रंग, त्यांतील विविध व्यञ्जनांची समर्पकता, वाढणाऱ्यांचें चातुर्य, आग्रहाची खुमारी व आवडीनावडींचें कोडकौतुक इत्यादींचा ठसा मनावर कायमचा उठून रहातो. बोंचक शब्दांप्रमाणें चमचमीत भोजनहि माणसाच्या स्मृतींत कायमचें घर करून रहातें. अन्नजन्य स्नेह हा इतर सर्व स्नेहांच्या पलीकडचा असतो हा सर्वांचाच अनुभव असेल. तज्जन्य संबंधांना एक तऱ्हेची चिरकालीकता प्राप्त होते. मनुष्य हा अन्नाचा दास असल्यानें त्याला अन्नग्रहणानंतर साहाजिकच जी कृतज्ञता वाटते तीमुळें सख्य दृढतर होतें. आत्यंतिक सख्याची परिणति जशी विवाहांत तशी अन्नग्रहणाची परिणति निरंतर मैत्रींत होत असते. त्यामुळें मैत्रीचे लागेबांधे बळकट होतात, किल्मिषें दूर होतात व मनामनांचा मेळ बसतो. अन्नाचे हे गुण व त्याची आवश्यकता यांमुळें अन्न व अन्नदाता यांसंबंधीं अनुकूल ग्रह सहजच निर्माण होतो. अर्थात् प्रत्येक डायरीकार अन्नाचे उल्लेख करीलच असें म्हणणें थोडें धाष्टर्याचेंच ठरेल. मद्यपान आपल्याकडे निषिद्ध असलें तरी इंग्लंडमधील डायऱ्यांत सुरानंदाचें अमूप उल्लेख आढळतात व हें स्वाभाविकच होय. मिसेस ब्राउन व टर्नर यांच्या डायऱ्यांत मद्याविषयीं मोठे गमतीचे अनुभव व उल्लेख नोंदलेले आढळतात.

## २७ घरगुती बाबी

घरगुती बाबीसंबंधांचा परिस्फोटहि कित्येकदां डायरींत केला जातो. एकमेकांच्या आवडी जितक्या प्रिय तितक्याच नावडीहि अप्रिय असतात. पतिपत्नी, मातापुत्र, पितापुत्र, यांच्या परस्पर संबंधांतील कटुतेला पुष्कळदां डायरींतच वाट मिळते. एरवीं वैयक्तिक संबंध दुरावले असले तरी

मनुष्य सहनशीलता धारण करतो; त्या त्या व्यक्तीजवळ तो स्वतःचे दुराग्रह आवडीनावडी, व मतभेद उघड करून सांगत नाहीं. या मानसिक कुचंबणेला डायरीद्वारा मोकळीक मिळते. पेपिसच्या डायरींत त्याचे व त्याच्या पत्नीचे संबंध काय प्रकारचे होते हें दाखवणारे उद्गार कितितरी आहेत. त्यांमुळेंच बराचसा मजकूर वाचनीय व मनोरंजकहि झाला आहे. एक पत्नी असलेल्याचीसुद्धां ही स्थिति ! मग बहुपत्नीक लेखकाची डायरी किति मनोरंजक होईल याचा नुसता तर्कच केलेला बरा !! स्त्रैणपणा व भांडणें, लोभमोहमत्सरादींच्या लीला व मुलांबाळांच्या शिस्तीविषयीं व शिक्षणाविषयीं मतभेद, पत्नीचें सौंदर्य व सद्‌गुण, पुरुषाची स्त्रीवशता या सर्वांचें कधीं गंभीर तर कधीं विनोदी, कधीं करुण तर कधीं हर्षदायक असें मनोहर चित्रण आपणांस डायऱ्यांतून आढळूं शकतें. त्यांतहि संख्येच्या दृष्टीनें जीवनांतील अत्यानंदाच्या क्षणांपेक्षांहि दुःखद वृत्तांतांचेंच उल्लेख अधिक प्रमाणांत आढळतात व तें मानवी वृत्तीला धरूनच आहे. " सुख पहातां जवापाडें । दुःख पर्वताएवढें " हे उद्गार तरी याचीच साक्ष देतात. मातापिता व कन्यापुत्रादिकांच्या मृत्यूची नोंद नेहमींच करुणरम्य असणार. मेरी शेलीच्या डायरींतील तिच्या अपत्याच्या मृत्यूच्या उल्लेख संक्षिप्त असला तरी अत्यंत करुण आहे.

आप्तेष्टांप्रमाणेंच नोकराचाकरांचेहि उल्लेख डायरींत स्वाभाविकपणेंच येणार! सामान्यतः कोणत्याच संपन्न व्यक्तींचें आयुष्य नोकराचाकरांवाचून जाणें संभवनीय नसतें. सहाजिकच नोकरांनीं टाळलेल्या, अर्धवट सोडलेल्या, अयोग्य रीतीनें केलेल्या अशा सर्वच कामांचा उल्लेख डायरींत येणें अटळ असतें. नोकर पुष्कळदां सांगकामेच असतात. अज्ञानामुळें व गैरसमजामुळें त्यांनीं केलेल्या घोटाळ्यांचीं वर्णनें मोठीं बहारीचीं असतात. बेलॅडोना आणि बेदाणा, बर्फ आणि बर्फी यांतील उच्चारसादृश्यामुळें उडालेला गोंधळ किती हास्यास्पद असेल हें निराळें सांगावयासच नको. नोकरांचा अनियमितपणा, हावरेपणा व अधाशीपणा, स्वयंपाक्यांचे पाकशास्त्रीय प्रयोग व त्यांमुळें धन्याच्या वाट्याला येणारी गैरसोय व नुकसानी, पंडितंमन्य चाकरांचे वाङ्मयीन

प्रयत्न आणि लुडबुडेपणा, स्टेनोग्राफरच्या चुका व तज्जन्य अनवस्थाप्रसंग, माळीबुवांनीं वाढविलेल्या बागा वा धन्याच्या आज्ञेच्या अनादरामुळें त्यांचीच झालेली उजाड अवस्था, दरबारी मंडळींचा व राजेरजवाड्यांचा उदारपणा वा क्षुद्रपणा, उच्चपदस्थांचे विश्रम्भालाप व टक्केटोमणे या सर्वांची मिश्र पण चमचमीत खिचडी डायरींत वरचेवर आढळते. मानवी मनांतील सद्गुणरत्नें व दुर्गुणांचे कोळसे यांनींहि डायऱ्या सारख्याच प्रमाणांत प्रकाशित वा कलंकित झालेल्या आढळतात. दुर्दैवानें डायऱ्यांतून आपल्याला धन्याची बाजूच फक्त समजते. तशीच नोकरांचीहि बाजू समजली तर मानवी जीवनावर केवढा तरी प्रकाश पडेल ! परंतु खालच्या दर्जाच्या नोकरांच्या डायऱ्याच उपलब्ध नसल्यामुळें ही बाजू केवळ कल्पनेनेंच रंगवावी लागते.

घरगुती बाबतींत पुष्कळशा क्षुल्लक गोष्टींचाहि समावेश होत असल्यानें डायऱ्यांत सांपडणारा बारीक तपशील वाचकाला कंटाळवाणा होण्याचा संभव असतो. एखाद्यानें सिगारेटी किती ओढल्या किंवा कपडे कितीदां बदलले या माहितींत सामान्य वाचकाला वेधक असें काय आढळणार ?

## २८. धर्मविचार

डायरींत विशेष तपशीलवार येणारा आणखी एक विषय म्हणजे धर्म आणि आचार, प्रवचनें व आध्यात्मिक चर्चा, धार्मिक ग्रंथाचें वाचन व पूजाअर्चा, तत्वज्ञान आणि आत्मानुभव, ‘अहं’ चा आविष्कार व निराकरण, सामुदायिक व एकांतांतील प्रार्थना, यांजविषयींचे उल्लेख इंग्रजी डायऱ्यांतून खूपच आढळतात. कधींकधीं तर अक्षरसुद्धां न गाळतां समग्र वृत्तान्त लिहिण्याची लेखकाची इच्छा अगदीं स्पष्ट दिसते. ईश्वरापाशीं मागणें मागणारे किंवा लाभलेल्या सद्भाग्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे ईशस्तुतीचे भाग डायऱ्यांतून मोठ्या प्रमाणांत आढळतात. इंग्रजींत तर बऱ्याचशा डायऱ्या धर्ममूलकच आहेत असें इंग्रजी टीकाकारांचें मत आहे; इतका तेथें धर्माचा सार्वत्रिक पगडा आहे. डायरीलेखनाचा

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आत्मसंशोधक हा मूळ हेतु असल्यानें इंग्रजी मंडळींना मन अंतर्मुख करण्यांस व त्याची अंतर्मुख वृत्ति स्थायी करण्यास डायऱ्यांचा फारच उपयोग झालेला आहे. अतिमानुष किंवा अतिसाष्टिक सृष्टींनीं केलेले साहाय्य हें सर्वच व्यक्तींनीं उघडपणें मान्य केलें नाहीं तरी बहुतेकांचा अंतर्मनांत या 'चान्स' वर विश्वास असतोच. आणि कांहीं गोष्टी दैवी सामर्थ्यानें घडून आल्याचा प्रत्यय आल्यानंतर त्यांना स्वतःची नम्रता, कृतज्ञता व ईर्षा व्यक्त करण्याचें डायरी हें एकटेंएकच सोयीस्कर साधन असते. आत्मानुभवापेक्षां अशा स्वरूपाच्या उल्लेखांची संख्या पुष्कळच मोठी असते. हे अनुभव लेखकाप्रमाणेंच इतरांनांहि मान्य व उपकारकहि होतात व त्यांची वर्तणूक सुधारण्यास मोठीच मदत होते. या उल्लेखांनीं आस्तिक्यबुद्धि वाढावी, निदान त्यांच्या वाचनानें मानसिक समाधान तरी मिळावें असा खुद्द लेखकाचाही उद्देश असणें असंभवनीय नाहीं. स्वतःचें पाप-पुण्य, सदाचारदुराचार हीं कबूल केल्यानें लेखकाच्या मनावरचा ताण कमी होण्याचाही संभव असतो. स्वतःवर मिळविलेल्या जयापेक्षां स्वतःची च्युति केव्हां व कशी झाली हें पहाण्याकडेच वाचकांचा अधिक ओढा असतो. हें कोणीच नाकारूं शकणार नाहीं. वाचकासहि डायरी वाचतांना बहुधा समान-धर्मीय मिळाल्याचा प्रछन्न आनंद मिळत असण्याचा संभव आहे. सद्वर्तनापेक्षां दुर्वर्तनाच्या कबुलीजबाबांतच खुमारी अधिक असते. पापाचरणाचे व आत्मनिंदेचे उल्लेख डायऱ्यांतून पुष्कळच आढळतात, पण त्यांत भोंदूपणा व बुवाबाजी यांचा अंश किती असेल या प्रश्नाचा निर्णय करणें कठीणच. क्वचित् हा केवळ आत्मनिंदेचाच भाग आहे अशी भावनात्मक पण आधारहीन खात्री कित्येकदां वाचणाराला अकारणच वाटते.

## २९ प्रवास

पुष्कळसे लेखक प्रवासांतही डायऱ्या लिहितात; साहाजिकच पाहिलेल्या देखाव्यांचा व ऐकलेल्या दंतकथांचा उल्लेख त्यांत ओघानेंच येतो. पण वस्तुस्थितीच्या उल्लेखांपेक्षां दृश्यांचा आणि दर्शनीय वस्तूंचा लेखकाच्या

मनावर झालेला परिणाम, त्यामुळें उचंबळलेल्या भावना पाहून त्यांत आपल्या स्वतःच्या अनुभवांच्या छटा हुडकण्याचा छंद प्रत्येकालाच असतो. यामुळेंच वाचकाला प्रवासी डायऱ्यांच्या वाचनानें आनंद होतो. पर्वत नद्या, पूल, आगगाड्या, स्टेशनें, इमारत, सहप्रवासी, दऱ्याखोरीं, वळणें, देवळें, क्षेत्र, इ. प्रेक्षणीय स्थळांची स्मरणपटावर उमटलेलीं चित्रें लेखक डायरींत शब्दनिविष्ट करीत असतो. डायरींत ताजमहालाचें वर्णन पाहून स्वतः पाहिलेल्या त्याच स्थळाविषयीं दुसऱ्याचें मत काय आहे हें जाणण्याची इच्छा वाचकाला स्वाभाविकच होते. ज्या इमारतीची सर्वांनींच स्तुति केली तीविषयीं आपल्या मनांत आलेले किंतु व शंका नेमक्या दुसऱ्यालाही आलेल्या पाहून आपणांस एक तऱ्हेचें समाधान लाभत असतें. विशेषतः आपल्यासारखेंच लोकविपरीत मत दुसऱ्याचेंहि असल्याचें बघून स्वतःच्या शहाणपणाविषयीं कौतुक वाटून आनंदहि होतो. यांत लाभणाऱ्या आत्मतुष्टीचा भाग प्रत्येकालाचा हवासा वाटतो आणि आवश्यकहि असतो. डायरी आकर्षक होण्यास एक तर लेखकाला या मानसिक प्रक्रियांचे भावतरंग रंगवतां आले पाहिजेत किंवा त्याला वाङ्मयनैपुण्याची तरी देणगी लाभलेली असली पाहिजे. त्यावांचून मात्र डायऱ्यासुद्धां प्रवासवर्णनाइतक्याच रुक्ष झाल्यावाचून रहणार नाहींत. सृष्टि आणि कला यांविषयींहि लिहितांना प्रतिभाहीनांची फेफे व त्रेधातिरपिट उडेल हें अगदीं उघड आहे. इंग्रजींत प्रवासांचे उल्लेख दैनंदिनीलेखकांनीच अधिक प्रमाणांत केलेले आहेत ही गोष्ट ध्यानांत घेण्याजोगी आहे. प्रवासवर्णनांना ज्या वाङ्मयीन गुणांची आवश्यकता असते त्यांचीच अपेक्षा डायरीलेखकालाहि प्रवासवर्णनें लिहितांना असते हें निराळें सांगावयास नकोच.

## ३० महाजन

डायरीलेखकाची बड्या धेंडांशी गांठ पडली कीं लेखकाच्या डायरींत त्यांच्या जीवनाविषयीं व संभाषणाविषयीं उल्लेख सहजच येणार. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं बड्या धेंडांची गांठ पडत असल्यामुळेंच माणसाला

डायरी लिहिण्याचा मोह पडतो. इंग्रजी वाङ्मयांतील क्रॅब रॉबिन्सन याच्या डायरीचा उगम असाच झालेला आहे. राजेराण्या, प्रधान व समाजाच्या विविध थरांतील बडी मंडळी यांच्या सांन्निध्यांत अशा कित्येक गोष्टी घडतात कीं त्यांची डायरींत नोंद केलेली नसली तर स्मरणांतून व परिणामी इतिहासांतून त्या लुप्त नष्ट होऊन जातील. म्हणूनच अशा घडामोडी नोंदणाऱ्या डायरीकाराला आपण इतिहासांत भर घालूं असा भरंवसा असलला पुष्कळदां आढळून येतो.

सामाजिक प्रसंगांचें प्रतिबिंब डायरींतील नोंदींमध्यें उठावें यांत आश्चर्य नाहीं. इंग्रजी डायऱ्यांत नाच, खाने, खेडयांतील घरांतील वनभोजनें, चहापान, नाटकें व इतर सर्व तऱ्हेचे सामाजिक समारंभ यांचा उल्लेख आढळतो. शेक्सपिअरच्या कित्येक नाटकांचा काल कांहीं प्रेक्षकांच्या डायरींतील उल्लेखांवरून ठरवितां आला हें प्रसिद्धच आहे. या समारंभांचें वर्णन करणाराची शैली उत्कृष्ट असेल तरच त्याच्या नोंदी आकर्षक, चित्तवेधक व मनोरंजक ठरतील. सर्वच डायरीकारांना हें कसब साधण्याची शक्यता नसल्यानें अशा तऱ्हेचीं कित्येक वर्णनें नीरस, ढोबळ व विस्कळीत वाटतात. कांहीं डायऱ्यांतून स्वतःचें महत्व वाढवण्याकरितांच केवळ बडयाच्या गांठीभेटींचे प्रसंग वर्णिलेले आढळतात. पुष्कळांना बडयाच्या ओळखी असणें सन्मानाचें वाटत असल्यामुळें त्या ओळखींना प्रसिद्धि देण्याचा मोह अनावर होतो ही आपल्या नित्याच्या अनुभवाची गोष्ट आहे. अशा डायऱ्यांमुळें होणाऱ्या लेखकाच्या मोठेपणाच्या अवास्तव व खोट्या कल्पनेपासून सावध राहाणें अवश्य आहे. कांहीं डायऱ्या वाचून तर असा ग्रह होतो कीं हा प्राणी नुसत्या मेजवान्या व समारंभ यांतच गुंग असून त्याला दुसरा व्यवसायच नव्हता. व्हॅनिटी फेअर या कादंबरींत एक पात्र लिहितें, " माझ्या लेखणीनें बड्या धेंडांचीं नांवें लिहितांना मी गर्वानें फुगून जातो हें मी अनुभवानें सांगतो." वरील प्रकारच्या डायरीलेखकांनाहि हेंच विधान लागू पडेल. या डायऱ्यांतील नोंदींच्या तारखांतील कालांतर अवश्य लक्षांत घ्यावयासहवें. कारण सर्वच दिवस कांहीं मेजवान्यांचे व समारंभाचे नसतात. मधूनमधून

रिकामे किंवा कोरडे दिवस जाणें अपरिहार्यच होय. बऱ्या घेंडांविषयींच्या या नोंदी सुरवातीला रंजक वाटल्या तरी लवकरच त्यांचा कंटाळा येऊं लागतो. वास्तविक लहानसान सर्वच प्रसंगांची नोंद वेधक वाटावयास हवी; खरें जीवन त्यांतच असतें; मानवी वृत्तींचें वास्तव चित्र त्यांतच आढळतें. इंग्रजी डायऱ्यांतून क्रीडावर्णन व तद्विषयक इतर नोंदीहि आढळतात. पेपिस, वुइंडहॅम, क्रॅब् रॉबिन्सन्, हेन्रि ग्रेव्हिल इ. च्या डायऱ्या यांकरितां प्रसिद्ध आहेत.

## ३१ पुस्तकें

डायरीकार स्वतः विकत घेतलेल्या व वाचलेल्या ग्रंथांचाहि उल्लेख अधूनमधून करीत असतो. क्वचित् तत्संबंधीं मतें, टीका व वाद यांचाहि परामर्ष डायऱ्यांतून घेतलेला आढळतो. या सर्वांवरून लेखकाच्या वाङ्मयीन अभिरुचीचाहि पत्ता आपणांस लागतो. दुर्दैवानें डायऱ्यांतून उत्तम परीक्षणें मात्र आढळत नाहींत. मेकॉले, मेरी शेली, वा फाइन्स क्लिंटन यांच्या डायऱ्यांतून वाङ्मयविषयक उल्लेख विपुल आढळतात. थॉमस् ग्रीनच्या डायरींत तर ग्रंथांचीं परीक्षणें खच्चून भरलेलीं आहेत.

## ३२ जमाखर्च

डायऱ्यांतून जन्म, मृत्यू व विवाह यांचे उल्लेख येणें साहजिक असून तसे ते सर्वत्रच सामान्यतः येतातहि. कांहीं कांहीं डायऱ्यांत तर इतर उल्लेखांचा संपूर्ण अभावच असतो. जॉन् इव्हलनच्या डायरींत तर मृत्यूंच्या नोंदीचा इतका अतिरेक झाला कीं त्यामुळें लेखकाच्या मनोगंडाचा उबग येतो. आयव्यय, जमाखर्च, बाजारभाव यांच्याहि नोंदींची संख्या बरीच आहे. मोरोपंतांनीं यात्रा करतांना लिहिलेल्या पत्रांत अशा स्वरूपाचे उल्लेख किती तरी आहेत ( पांगारकर, मोरोपंतचरित्र, पृ. १६५ ). जमाखर्चांचे दैनंदिन खर्डे रोजनिशीच्या वर्गांत सामावूं शकत नसले, तरी रोजनिशीच्या फारच निकटचे होत. 'पेशव्यांच्या सावलींत " या पुस्तकांत छापलेल्या जमाख-

ग्रंथ वाचनालय, सातारा



र्चांच्या कित्येक बाबी आजहि विचारार्ह वाटतात. अशा नोंदींत किराणा माल पक्वान्नें, भोजनपदार्थ, मजुरीचे दर, कर व जकाती, नोकरांच्या याद्या इ. मजकूर तपशीलवार आढळतो. कांहीं डायऱ्यांत पाहुण्यांचीहि माहिती समाविष्ट केलेली आढळते. तसेंच धार्मिक कृत्यें, भटभिक्षुक इत्यादींचाहि अंतर्भाव त्यांत होतो. जमाखर्चाच्या या खतावण्यांतून तत्कालीन सामाजिक चालीरीती व लोकाभिरुचि यांची माहिती मिळते.

ज्या अर्थी खाद्यपेयांचे उल्लेख वारंवार येतात त्याअर्थी कपड्यालत्त्यांचेहि उल्लेख डायऱ्यांतून वारंवार येत असतील असें वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. पेपिसचें स्वतःच्या व आपल्या पत्नीच्या वेषभूषेचें सविस्तर वर्णन हें कपड्यांच्या उल्लेखांचें इंग्रजींतील एकमेव उदाहरण आहे. गिल्मूरची शेंदरी बंडी, ब्यूरलनें मुलीकरितां खरीदलेले पायमोजे, लेडी ऑफ कॅगॉलेनचा घोड्यावरून रपेट करण्याचा पोषाख यांसारखे उल्लेख अधूनमधून इंग्रजींत येतात इतकेंच. कधीं राणी व्हिक्टोरिया स्वतःच्या वस्त्रप्रावरणांची चर्चा लॉर्ड मेल्बोर्नबरोबर करते तर फॅनी बुर्नें राणी शार्लोटच्याच कपड्यांवर भाष्य करते. एरवीं रोज दैनंदिनी लिहिणारे लेखकसुद्धां कपड्यांचा ऊहापोह क्वचितच करतात.

## ३३ अपघात

रोमांचकारक साहसें, आणीबाणीचे प्रसंग व त्यांतून शर्थीनें वा थोडक्यानें बचावून झालेल्या सुटका, आगी व महापूर, इत्यादींचीं वर्णनें सामान्य रोजनिशांतूनसुद्धां येतात. त्याच्या त्याच दिवशीं प्रसंगांचें स्मरण उत्कट असतें व त्याचा मनावर झालेला परिणामहि ताजा असतो. त्यामुळें अशा वर्णनांना, तीं संयमी लेखकांनीं केलेलीं असलीं तरी, एक प्रकारचा भडकपणा व वास्तवता आपोआपच येते.

## ३४ राजकीय व सार्वजनिक

संस्मरणीय सामाजिक घटना, राजाचा मृत्यु, युद्धारंभ, मुलकी चळवळी, एखादा खून किंवा खटला यांची बारीक नोंद दूरस्थ दैनंदिनीलेखक देखील

करतात. एखाद्या प्रान्तांतील अप्रसिद्ध व्यक्तीच्या दैनंदिनींतील राजकीय वा सामाजिक घटनांचे ओझरतेसुद्धां उल्लेख त्या व्यक्तीच्या राष्ट्रीय जीवनाचा आढावा घेण्यास व ऐतिहासिक दृष्ट्या त्याच्या कालाचें स्मरण करून देण्यास उपयोग पडतात. एग्मॉंट व ग्रेव्हिल यांच्या डायऱ्यांत तर असल्याच घटनांच्या संपूर्ण नोंदीच फक्त आहेत. याच डायऱ्या इतिहासाच्या साधनांचा पाया म्हणून उपयोगी पडतात. त्यांच्या लेखकाला प्रत्यक्ष निरीक्षणाची असामान्य संधि लाभलेली असते. ॲडमिरल कॉक्‌बर्नची सेंट हेलेनाच्या जलपर्यटनाची छोटी डायरी अशाच स्वरूपाची आहे. कित्येक रोजनिशा तर जणु केवळ सामाजिक व राजकीय घटनांची नोंद करण्याकरिताच राखून ठेवलेल्या असतात. कांहीं डायऱ्यांत नुसत्या सार्वजनिक घटनांचेच उल्लेख व तेहि वैयक्तिक दृष्टिकोनापासून अलिप्त राहून केलेले आढळतात.

## ३५ युद्धें

डायऱ्या लिहिणाऱ्यांची खानेसुमारी काढली असतां असें आढळेल कीं धर्मोपदेशक व योध्दे यांचे क्रमांक सर्वांत वर लागतात. युद्धपूर्व किंवा युद्धोत्तर कालांत व कित्येक व्यक्ती युद्धकाळांत मात्र कटाक्षानें दैनंदिनी लिहीत असें दिसून येतें. युद्ध ही प्रत्यक्ष चालू असतांना इतकी निर्णायक व महत्त्वपूर्ण घटना असते आणि शिवाय युद्धांत रोमांचकारी व मर्मभेदक अनुभव इतके खचून भरलेले असतात कीं त्यांत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्याला त्यांची लहानशी कां होईना पण तात्कालिक नोंद करावीशी वाटतेच. दुर्दैवानें तो विषय मात्र असा आहे कीं त्यांतील सर्वच संस्मरणीय प्रसंगाची नुसती नोंद करणेंसुद्धां कोणत्याहि एका व्यक्तीला शक्य होणार नाहीं. पुष्कळदा अशा डायऱ्यांतून लेखकांचें व्यक्तिमत्व पूर्णपणें लुप्त होऊन जातें. लेखक नकळत युद्धाच्या स्वतःच्याच विभागांतील घटनापुरती नोंद करण्याचें बंधन स्वतःवर घालून घेत असतो. अशा अनेक डायऱ्यांचा संग्रह इतिहासकाराला मात्र फारच उपयोगी पडतो. परंतु कांहीं योध्या शर्थीच्या रोमांचकारी सुटका व लष्करी हालचालींची भयावहता यांपलीकडे एकैकशः

मात्र त्या फारशा संस्मरणीय नसतात. लष्करी हालचाली, युद्धाची पूर्वतयारी, रणनीति व संग्रामतंत्र यांच्यांत असणारा एक तऱ्हेचा कंटाळवाणेपणा व एकसारखेपणा असामान्य प्रतिभेच्या लेखणीला देखील कमी करतां येणार नाहीं. कांहीं थोड्याशा उदाहरणांत मात्र लेखकाचे स्वतःचे विकार व भावना व्यक्त झालेल्या, असल्यानें किंवा त्यांतील दृश्यांचीं व घटनांचीं वर्णनें वास्तवपूर्ण व प्रत्यक्ष चित्रासारखीं असल्यामुळें डायऱ्यांत एक तऱ्हेची जिव्हाळ्याची रंगत आढळते व त्यावरून लेखकाच्या मनोवृत्तीचें व व्यक्तिमत्वाचेंहि दर्शन घडतें. हाताखालील तुकड्यांच्या रोजच्या हालचाली, युद्धसामुग्रीचा पुरवठा, कुमक येण्याची शक्याशक्यता, शत्रूच्या हालचालींच्या बातम्या, आणि हवामानाचा रागरंग यांचें महत्व प्रथमप्रथम वाटलें तरी त्याची गोडी हळु हळू कमी होते. याचा परिणाम असा होतो कीं लष्करी रोजनिशा अपेक्षप्रमाणें आकर्षक न होतां नीरसच वाटतात. एक जनरल गोडार्डची खार्टूमची रोजनिशी मात्र अतिशय मनोरंजक आहे व म्हणूनच अपवादात्मक म्हटली पाहिजे.

इतर राष्ट्रांच्या सैनिकांच्या रोजनिशांतून न आढळणारा एक विशेष इंग्लिश सैनिकांच्या रोजनिशींतून आढळतो. इंग्लिश सैनिक हा जीवावरचीं संकटें व आणीबाणीचे प्रसंग याबद्दल कमालीच्या थंडपणानें व तटस्थ वृत्तीनें लिहितो. भावनांचें प्रदर्शन करून स्वतःच्या विचारविकारांचा गौप्यस्फोट तो कधींच होऊं देत नाहींत. अगदीं महत्वाच्या चकमकींचें वर्णन सुद्धां तो अलिप्तपणें करतो. प्रत्यक्ष युद्धापेक्षां इतर बाबींचें वर्णन तो बारिकसारीक तपशिलासह करीत बसेल तर युद्धाचा उल्लेख मात्र एखाद्याच वाक्यानें करून मोकळा होईल. बहुधा सैनिकांच्या डायऱ्यांतून तीनच प्रमुख भावनांची पुनरावृत्ति झालेली आढळते. प्रत्यक्ष युद्धांत भाग घेण्याची उत्कंठा, विलंबामुळें व दीर्घ प्रतीक्षेमुळें आलेली अधीरता आणि शेवटीं एकदांचा लवकर युद्धाचा शेवट व्हावा ही आतुरता.

## ३८ क्रीडावर्णन

डायऱ्यांत मृगया, मासेमारी, नेमबाजी व क्रिकेट यांचे उल्लेखहि खूपच व वरचेवर येतात. शिवाय केवळ क्रीडांची नोंद ठेवण्याकरतां राखून ठेवलेल्या

रोजनिशाहि पुष्कळ आहेत. एका बंदुकबहाद्दरानें तर आपल्या शिकारी जीवनाचा वृत्तान्त अगदीं बारिकसारीक तपशीलासह दिलेला आहे. मृगयेच्या रोजनिशा आहेतहि विपुल. १९ व्या शतकांतल्या अशा कितीतरी डायऱ्या आज उपलब्ध झालेल्या आहेत. मिलरनें आपल्या रोजनिशींत त्याला मृगयेपासून होणारा उत्कट आनंद व शिकार साधल्यानें झालेलें संपूर्ण समाधान यांचें अपूर्व शब्दचित्र काढलें आहे. सर मॉरडॉनें प्रत्येक लहान सहान प्रसंगाचें चित्रदर्शी व तपशीलवार वर्णन केलेलें आहे.

मिलरची मृगयानंदानें ओतप्रोत भरलेली रोजनिशी आणि ईशप्रार्थना व आत्मनिंदा यांनीं लडबडलेल्या धर्मोपदेशकांच्या रोजनिशा यांत चित्त-वेधक विरोध आढळून येतो. कांहीं शिकारी डायऱ्या मात्र खऱ्या डायऱ्या नसून पाठलाग, धाडस व तंत्राचा उपदेश यांच्या वर्णनांच्या नुसत्या जंत्र्या असतात. त्यांतील कांहीं शब्दशः अवाढव्य आहेत तर कांहीं अगदीं त्रोटक अशा टिपणांच्या रूपांत आहेत. पण या सर्वच मृगयेव्यतिरिक्त इतर उल्लेखां-पासून अगदी अलिप्त आहेत. त्या ज्याच्या त्याच दिवशीं लिहिलेल्या असल्यानें त्यांचें दैनंदिनीत्व मात्र अबाधित आहे. येरबर्ग म्हणतो त्याप्रमाणें "स्मरण ताजें नसलें तर रंग उडून जातो." म्हणून ज्याच्या त्याच दिवशीं नोंद करणें हीच खरी रोजनिशीलेखकाची पद्धत. आश्चर्याची गोष्ट मात्र अशी कीं केवळ वर्णनशैलीच्या सारखेपणामुळेंच नव्हे तर विषयमर्यादमुळें, व तसेंच स्थलवर्णनें, लांडग्यादिकांचा माग, शिकारी कुत्र्यांची व घोडयांची प्रवृत्ति व हजर असलेल्या व्यक्तींच्या एकछाप यादा यांमुळें या डायऱ्या हाडाच्या शिकाऱ्यालासुद्धां वाचवत नाहींत. उत्कट आनंदाच्या अवस्थेंत लिहिल्या-वांचून रहावत नाहीं म्हणून आणि स्वतःच्या वृद्धापकाळीं—आयुष्याच्या त्या सायंकाळीं—या महत्वाच्या प्रसंगांच्या स्मरणानें तरी निदान मृगयानंदाचा अनुभव घेतां यावा म्हणून शिकारी स्वतःच्या डायऱ्या लिहीत असतो.

## ३७ व्यवसायविषयक

धंद्यासंबधीं त्रोटक उल्लेखाखेरीज विशेषशी माहिती सैनिक, नाविक व संशोधक डायरीकार वगळल्यास इतरांच्या रोजनिशांत फारशी आढळत नाहीं हें

कुतुहलजनक आहे. लेखक जणूं काय दैनंदिन व्यवहारापासूनच बुद्धिपूर्वक दूर सरून स्वतःच्या प्रवृत्तीचा अधिक व्यापक आढावा घेत असतो. उलट स्वतःच्या धंद्याची वाढ व विकास यांची नोंद करणारे व त्यांतच केवळ गढून गेलेलेहि थोडेथोडके नाहीत. ग्लॅड्स्टन तर स्वतःच्या व्यवहाराखेरीज दुसऱ्या कशाचाच उल्लेख करीत नाहीं.

## ३८ चुटके व उद्धरणें

पुष्कळशा रोजनिशांत एखादा चुटका, कोटि किंवा कविता उध्दृत केलेली असते तर कित्येक रोजनिशा जणूं काय असे उतारे एकत्रित करण्याच्या एकमेव उद्देशानें लिहिलेल्या असतात. या रोजनिशा एरवीं जवळजवळ इतर पुस्तकांसारख्याच असल्या तरी त्यांत इतर अनेक ग्रंथांतील उताऱ्यांचा समावेश केलेला असतो. हेंच त्यांचें वैशिष्ट्य. फ्रॅन्सिस विने या लेखिकेच्या रोजनिशीचे वीस खंड हे रोजनिशांच्या स्वरूपाचे मुळींच नसून महत्वाच्या घटनांचे अवशेष व इतरांच्या पत्रांतील उतारे यांनींच केवळ भरलेले आहेत. (बाजारगप्पा व लोकप्रवाद यांचेहि संग्रह, गोष्टी, ऐकीव माहिती वा गौप्यस्फोट यांच्या रूपानें करणारे लेखक कितीतरी आहेत.) आपलीं टिपणें आपल्या मृत्यूनंतर वाचकांना महत्वाचीं व आकर्षक वाटतीलच असा त्यांचा दृढ विश्वास असतो. कांहींना तर त्यांना जिवंतपणीं प्रसिद्धि देण्याचीहि हांव सुटते. प्रत्यक्ष अनुभव मात्र उलट येतो. असे सांगोवांगी दंतकथांचे संग्रह कमालीचे रुक्ष होतात इतकेंच नव्हे तर ते शिळे व कालांतरामुळें बुरसलेले असतील तर वाचवतसुद्धां नाहींत. लेखकाच्या मनांतील रहस्यें खुलीं करण्यापुरतेंच त्यांचें महत्त्व. एखादे वेळीं मात्र एखादा क्षुल्लक पण अनपेक्षित लोकप्रवाद, दुष्ट सूचना किंवा चोरटा प्रहार एखाद्याच्या मंद मालवणाऱ्या मनाला इष्ट तें तेज व चैतन्य देऊं शकतो.

नियमानें डायऱ्या लिहिणारे कांहीं दैनंदिनीलेखक वर्षाच्या शेवटीं किंवा स्वतःच्या वाढदिवशीं स्वतःच्या जीवनाचा, कार्याचा किंवा खटपटीचा आढावा घेतात किंवा धार्मिक अगर तात्त्विक विचार व्यक्त करतात. इतर

कांहीं लेखक दैनंदिनीस सुरवात करण्यापूर्वीचें आपलें पूर्वचरित्र प्रथम लिहून काढतात व नंतर रोजनिशी सुरूं करतात. या प्रकारांत आपल्याला लेखकाचें आत्मनिष्ठ व्यक्तित्त्व स्पष्ट दिसतें.

वर उल्लेखिलेले सर्व विषय बहुतेक सर्वच डायऱ्यांतून आढळतात. तरी-पण प्रत्येक दैनंदिनीचे स्वतःचे असे कांहीं वैशिष्टय असतेंच असतें. अगदीं भावशून्य डायरींतसुद्धां लेखकाचीं वैशिष्टयें दाखविणारीं विधानें व शब्दसमुच्चय अवश्य येतात. उघडपणें प्रसिद्धीकरितां न लिहिलेल्या व साहित्यगुणांनींहि उल्लेखनीय नसलेल्या रोजनिशासुद्धां त्यांतील मानवी वैशिष्टयामुळेंच आकर्षक ठरतात. पुष्कळदां एरवीं अगदीं अज्ञात असलेल्या सामान्य व्यक्तींच्या जीवनकथा आपणांस रोजनिशीच्या साहाय्यानें कळतात. अशा डायऱ्या वाचतांना अस्पृष्ट प्रदेशांचें संशोधन करण्यासारखें एक तऱ्हेचें आकर्षण वाटतें. असें आकर्षण ज्यांची माहिती इतर अनेक ठिकाणांहून मिळालेली असते त्यांच्या डायऱ्यांबद्दल तितकेंसें वाटत नाहीं. दुर्दैवानें लेखक प्रसिद्ध असेल तर त्याच्या दरिद्री डायऱ्यांनासुद्धां प्रसिद्धीचा लाभ होतो तर उलट सार्वजनिक दृष्टया बिन-महत्वाच्या लेखकाच्या उत्कृष्ट डायरीला कधींच प्रकाश दिसूं शकत नाहीं.

## ३९ 'अप्रकाश्य'

प्रसिद्ध केलेल्या दैनंदिन्यांत थोडीबहुत काटाछाट अपरिहार्यपणें केलेली असते. अयोग्य, अतिप्रसंगी वा असभ्य उद्गार काढून टाकावे लागतात. हे गाळलेले भाग मुद्दाम शोधून वाचणें शक्य असलें तरी एवढा खटाटोप कोणी करील असा संभव मात्र फारसा नसतो. पण या गाळण्यामुळेंच, छाटाछाटीमुळें निःसंशय कांहींशी हानि झाली आहे. पुष्कळदां संपूर्ण हस्तलिखिताचें संशोधन करून लेखकाचें बरें किंवा वाईट पण बरा तरी निराळें चित्र निर्माण करतां येईल. फुल्या, रेघा, मोकळ्या जागा किंवा आद्याक्षरें ही वाचकाला कित्येकदां तापदायकहि वाटतात.

## ४० गुप्ततेचीं साधनें

गुप्तता राखण्याकरितां दैनंदिनी लेखकांनीं अनेक उपाय योजलेले आढळतात. त्यावरून स्वतःचें लिखाण उजेडांत येण्याच्या भीतीचा प्रत्यय पुष्कळ ठिकाणीं येतो. विशिष्ट उल्लेखांच्या ऐवजीं नुसतीं टिंबें देणें हें तर नित्याचेंच आहे. त्यावरून लेखक केवळ स्वतःकरितांच लिहीत आहे हें स्पष्ट होतें. पेपीसनें वाचकांच्या भीतीनें आपली संपूर्ण रोजनिशी लघुलिपींत लिहिली आहे; बायरन हा स्वतःच एका लघुलिपीचा जनक असल्यानें त्यानेंहि पेपीसचाच कित्ता गिरवला आहे. पुष्कळांनीं गुप्ततेकरितां परकी भाषांचाहि उपयोग केलेला आहे. बेकर पुष्कळसे फ्रेंच, लॅटिन व इटॅलियन शब्द वापरतो तर ब्युरेल स्वतःच्या आजारांविषयीं व कौटुंबिक उल्लेखांवर लॅटिनचें आवरण घालतो. डॉ. डी, फाइन्स व क्लिंटनहि कित्येकदां मधूनच लॅटिन वापरतात; ड्युगार्डनें तर संपूर्ण रोजनिशीच लॅटिनमध्यें लिहिली आहे! लेखक कदाचित् भावी पिढीला भीत नसेल पण तो समकालीनांच्या सर्वभक्षक नजरेला बुजतो यांत संशय नाहीं.

## ४१ चित्रें

कांहीं दैनंदिन्या सचित्रहि असतात; पण त्यांची संख्या एकंदरीनें कमीच. भूतकालावर नजर फिरवतांना डोळयांना आकर्षण म्हणून ब्यूरेलनें रेखाचित्रांचा उपयोग बुद्धिपुरःसर केला आहे. मेरी ब्राउनच्या डायरीचें तर चित्रें हेंच वैशिष्टय आहे. जनरल गॉर्डन् नकाशे व आकृत्या तर देतोच पण कांहीं गमतीचीं व्यंग्यचित्रें व व्यक्तिचित्रेंहि तो काढतो. राणी व्हिक्टोरियाच्या सुरवातीच्या रोजनिशांत तिचीं स्वतःचींच कांहीं चित्रें समाविष्ट केलेलीं आहेत. तर 'लीव्हस् फ्रॉम दि हायलँड्स' मध्यें तिनें थोडीं रेखाचित्रेंहि काढलीं आहेत.

## ४२ 'रुक्ष डायऱ्या'

रुक्ष व जवळजवळ भावशून्य अशा नोंदी ज्या लेखकांना नवीनवीं माणसें पहाण्याची व वैशिष्टयपूर्ण घटनांत प्रत्यक्ष भाग घेण्याची संधि

लाभलेली असते अशा व्यक्तींच्या लिखाणांतसुद्धां वैपुल्यानें आढळतात. कधीं लेखक सामुग्रीच्या वैपुल्यामुळें संभ्रमांत सांपडतो तर कधीं निवड कशाची करावी हेंच त्याला सुचत नाहीं; कधीं कधीं तर त्यांची स्वतःची निरीक्षणशक्ति व वर्णनेशलीच तोकडी व अपुरी पडते. एकादेंच टीकात्मक वाक्य किंवा मनमोकळें मतदर्शन पाल्हाळिक वर्णनापेक्षांहि एखादें दृश्य किंवा व्यक्तिचित्र अधिक उठावदार व रसरशीत बनवूं शकतें. दैनंदिनींत विषयापेक्षां लेखकांचेंच महत्व अधिक असतें. एखाद्या सामान्य शाळामास्तराइतकी उत्कृष्ठ रोजनिशी लंडनच्या समाजांतील एखादें बडें घेंड लिहू शकेलच असें नाहीं. एकोणिसाव्या शतकांतील दैनंदिन्या रुक्ष असल्यानें वाचायला सर्वांत कठीण आहेत असें नाइलाजानें म्हणावें लागतें. अर्थात् अशा रुक्ष दैनंदिनींतदेखील अविवेकाच्या किंवा भावनेच्या आकस्मिक स्फोटाकडे कटाक्षानें लक्ष ठेवावें लागतें.

## ४३ विक्षिप्तपणा

पुष्कळ वेळां विक्षिप्त लोकच डायऱ्या लिहितात हें खरें असलें तरी दैनंदिनी लिहिणारे नेहेमींच दैनंदिनी न लिहिणाऱ्यांपेक्षां विक्षिप्त असतात असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. अनेक व्यक्तींच्या मनोभूमींत सुप्तावस्थेंत असलेल्या अनपेक्षित चक्रमपणाला रोजनिशींत अमाप बहर आलेला आढळतो हें मात्र अगदीं खरें. फार काय बाह्यतः अगदीं सभ्य व सात्विक दिसणाऱ्या व्यक्तीसुद्धां कितीदां तरी चमत्कारिक विचारांच्या व संवयींच्या आहारी गेलेल्या दिसतात. रट्टेच्या डायरींत असलेला सुसंगत विक्षिप्तपणा मात्र बिनतोड आहे. जॉन मूरमध्यें विचित्रपणाचीं कांहीं लक्षणें उघड दिसतात तर लेडी ऑफ लॅंगोलानाची डायरी निःसंशय नावीन्यपूर्ण आहे.

## ४४ पुरातन रोजनिशा

कित्येक पुरातन रोजनिशा केवळ त्यांच्या जुनेपणामुळेंच—तत्कालीन रीतिरिवाज व आचारविचार यांच्या निदर्शक आणि त्या, त्या त्या विशिष्ट स्थळांविषयीं ऐतिहासिक माहिती देणाऱ्या या नात्यानें—मनोवेधक वाटतात. खानेसुमारीचे नुसते आंकडे वाचीत बसण्यापेक्षां १७व्या शतकातील दोन-

चार डायऱ्या वाचल्यानेंच त्या काळांतील बाळमृत्यूंची कल्पना अधिक स्पष्टपणें येईल. याच डायऱ्यांवरून तत्कालीन तरुणांच्या अकाल प्रौढत्वाची पण साक्ष पटते. जुन्या दैनंदिन्यांतील तत्कालीन आचारविचारांचे व वेषभूषा-पद्धतीचे उल्लेख हे त्यांतील भाषेच्या व लेखनपद्धतीच्या आर्षपणामुळें होणारी करमणूक इत्यादींच्या योगानें त्यांतून उल्लेखिलेल्या सामान्य क्षुद्र घटनांना-सुद्धां नसती अपूर्व गोडी प्राप्त करून देतात. सतराव्या शतकांतील एखाद्या खेडवळ गृहस्थाच्या कर्तृत्वाचेंच नव्हे तर नुसत्या बाजारहाटीचें त्रोटक टांचणहि जितकें मनोहर वाटतें तितकेंच एकोणिसाव्या शतकांतील तसेंलच टांचण आज अवाचनीय ठरेल. उलट त्यालाच ३०० वर्षांनंतर एक नवीच गोडी येईल.

संशोधकांच्या रोजनिशांचा एक अगदीं स्वतंत्र प्रकार मानावा लागतो. एकादा सैनिक डायरी लिहील किंवा न लिहील. त्यानें लिहिलीच तर त्यांत मुख्यत्वेंकरून लष्करी बाबींचीच नोंद येऊं शकते; तो लिहितो तेंहि केवळ लिहिण्याच्या उत्कट इच्छेमुळेंच लिहील. त्याची डायरी कितीहि शास्त्रीय असली तरी तिचें रोजनिशीत्व रोजनिशीच्या इतर प्रकाराइतकेंच अबाधित होतें. एखाद्या अधिकाऱ्याची डायरी किंवा जहाजावरील हजेरीपुस्तक मात्र खऱ्या अर्थानें रोजनिशीच्या वर्गांत मोडणार नाहीं. संशोधक डायरी लिहीतो ती मात्र स्वतः हातीं घेतलेल्या उद्योगांतील दैनंदिन प्रगतीची नोंद ठेवण्याचें सोयिस्कर साधन म्हणून. संशोधकांना मान्य असलेल्या ( शास्त्रीय अवलोक-नांची नोंद व प्रमाणांचा संग्रह करणें ) पद्धतीसारखीच त्याचीहि पद्धत असते अर्थात् त्याची दैनंदिनी अतिशयच शास्त्रीय बनते, तरी देखील त्यांतून लेखकाचें व्यक्तिमत्त्व मधून मधून डोकावतेंच. कॅ. कुक्, डार्विन व कॅ. स्कॉट यांच्या डायऱ्या या वर्गाच्या प्रतिनिधी होत. पैकीं कॅ. कुकच्या दोनहि रोजनिशांत मधून मधून क्वचित् स्वतःचीं मतें व्यक्त केलेलीं असलीं तरी त्यांचें स्वरूप प्रामुख्यानें शास्त्रीयच आहे. डार्विनचा ग्रंथ मात्र तितका गद्य नाहीं; तो स्वतःच्या तारुण्यसुलभ उत्साहाला व्यक्त स्वरूप नैसर्गिक रीत्याच देत असल्यानें त्याच्या शास्त्रीय

लिखाणालासुद्धां साहसी व्यक्तित्वाचा रंग चढला आहे. उलट कॅ. स्कॉटच्या डायरीला त्याच्या सफरीच्या हृदयद्रावक अंतामुळें वेधकपणा आला आहे.

## ४५ डायऱ्यांचीं लक्षणें

विविध उद्योगांत गढलेले लोक डायरी लिहीत नसतील अशी समजूत होण्याचा बराच संभव आहे. परंतु वास्तविक दैनंदिनी लिहिणें फुरसतीवर नव्हे तर केवळ प्रवृत्तीवर अवलंबून असतें. ती संवय लावून घेण्यास बरीच खटपट करावी लागते व तिलाच लोक कंटाळतात. कोणी केवळ आळसापायीं, तर कोणी दैनंदिनी लिहिणें फारसें महत्त्वाचें नाहीं म्हणून व कोणी आपल्या आयुष्यांतील घटनांची नोंद ठेवण्याइतकें तें आकर्षक नाहीं म्हणून दैनंदिनी लिहिणें टाळतात. दुसरें कांहींहि कारण असू शकेल. परंतु दैनंदिनीलेखन रिकामपणावर अवलंबून नाहीं हें खास. आपल्या व्यवसायांत सर्वस्वी व्यग्र झालेल्या अष्टावधानी माणसाला अगदीं प्रत्येक दिवसाची तारीखवार नोंद ठेवायला फुरसत मिळू शकेल तर उलट एखाद्या रिकामटेकड्या खुशालचेंडूला महिन्यांतून एखाद्या दिवशींसुद्धां लिहिण्याचे कष्ट घ्यावेसे वाटणार नाहीत.

दैनंदिनीकाराचें लक्ष आत्मकेंद्री असून तो जीवनपथावर प्रवास करणाऱ्या स्वतःचेंच सूक्ष्म अवलोकन करीत असतो. त्याच्या बाजूनें असेंहि म्हणतां येईल कीं त्याची प्रवृत्ति तटस्थपणें नुसतें वाढण्याची नसतेच मुळीं. तो जागृत राहून स्वतःशीं संबंधित असलेली प्रत्येक गोष्ट अत्यंत तत्परतेनें व जिवतपणाच्या जाणिवेनें करतो. अहंकाराच्या याप्रमाणामुळेंच सर्वांत अधिक उद्योगी माणसाला देखील दैनंदिन टिपणें करण्याची संधि व फुरसतहि लाभूं शकते.

## ४६ रोजनिशीलेखिका

स्त्रियांच्या व पुरुषांच्या रोजनिश्यांत कांहीं फरक, ठळक भेद आढळतात. स्त्रियांनीं कधीं लिहिलेंच तर त्या सपाटून लिहितात. रोजच्या रोज किंवा नियमित कालांतरानें नोंदी ठेवणाऱ्या स्त्रिया असल्याच तर त्यांची संख्या

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



अतिशयच कमी असेल. दैनंदिन आयुष्यक्रमांतील क्षुद्र घटनांची नोंद ठेवण्याची कल्पनाच मुळीं स्त्रीहृदयाला रुचत नाहीं. त्यांना पत्र किंवा स्मारक टिपणें लिहिण्याची पद्धत अधिक पसंत पडते. कांहीं कांहीं स्त्रिया तर बऱ्या पत्रलेखिका असतात. त्यामुळेंच कदाचित् त्या डायऱ्या लिहू शकत नसतील. परंतु स्वतःचे विचार-विकार व्यक्त करण्याचा तो मार्ग त्यांना कायमचा बंद केला तर मात्र तेच विचार व्यक्त करण्याकरितां तरी निदान त्या डायऱ्या लिहूं लागतील असें मानायला जागा नाहींच असें नाहीं. लेडी मेरी कोर्कनें हे दोनहि प्रकार एकत्रित करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यामुळेंच तिला एकांतहि खरें यश मिळवतां आलें नाहीं. दुसरें असें कीं अगदीं महत्वाच्या स्त्रिया सोडल्यास इतरांच्या रोजनिशा उपलब्ध होऊंच शकत नाहींत. उलट अगदीं सामान्यांतल्या सामान्य पुरुषाचीसुद्धां डायरी उपलब्ध होऊं शकते!

स्त्रिया सामान्यतः फार धोरणी व व्यवहारी असल्यामुळें त्यांच्यांत स्वतःच्या अंतर्मनाचा परिस्फोट करण्याची प्रवृत्ति मुळांतच कमी असते. इंग्रजी स्त्रियांच्या उपलब्ध झालेल्या डायऱ्यांतून असा निष्कर्ष निघतो कीं त्यांच्या अंतःकरणांत मालिन्य व अंतर्मुखता यांचें प्रमाण फारच कमी असून त्यांना बहिर्निष्ठ दृष्टीनें वर्णनें करण्याची हौस अधिक असते. शिवाय स्वतः-करितां स्वतःच योजलेल्या व आंखलेल्या लेखनपद्धतींत त्या पराकाष्ठेचें प्रावीण्य संपादन करतात. कधीं कधीं त्यांची वर्णनशैलीहि उत्कृष्ट असते. सेलिया फिएन्स व लेडी कूपर यांच्या स्वयंस्फूर्त लिखाणांत त्यांचें वैशिष्ट्य-पूर्ण व्यक्तिमत्त्व उठावानें प्रतिबिंबित झालेलें आढळतें. समाजाचें नेतृत्व करणाऱ्या स्त्रियांच्या दैनंदिन्या नेत्या पुरुषांप्रमाणेंच कमी मनोहर असतात. स्त्रियांच्या डायऱ्यांत आनंद, उत्साह व क्वचित् भावनोद्रेक यांना उधाण आलेलें आढळतें. कांहीं टीकाकारांनीं इंग्रजी दैनंदिनीलेखिकांत उत्कृष्ट ठरवलेल्या फॅनी बूर्नेचीसुद्धां वरील आरोपांतून सुटका होण्यासारखी नाहीं. भूतकालीं स्त्रियांच्या शिक्षणाची आबाळ होत असल्यामुळेंहि त्यांच्या दैनंदिन्यांची संख्या कमी असेल. काळाबरोबर त्यांच्या संख्येंतहि भर पडत

आहे. एकोणिसाव्या शतकांतहि पुष्कळशा स्त्रिया डायऱ्या लिहीत हें निश्चित; त्यांच्या दैनंदिन्या आज दुर्दैवानें उपलब्ध मात्र नाहींत.

## ४७ बहिर्निष्ठ व आत्मनिष्ठ डायऱ्या

डायरीचें मूल्यमापन करण्याच्या दोन पद्धती आहेत. एक नोंदलेल्या प्रसंगावर ती किती प्रकाश पाडूं शकते यावरून, किंवा दुसरे तिच्यांत लेखकाचें व्यक्तिमत्त्व कितपत प्रगट झालेलें आहे यावरून, आजपर्यंत दैनंदिन्यांना पहिलाच निकष प्रामुख्यानें लावण्यांत आला आहे. पुरातन रोजनिशांतून तळटीपा, स्पष्टीकरणें किंबहुना इतिहासाचीं साधनेंदेखील उपलब्ध झालेलीं आहेत. त्यांच्या द्वारा कितीतरी प्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनांतील नवीं नवीं सत्यें व अज्ञात घटना प्रकाशांत आल्या आहेत व त्यांच्या व्यक्तित्वाविषयीं अभिनव व अनपेक्षित शोधहि लागले आहेत. डायऱ्यांत येणारा वैयक्तिक तपशील, घरगुती बाबी किंवा स्वतःच्या भावना किंवा इतर जिव्हाळ्याचे उल्लेख यांची टीकेंत उपेक्षणीय म्हणून वाट लावण्यांत आलेली आहे. रोजनिशांच्या छापील आवृत्त्यांवरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, ज्या भागांचा ऐतिहासिक व प्रादेशिक महत्त्वाच्या सार्वजनिक घटनांशीं संबंध असतो त्यांचीच फक्त निवड करून बाकी सर्व भाग 'खाजगी' म्हणून संपादक गाळून टाकतात. अशा रीतीनें कितीतरी डायऱ्यांचें मूळ स्वरूपच विकृत करून टाकण्यांत आलेलें आहे. वास्तविक आत्मनिष्ठ परीक्षकाच्या दृष्टीला वैयक्तिक मानला गेलेला डायरीचा भागहि अक्षरशः इतर भागाइतकाच महत्त्वाचा दिसतो. डायरींतील प्रत्येक लहानमोठा तपशील त्याच्या जीवनक्रमाशीं, त्याच्या आशाआकांक्षांशीं, त्याच्या मनाच्या गाभ्यांतील विचारविकारांशीं आपला परिचय करून देऊं शकतो. कित्येक रोजनिशांतून वर्णन केलेल्या घटनांच्या गडद छायेंत लेखकाच्या व्यक्तित्वाचा पूर्णपणे लोप होऊन गेल्यामुळें त्याचें अंतरंग नुसत्या भाषाशैलींत व टीकात्मक उद्गारांत शोधावें लागतें. उलट इतर कित्येक उदाहरणांत घटनांना फारसें महत्त्व नसल्याकारणानें लेखकाच्या अंतरंगाचेंच चित्र विशेष उठावदारपणें प्रतिबिंबित होतें.

## ४८ खाजगी डायऱ्या वाचण्यांतील न्याय्यता

प्रसिद्ध करण्याकरितां न लिहिलेल्या रोजनिशा वाचणें म्हणजे दुसऱ्याच्या खाजगी भानगडींत नाक खुपसणें, ज्यांत शिरण्याचें आपणाला थोडेंसुद्धां प्रयोजन आहे त्या आत्म्याच्या मंदिरावर हेरगिरी करणें, पडद्याआड डोकावणें किंवा लॉर्ड मोर्लेनें म्हटल्याप्रमाणें पावित्र्यविडंबन करणेंच नव्हे का असा प्रश्न विचारला जाण्याचा फार संभव आहे. वैयक्तिक आत्मनिवेदनाच्या बेसावध क्षणीं नोंदलेल्या जिव्हाळ्याच्या गौप्यस्फोटांना गुप्त विचारांना किंवा विश्वासपूर्ण उद्गारांना समाजाच्या डोळ्यांसमोर मांडणें अन्याय्य नाहीं कां! या पृथ्वीच्या पाठीवर पवित्र किंवा अविडम्बनीय असें कांहीं नाहींच का? आपणांस सोडून गेलेल्या व त्यामुळें विरोध करण्यास असमर्थ असलेल्या व्यक्तींच्या व्यक्तित्वाची चिरफाड करण्याच्या दारुण उत्सुकतेमुळें मनाची नग्नता झांकणारी अगदीं अखेरचीं वस्त्रेंसुद्धां फाडून ओरबाडून काढायचीं कीं काय? नैतिक दृष्ट्या या प्रश्नाचें उत्तर कांहींहि असो, पण हा विवेक व या शंकाकुशंका मुळीं फारच उशीरां सुचलेल्या आहेत. इष्ट असो कीं अनिष्ट असो वरील गोष्ट घडून चुकलीच आहे. प्रकाशनाकरितां न लिहिलेल्या किंवा ज्यांच्या प्रकाश्यत्वाबद्दल शंका आहे अशा कितीतरी डायऱ्या शोधून काढून व त्यांच्या लिप्या लावून आज प्रसिद्ध करूनहि टाकलेल्या आहेत. लेखकांची जर तशी इच्छा नव्हती तर त्यांनीं सावधगिरीनें स्वतःच स्वतःच्या रोजनिशांचा विनाश करण्याच्या सूचना देऊन ठेवावयाच्या होत्या. खाजगी वह्या किंवा डायऱ्या लिहिल्यानंतर लगेच त्यांच्या विनाशार्थ सूचना देऊन ठेवल्याचीसुद्धां कितीतरी उदाहरणें आहेत. कदाचित् अशा सूचनांचा अभाव हाच आपलें लिखाण कोणाच्या तरी नजरेस यावें या व्यक्त न केलेल्या परंतु अंतरीं अस्तित्वांत असलेल्या अपेक्षेचा द्योतक असूं शकेल.

वस्तुस्थिति कशीहि असो; डायऱ्यांच्या वाचनानें अनहितापेक्षां हितच अधिक होतें. आपण लेखकाच्या अघळपघळपणामुळें चकित झालों तरी

आपला त्याच्याबद्दलचा आदर तिळमात्र कमी होत नाहीं. गोपनीय किंवा अप्रकाश्य विकारांपासून आपणहि अलिप्त नसतोंच आणि म्हणून ज्याचे तसे विकार त्याच्या स्वतःच्याच सांगण्यावरून प्रसिद्ध केले गेले आहेत. त्याला दोष देण्यापासून आपणहि परावृत्त होतों.

लेखकाच्या आपणाला पूर्वींच असलेल्या माहितींत भर घालण्याचेंहि कार्य रोजनिशा करतात; कित्येकदां लेखकाच्या व्यक्तित्वाचा एखादा नवा, स्वतंत्र व क्वचित कमी प्रतीचाहि पैलू प्रकाशमान होतो; त्यामुळें त्याच्याबद्दलचें सामान्य मत बदलून जातें. इतिहासांतून एरवीं आढळणारें व्यक्तीबद्दलचें आकर्षण या गौप्यस्फोटामुळें कमी होतें याचा कित्येकांना विषाद वाटतो. परंतु माणसाचें वास्तव स्वरूप माहित होणें हेंच निश्चितपणें महत्त्वाचें आहे. त्याच्यातील दोषांच्या व वैगुण्यांच्या शोधांमुळें कदाचित् त्यांचें ऐतिहासिक स्थान खालीं ओढावें लागलें तरी त्यांत आपण त्यांना अद्भुतांतून वास्तवांतच आणीत असतों इतकेंच. त्यापायीं त्यांच्याबद्दलच्या आदराला ओहोटी लागण्याचें कांहींच कारण नाहीं. उलट त्याच्या स्वतःच्याच स्पष्टीकरणाच्या साहाय्यानें आपण त्यांच्या अधिक निकट पोहोचूं शकतों. एवढेंच मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं इतिहासांत अधिक उच्च ठरलेले नायकसुद्धां त्यांच्या डायऱ्या उघडकीस आल्यास, अतिशय दोषास्पद ठरण्याची शक्यता आहे. त्यांचा मोठेपणा त्यांच्या संपूर्ण रोजनिशीच्या साहाय्यानें त्यांचें पृथक्करण करण्याची संधि आपणांस मिळत नाहीं तोंपर्यंतच टिकूं शकतो !

## ४९ आत्मसमर्थन

दैनंदिनीलेखकाला अहेतुकपण व कदाचित् अपूर्णतयासुद्धां, परंतु स्वतःच्या कृतींचें समर्थन करणें अटळ होतें. प्रत्येक डायरींत असें स्पष्टीकरण थोडेंतरी सापडतेंच. प्रसिद्ध झालेल्या दैनंदिन्यांच्या बाबतींत हें असें स्पष्टीकरण समाजोपयोगी ठरतेंच; पण प्रसिद्ध न करायच्या डायऱ्यांतसुद्धां अधिक जिव्हाळ्याचें ज्ञान विशेष प्रभावी ठरतें. उदाहरणार्थ, एका

पितृहीन तरुणाला आपल्या वडिलांविषयीं फारच थोडी माहिती होती. त्याला योगायोगानें स्वतःच्या पित्याची डायरी सांपडली व त्यानें ती वाचली. तीवरूनच त्याला त्याच्या उदार स्वभावाची प्रचीति आली. डायरीइतकें मनमोकळें स्पष्टीकरण पुष्कळदां पत्रांतसुद्धां करतां येत नाहीं. डायरींतून मिळालेली अशी माहिती, गैरसमज व चुकीचीं मतें दूर करण्यास फारच उपयुक्त ठरते. तिच्या द्वारा सर्वांत अमोल असा सहानुभूतिपूर्ण संबंध निर्माण होण्यास मदत होते.

## ५० मानव स्वभावविषयक विचार

इतर कोणत्याहि वाङ्मयप्रकारांत न सांपडणाऱ्या अशा वैशिष्टयपूर्ण तऱ्हेनें मानवी मनाचा—वाचकाच्या स्वतःच्याच मनाचा—आविष्कार दैनंदिनींत प्रत्ययाला येतो. लेखकांचे ते अहंकार, तो बारीकसारीक गोष्टींचा अभिमान, ते आशाभंग, त्या महत्वाकांक्षा आणि ते केल्याबरोबर मोडलेले निश्चय व यांची स्वानुभवसदृश प्रतीति डायरींत येते. पावसाळे दिवस, बोथट वस्तरा, घोड्यावरून हापट्या, घरगुती कलह, दुःखपूर्ण रात्री, दांतदुखीच्या कळा, नवी पुस्तकें, उत्तम जेवण, कडाक्याची टीका, नातलगांचा ताप, मुलांचा छांदिष्टपणा, नोकरांचा छळवादीपणा, वगैरेंबद्दलच्या क्षुल्लक मानवी सुख-दुःखांत समभागी होऊन वाचक त्यांचें आकलन करून घेऊं शकतो. दा प्रासंगिक उद्गारांच्या द्वारा आपला लेखकांशीं एक तऱ्हेचा अधिक निकटवर्ती संबंध, एक प्रकारचें जिव्हाळयांचें सख्य निर्माण होतें. हें निकटचें सौहार्द मोठाल्या तात्विक व्याख्यानांनीं किंवा आपुलकीच्या पत्रांनींसुद्धां इतक्या चांगल्या प्रकारें निर्माण होऊं शकणार नाहीं. डायरींत अधिक कलात्मक व कौशल्यपूर्ण अशी कथाकृतींत न आढळणारी वास्तवता व जिवंतपणा अनुभवाला येतो. दैनंदिनीलेखक सर्वांना आवडतो, तो आपल्यासारखाच एक आहे या सर्वांत महत्वाच्या जाणिवेमुळेंच. त्याची दैनंदिनी नादिष्टपणाची असेल, हास्यास्पद असेल, अर्थशून्य असेल, किंवा कंटाळवाणी असेल—पण तो जर समाजाच्या उपयोगाकरितां एखादें स्मारक निर्माण करण्याच्या

हतूनें लिहीत असेल—तर ती निश्चितपणें तिच्या सर्व दोषांसहसुद्धां मानवीच असेल. हें मानवीयतेचें वैशिष्टय हेंच दैनंदिनीचें इतर वाङ्मयप्रकाराहून व्यवच्छेदक असें लक्षण होय.

## ५१ चांगल्या डायरीचीं आवश्यक लक्षणें

दैनंदिनी चांगली—म्हणजे परक्या वाचकाला चांगली—कशामुळें होते हें ठरविणें थोडें कठीणच आहे. ती घरांतील मंडळींना माहिती पुरवणारी किंवा स्वतः लेखकाला संदर्भ पुरवणारी ठरून लेखकाचे हेतू बहुधा पूर्ण करते. पण सामान्य वाचकाचें तेवढ्यानें समाधान होत नाहीं. नुसता नियमितपणा व पूर्णता हीं सामान्य वाचकांच्या दृष्टीनें पुरेशीं ठरत नाहींत. दीर्घकाळापर्यंत नियमितपणें लिहिलेल्या असूनसुद्धां विशेष आकर्षक नसलेल्या डायऱ्यांचीं उदाहरणें थोडींथोडकीं नाहींत. चांगल्या व वाईट दोन्हीं प्रकारच्या डायऱ्या अशा लांब मुदतीच्या व नियमित लिहिलेल्या असूं शकतात, तशाच छोट्या कालावधीच्या व त्रोटकही असतात. ज्याच्या त्याच दिवशीं केलेल्या नोंदीला, कालांतरानें व विचारपूर्वक लिहिलेल्या गोषवाऱ्यापेक्षां महत्व अर्थातच अधिक असतें. पहिल्या प्रकाराला एक तऱ्हेचा ताजेपणा व व्यक्तित्वाचा सहजस्फूर्त रंग असतो; तो कालांतरानें नाहींसा होतो. ती नोंद एकाद्या स्नॅपशॉटप्रमाणें ढोबळ, अव्यवस्थित, क्वचित सूत्ररहितसुद्धां असली, तरी भावनेची तरळती छटा तिच्यांत जशी प्रतीत होते तशी ती स्टुडियोतील फोटोप्रमाणेंच कालांतरानें लिहिलेल्या वृत्तांतांत होत नाहीं. स्मरणाच्या नाजुक फलकावरील क्षणिक भावनेचा तरळता छाप फारच लवकर नाहींसा होतो. प्रतिभेची फारशी देणगी न लाभलेला सामान्य लेखकसुद्धां त्या विशिष्ट क्षणाला भाषेची अशी एखादी चमक दाखवील कीं ती प्रतिभाशील लेखकाला सुदीर्घ मननानंतर सुद्धां साधणार नाहीं. जिव्हाळ्याचाच एक प्रकार असलेला हा साहाजिकपणा रोजनिशीला अत्यंत आवश्यक असतो. लेखकाला प्रसिद्धी-करणाची निश्चित इच्छा नसेल अगर तो शक्य तों फक्त स्वतःशींच

... वाचनालय ...



बोलत असेल तर ही स्वाभाविकता अधिक स्पष्टपणें प्रतीत होते. हीच दैनंदिनीलेखकाची, तो घटनेच्या अत्यंत निकट असल्यामुळें त्याच्यावर निसर्गतःच लादली गेलेली—इतर वाङ्मयाप्रमाणें बुद्धिपुरस्सर केलेली भाषेची समतोल रचना नव्हे तर—स्वाभाविक प्रवाही शैली. निरीक्षणशक्ति हाहि दैनंदिनीलेखकाच्या सामुग्रीचा एक घटक असून तो उत्कृष्ट स्मरणशक्ति असलेल्या लेखकाजवळ नेहमीं असेलच असें नाहीं. स्मरण व निरीक्षण ह्या सर्वस्वीं भिन्न शक्ती आहेत. निरीक्षण—पाहिलेल्या गोष्टींतील सार निवडण्याचें सामर्थ्य—ही फारच विरळ आढळणारी देणगी आहे. ज्याला ती लाभलेली असेल त्याला स्वतःच्या लिखाणांत वाचकांना गुंगवून टाकण्यांत अपयश कधींच येणार नाहीं.

अहंकारानें व आत्मनिष्ठेनें दैनंदिनीला अधिकच रंग भरतो, त्या अहंकाराला पद्धत मात्र हवी. नाहींतर लेखकाला त्याला चिकटून राहातां येत नाहीं. हेडेन आपला अहंकार शेवटपर्यंत टिकवूं शकला, तर एरवीं उत्कृष्ट डायरीलेखक असलेल्या बायरनला कांहीं महिनेसुद्धां त्याला चिकटून राहातां आलें नाहीं. स्वतःचीं मतें किंवा वृत्ति यांच्यापेक्षां वर्णन करावयाच्या घटनांचेंच महत्व ज्या लेखकाला अधिक वाटतें तो उच्च प्रतीचा मानव ठरला तरी चांगला दैनंदिनीलेखक होणें मात्र असंभवनीयच होय. दैनंदिनीच्या श्रेष्ठतेचें प्रमाण तिच्यांतील घटनांच्या महत्वाशीं व्यस्त असतें हें म्हणणें कदाचित अतिशयोक्तीचें ठरेल. पण महत्वाच्या प्रसंगांचा नुसता वृत्तांतच लिहिण्यास निघालेला लेखक कितीहि उत्कृष्ट साहित्यिक असला किंवा श्रेष्ठ प्रतीचा निरीक्षक असला तरी तो वाचकांचें मनोरंजन करूं शकेलच असें नाहीं. कांहींजण त्यांत यशस्वी होतीलही, पण पढणाऱ्यांचीच संख्या अधिक !

## ५२ डायरीलेखनसामर्थ्यविषयक गैरसमजुती

महत्वाच्या घटनांत गुंतलेल्या व मोठ्या आणि अधिकारी मंडळींचा सहवास लाभणाऱ्या व्यक्तींना उद्देशून, “ तुम्ही दैनंदिनी लिहिणें अवश्यक

आहे" असे उद्गार काढलेले नेहमीं ऐकूं येतात. त्याचप्रमाणें, "मी सार्वजनिक कामांत पडत नाहीं किंवा माझ्या महत्त्वाच्या व्यक्तींशीं गांठी-भेटी होत नाहींत." अशी टाळाटाळ करणाऱ्या व्यक्तींचें, "मी दैनंदिनी लिहीत नाहीं," हेंहि ठराविक उत्तर असतें. हीं दोन्हीं विधानें डायरी-लेखनसामर्थ्याविषयीं गैरसमजाचीं द्योतक आहेत. सामान्यतः मोठ्या माणसांच्या किंवा सार्वजनिक घडामोडींत भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या डायऱ्या त्या मानानें अप्रसिद्ध व एकमार्गी असलेल्या व्यक्तींच्या डायऱ्यांपेक्षां कमीच आकर्षक असतात. इतर वाङ्मयांत न आढळणारी डायरीची गुणात्मकता लेखकाच्या स्वतःच्याच आंतर व बाह्य जीवनांतून निर्माण होत असून ती समाजस्थितिसापेक्ष कधींच नसते.

घटनात्मक विश्वाचा वृत्तान्त ऐतिहासिक किंवा स्मारक ग्रंथांतूनच अधिक व्यवस्थितपणें देतां येतो. उलट खाजगी व आंतरिक जीवनांतील संवेदनांची जिव्हाळ्याची व वास्तवपूर्ण प्रतिमा दैनंदिन नोंद ठेवणाऱ्या निरीक्षणशील आत्मान्वेषी लेखकालाच रेखाटतां येते; स्वतःच्या आंतर जीवनाचें सुस्पष्ट दर्शन त्याला घडत असल्याकारणानें तो मानवी अनुभवांचें हुबेहुब प्रतिबिंब कागदावर वठवूं शकतो. अप्रसिद्ध व्यक्तींच्या मेळाव्यांत शांतपणें व्यतीत केलेल्या जीवनाचें चित्र रोजच्या रोज रेखाटणारा सामान्य मनुष्य, आत्मपरीक्षण व आत्मपृथक्करण यांच्या साहाय्यावांचूनसुद्धां, स्वतःच्या आत्मकथेला ज्या जिव्हाळ्याच्या पार्श्वभूमीची जोड देऊं शकेल, तो जिव्हाळा महत्त्वाच्या घटनांची तपशीलवार नोंद करतांना गोंधळून गेलेल्या लेखकाला कधींच साधणार नाहीं. डायरीची गुणात्मकता लेखकाच्या परिस्थितीवर अवलंबून असते हा हेत्वाभास प्रत्यक्ष उदाहरणें देऊनसुद्धां खोडून काढतां येण्यासारखा आहे.

## ५३ क्षुल्लक गोष्टी

लहान किंवा मोठ्या दोन्ही प्रकारच्या डायऱ्यांतून पुष्कळदां मोठमोठ्या घटनांपेक्षां क्षुल्लक गोष्टींनाच अधिक महत्व प्राप्त झालेलें दिसतें. याचा

नगर वाचनालय, सातारा.


अर्थ असा मात्र नव्हे की वाचकच चंचल मनाचे असतात. परंतु दैनंदिनी-लेखकाच्या कलेचा श्रेष्ठ उत्कर्ष तो स्वतःचें मन क्षणभर आकृष्ट करणाऱ्या घटनांचीं प्रयत्नांवांचून, मोकळेपणानें व प्रामाणिकपणानें टिपणें करीत असतो तेव्हांच होत असतो. त्यानें स्वतःच हाताळलेल्या महत्वाच्या घटनांच्या मानानें या बारीकसारीक गोष्टी कदाचित् कमी महत्वाच्या असतील; त्याच्या सार्वजनिक जीवनाच्या मानानें त्या क्षुद्र असतील किंवा त्याच्या धार्मिक विचारविवेचनाच्या मानानें कमी अर्थपूर्ण असतील; पण त्यांच्याशींच तो अधिक तादात्म्य पावूं शकतो.

## ५४ सार्वजनिक घटना व खाजगी घडामोडी

पुढील मुद्दाहि विचारार्ह आहे; राजकीय, दरबारी, लष्करी वा राजनैतिक घडामोडी फारच लवकर फिक्या पडतात, शिळ्या होतात. त्यांचें निवेदन एखाद्या महान् व्यक्तीनें केलेलें नसल्यास त्या परिणामकारकहि वाटत नाहींत. उलट खाजगी घटना व वैयक्तिक विचार यांचा ताजेपणा टिकाऊ असून, त्यांचा परिणाम कांहीं शतकांनंतरहि पहिल्या दिवसाइतकाच उत्कट असतो. या अनुभवांचा निष्कर्ष इतकाच कीं आपण लेखकांतील, धर्मोपदेशक, सेनानी किंवा साहित्यिक यांच्या नव्हे, तर मानवाच्या—जिवंत स्त्रीच्या वा पुरुषाच्या—शोधांत असतों. त्या त्या मानवी अंशाचा शोध करण्याची उत्कृष्ट संधि दैनंदिनींतच मिळूं शकते.

## ५५ उत्कृष्ट डायरीची रचना

दैनंदिन लेखन, सूक्ष्म निरीक्षण, तीक्ष्ण ग्रहणशक्ति, शक्य तितका प्रामाणिकपणा, अहंकाराचा योग्य तो साठा, प्रसिद्धीकरणाच्या इच्छेचा अभाव, आणि व्यतीत केलेल्या बारा तासांतील सुखावणाऱ्या व भडकवणाऱ्या गोष्टींची नोंद करण्याइतपत निःसंकोचपणा, किंबहुना थोडासा उच्छृंखलपणा, या गुणांच्या साहाय्यानें चांगली दैनंदिनी तयार होते असें म्हणतां येइल. याच गुणांना पेपीसच्या किंवा फील्डिंगच्यासारख्या लेखनशैलीची जोड सुदैवानें मिळाली तर एक उत्कृष्ट मानवी कलाकृति निर्माण होईल. पण

५५८
३।७।५८

विशिष्ट प्रतिभाशक्तीच्या अभावींसुद्धां केवळ वरील गुणांच्या समन्वयानेंचें मानवी अंतरंगाचें जें सखोल व विशाल दर्शन घडवितां आलें आहे तें दुसऱ्या कशानेंच साधणार नाहीं. उपलब्ध रोजनिशांत वरील सर्व लक्षणांनीं युक्त असलेली व उत्कृष्ट ठरलेली रोजनिशी पेपीसची होय.

उत्तम दैनंदिनीलेखकाच्या गुणांची वरीलप्रमाणें यादी देणें जरी शक्य असेल तरी दैनंदिनीलेखनासंबंधीं मात्र निश्चित नियम, तंत्र वा आडाखे सांगणें अयुक्त व निरुपयोगीच ठरेल. या सर्वांशीं विरोधी असूनहि एखादी डायरी उत्तम ठरेल. एखादा लेखक नियमांप्रमाणें लिहिण्याचें ठरवतो किंवा हेतुपुरस्सर वा जाणीवपूर्वक लिहूं बघतो, याचाच अर्थ तो वाचकांना खूष करण्याच्या अपेक्षेनें लिहितो! प्रसिद्धीकरणाचा नुसता हेतूसुद्धां कधींकधीं सहजस्फूर्ति नाहींशी करतो. वास्तविक सर्वांत बिनधोक उपदेश हाच कीं कोणचाहि नियम पाळूं नका; जसें सुचेल तसेंच लिहा; कोणचेंहि बंधन नको, कोणचाहि नियम नको हा एकच नियम पाळा. एखादी रोजनिशी कोणत्या तरी अज्ञात कारणामुळें खरोखरीच वाचकाला इतकी आवडते कीं तो वाचतांना त्यांतील एकसुद्धां नोंद गाळीत नाहीं. उलट दुसऱ्या एखादीचीं दोन पानेंसुद्धां क्रमानें वाचणें अशक्य होतें. डायरींत लेखनशैली महत्त्वाची नसून लेखकाचें व्यक्तित्वच महत्त्वाचें असतें. हें व्यक्तित्व स्वतंत्र, पूर्वयोजनारहित, निर्हेतुक व तंत्रबंधनमुक्त असेल तितकें बरें. मग तें आल्हादक असो कीं बोचक असो, त्याचा परिणाम डायरीच्या गुणात्मकतेवर बिलकूल होत नाहीं.

## ५६ डायरीलेखनावरील टीका

कांहीं श्रेष्ठंमन्य पुरुष अनैतिहासिक दैनंदिन्यांचा चंचल व उपेक्षणीय म्हणून अनादर करतील. ज्या व्यक्तींना अतींद्रिय मानवतेपेक्षां भौतिक घटनांचेंच महत्व अधिक वाटतें त्या त्याची रीहि ओढतील. वास्तविक प्रत्येक घटना, प्रत्येक ऐतिहासिक सत्य हें तत्त्वतः मानवी प्रवृत्तींतूनच निर्माण झालेलें असतें म्हणूनच मानवतेसंबंधीं—केवळ श्रेष्ठ नव्हे तर सामान्य

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

मानवतेसंबंधीं–ज्ञानांत भर घालणाऱ्या लहानसहान गोष्टींची उपेक्षा करून इतिहासकार, मानसशास्त्रज्ञ वा तत्त्वज्ञ, या कोणाचेंच चालणार नाहीं.

दुसरे कांहीं असाहि आक्षेप घेतील कीं दैनंदिनीलेखन–निदान त्याचे कांहीं प्रकार–म्हणजे केवळ विलोभन–बिनबोचक मंडळींच्या स्वैर क्रीडेला प्रोत्साहनच होय.

आश्चर्याची गोष्ट ही कीं, असा अतिकटु आक्षेप एका प्रसिद्ध डायरीकारानेंच घेतला आहे : एमिएल, म्हणतो" खाजगी लिखाण हें आळसाचें साहाय्यक होय. तें लेखकाला विषयांकडे सर्व बाजूनें पहाण्याच्या बंधनांतून मुक्त करतें. सर्व तऱ्हेच्या पुनरुक्तीला वाव देतें, अंतरंगांतील सर्व दुष्टपणाला व कुरकुरींना तोंड फोडतें आणि त्याला स्वतःचें असें कोणचेंच निश्चित ध्येय नसतें. तें विश्वासांतील मित्रांचें किंवा पत्नीचें स्थान बळकावतें, उत्पादक व्यवसायाची जागा पटकावतें, दुःखाची फसवणूक करण्याचें, त्यांतून निसटण्याचें किंवा पराङ्मुख होण्याचें साधन बनतें. अशा रीतीनें सर्व गोष्टींची जागा पटकावून सुद्धां तें कशाचेंच खरें प्रतिनिधी होऊं शकत नाहीं. " या टीकेनंतर एमिएलनें डायरी मात्र इतकी सुंदर लिहिली कीं तशी दुसऱ्या फारच थोड्यांना लिहितां येईल. प्रत्यक्ष लेखकाला कांहींहि वाटो, परंतु दैनंदिनी हा प्रकार हातचा घालवतांना वाचकांना निश्चित दुःख होईल.

## ५७ डायरीचीं व्यवच्छेदक लक्षणें

इतिहासांत व वाङ्मयांत रेखाटलेलें मानवाचें चित्र रंगभूमीवरील नटांचें असतें, खऱ्या मानवाचें खास नव्हे. तीं चित्रें मानवी जीवनाच्या बाहेरच्या अद्भुत विश्वाच्या अंशाप्रमाणें वाटतात. उलट जेव्हां लेखकाच्या स्वतः-च्याच शब्दावरून–इतिहासांतील भारदस्त लिखाणावरून नव्हे–तो हुबेहुब आपल्यासारखा आहे, आपल्यासारखाच रागवतो, जेवतांना आनंदतो, कुटुंबांत भांडतो, आजारी पडतो, सुखानें हर्षित होतो व मानवी जीवनांतील गुंतागुंतीनें उद्विग्नही होतो ही जाणीव वाचकाला होते तेव्हां तो लेखकाकडे

अधिकच आकृष्ट होतो. राजे, राजकारणी पुरुष, संत, कवी, सेनानी व पंडित सर्व आपल्या समान पातळीवर येतात आणि मूर म्हणतो त्याप्रमाणें, " सर्व श्रेष्ठ व्यक्तीसुद्धां त्यांच्या विश्रामाच्या व दौर्बल्याच्या क्षणीं अगदीं आपल्यासारख्याच असतात या मानवी अहंकाराचें समाधान करणाऱ्या जाणीवेनें आपणांस आनंद होतो."

## ५८ डायरी हा वाङ्मयप्रकार

दैनंदिनीगट हा वाचायला चमत्कारीक असून नेहमींच सोपा नसतो हें मान्य केलेंच पाहिजे. निश्चित माहिती देणारें साधन या नात्यानें तो शिथिल व घोटाळ्याचा आहे. पुनरुक्ति, लघुलेखन, नांवांच्या याद्या, हालचालींच्या व जन्ममृत्यूंच्या गद्य नोंदी, मधूनच तुटलेलें व फिरून उचललेलें सूत्र, अनवश्यक गोंधळ, घोटाळ्यांत पाडणारीं आणि कांहीं अंशीं अज्ञेय रहस्यें हीं वाचनाच्या ओघांत फारच अडथळे आणतात. त्याला कांहीं आकार, कलात्मकता वा व्यवस्थितपणा आणण्याचा प्रयत्न तर केलेलाच नसतो; पुष्कळ वेळां त्याला आदि व अंतहि नसल्यानें मधेंच उभा कडा तुटल्याचा भास होतो. वाङ्मयीन शैली वा कलात्मकता आणण्याचा प्रयत्नहि फारच थोड्या उदाहरणांत दृष्टोत्पत्तीस येतो. थोड्याफार मर्यादेंत कां होईना पण परिपूर्ण असलेल्या डायऱ्याहि एकंदरीनें कमीच! बहुधा त्या त्रोटक उताऱ्यांसारख्या असतात. या दोषामुळेंच दैनंदिनी हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय होत नसावा. तरीसुद्धां समकालीनांच्या रोजनिशाचें कांहीं औरच रहस्यपूर्ण आकर्षण सर्वांना वाटत असतें. रोजनिशीचें अनुकरण कथावाङ्मयांत पुष्कळ वेळां केलें जातें; कांहीं अगदींच सुमार डायऱ्यांचाहि बराच प्रसार झालेला आहे.

दैनंदिनीचा एक त्रोटक प्रकार प्रत्यक्ष रोजनिशा नसलेल्या प्रासंगिक तारीखवार नोंदींच्या स्वरूपांत आढळतो. हाहि स्वयंस्फूर्त लिखाणाचाच द्योतक असून वैयक्तिक मतांची किंवा विचारांची नोंद करण्याच्या दृष्टीनें फारच परिणामकारक होऊं शकतो. इतकें असलें तरी एकंदरींत दैनंदिनी ही

संगतवार वाचण्यापेक्षां मधून मधून वाचण्यासच अधिक योग्य असते. चरित्रकार यावर उपाय म्हणून रोजनिशांतील उतारे आधारादाखल देऊन मधले दुवे स्वतःच जोडतात व अशा रीतीनें एकंदर लिखाणाला स्वयंपूर्ण जीवनकथेचें स्वरूप देतात. परंतु पुष्कळशा दैनंदिनीलेखकांची त्यांचीं चरित्रें लिहाविशीं वाटण्याइतकी प्रसिद्धीच झालेली नसते. अशा परिस्थितींत साहाजिकच त्रोटक नोंदींवरच काम भागवावें लागतें. असा त्रोटक वृत्तांत वाचण्याच्या नैसर्गिक कंटाळयावर मात करून वाचक तो शेवटपर्यंत वाचूं शकलाच तर मात्र त्यांत मानवी मनाला आकर्षक अशा इतक्या गोष्टी आढळतील, लेखकाचें स्वभावचित्र इतक्या ठळकपणें प्रतीत होईल कीं बुद्धि थक्क होऊन जाईल ! त्यांचा आणखी एक गुण असा असतो कीं त्यांत प्रसिद्धीकरण्याच्या कल्पनेची छायासुद्धां नसते.

## ५९ विविधता व विरोध

दैनंदिनीलेखकांचा स्वतंत्र गट करणें हें कवि किंवा नाटककार यांचे स्वतंत्र वर्ग करण्याइतकेंच तर्कशुद्ध आहे. प्रत्येक डायरीलेखक स्वतःबद्दल गांभीर्यानें विचार करतो, आणि प्रत्येकाला स्वतःच्या आयुष्यांतील नोंद करण्याची, व कचित् त्यांवरील स्वतःचे विचार व मतेंहि व्यक्त करण्याची इच्छा असते. ही प्रेरणा संवय, अहंकार, शिस्तप्रियता वा अभिमान कशामुळेंहि होवो, पण या प्रेरणेमुळें त्यांच्यांत प्रत्यक्ष परस्परसंबंध निर्माण होतो हें निश्चित. यामुळेंच याहि वर्गांत किती विविधता किंबहुना आश्चर्यकारक विरोध आढळतो हें पहाणें मनोरंजक ठरेल. एकाच स्वभावधर्माच्या दोन व्यक्तींच्या डायऱ्यांत जमीनअस्मानांचे अंतर आढळेल. तसाच एकाच विषयावरील दोन दैनंदिन्यांतहि कमालीचा विरोधहि आढळतो. हा विरोध पुष्कळ वेळां भाषाशैली, लेखनपद्धति किंवा लेखकाचें व्यक्तिवैशिष्ट्य यामुळें उद्भूत झालेला नसून काळभेदापायींच केवळ त्याचा उगम होतो.

विरोधानें असो किंवा साम्यानें असो, परंतु दैनंदिन्या पुढील एक तत्त्व निश्चितपणें सिद्ध करतात. एकाच काळांतील, देशांतील, वर्गांतील किंवा

व्यवसायांतील लोकहि जीवनविषयक दृष्टिकोनाच्या बाबतींत मात्र सर्वस्वीं व मूलतःच भिन्न असू शकतात; उलट निरनिराळ्या काळांतील व व्यवसायांतील व्यक्तींजवळसुद्धां त्यांना दैनंदिनी लिहिण्यास भाग पाडणारी आत्मनिष्ठा किंवा अहंकार सारख्याच प्रमाणांत असू शकतो.

## ६० नष्ट केलेल्या डायऱ्या

पुष्कळशा दैनंदिन्या नष्ट केल्या गेलेल्या असण्याचा संभव असल्याकारणानें डायऱ्या लिहिणाऱ्यांत सुशिक्षितांचें प्रमाण किती यासंबंधीं निश्चित अनुमान काढणें दुरापास्त आहे. धर्ममठादिकांच्या चालत्या काळांत मठांतील दैनंदिन आयुःक्रमाच्या रामरगाड्यांत स्वतःला सुचलेल्या विचारांची व आलेल्या अनुभवांची नोंद तेथील विचारी व्यक्तींनीं केलेली असणें अशक्य नाहीं. परंतु मठस्थ आयुष्याचें पुसटसेंच चित्र एकट्या जोसेलिन ऑफ ब्रेकलबुडच्या दप्तरांत सांपडतें आणि तेंहि दैनंदिनीच्या स्वरूपाचें नाहींच. ठिकठिकाणचीं वाचनालयें मोठ्या प्रमाणावर जाळण्यांत आलीं आणि खेड्यांतील कागदपत्रांची निरुपयोगी घाण व अडगळ म्हणून विल्हेवाट लावण्यांत आली; यापायीं फारच थोड्या अपवादात्मक रोजनिशा आपणांस उपलब्ध होऊं शकल्या आहेत. आजसुद्धां सामान्य माणसाला स्वतःच्या आजापणजांच्या डायऱ्या केवळ वैयक्तिक, फार तर कौटुंबिक म्हणून नष्ट करून टाकाव्याशा वाटणें असंभवनीय नाहीं.

## ६१ दैनंदिनीलेखकांची मर्यादित संख्या

अशा परिस्थितींत देखील अज्ञात अशा अंधाऱ्या कोंपऱ्यांत पडलेल्या दैनंदिन्यांचीं हस्तलिखितें आपणांस खेड्यापाड्यांतून शेंकडोवारी मिळूं शकतील. परंतु तीं शोधून काढणेंच दुरापास्त—नव्हे अशक्यप्राय—झालें आहे. या व नष्ट केलेल्या सर्वच्या सर्व डायऱ्या हिशोबांत घेऊनसुद्धां असेंच म्हणावें लागेल कीं सध्यां दैनंदिनी ठेवणाऱ्यांचें प्रमाण फारच अल्प आहे. शंभर सुशिक्षित व्यक्तींची (५६ पुरुष+४४ स्त्रिया) खानेसुमारी घेतां असें आढळून आलें कीं फक्त चोवीसच (१२ पुरुष+१२ स्त्रिया)

दैनंदिनी लिहितात व ७६ (४४ पुरुष व ३२ स्त्रिया) लिहीत नाहींत. या ७६ पैकीं ३६ (११ पुरुष व २५ स्त्रिया) एके काळीं (बालपणीं किंवा विशिष्ट प्रसंगी) लिहीत असत, परंतु पुढं त्यांनीं तें सोडून दिलं. लिहिणाऱ्या २४ त तिशीच्या पुढचे १६ निघाले तर न लिहिणाऱ्या ७६ त ४९ निघाले. आतां शंभर ही संख्या निश्चित अनुमानें बांधण्यास अपुरी असली तरी ठोकळ आडाखे बसवितां येण्यास पुरेशी प्रातिनिधिक आहे. २० ते ३० टक्के लोक डायरी लिहितात असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. त्यांतहि या घटकेला तरी स्त्रियांचेंच प्रमाण जरा मोठें आहे. पूर्वीं मात्र तें निश्चित कमी होतें. शिवाय तरुण पिढीची डायरीलेखनाकडे प्रवृत्ति वृद्धांपेक्षां अधिक किंवा कमी आहे असेंहि निश्चयपूर्वक म्हणतां येण्यासारखें नाहीं. डायरीलेखन हें फक्त रिकामटेकड्या सुखवस्तु वर्गाचें काम आहे अशीहि गैरसमजूत रूढ असूं शकेल. वास्तविक पूर्वींच सांगितल्याप्रमाणें डायरीलेखनाचा फुरसतीशीं लवमात्र संबंध नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं शिक्षणपद्धतीची सदोषता व संपूर्ण अभाव यांमुळें पूर्वीं बहुसंख्य-लोकांना लिहिणें शक्य नसे; किंवा निदान त्यांना लिहिण्यास अत्यंत कष्ट तरी पडत. एकदां लेखनकला व्यक्तीव्यक्तीला सुलभ होऊन शिक्षणाचा आबालवृद्धांत व श्रेष्ठकनिष्ठांत प्रसार झाला कीं दैनंदिनी लिहिणाऱ्यांची संख्या वाढण्याचा संभव आहे असें मानण्यास पुष्कळच जागा आहे. तरीपण दैनंदिनी लिहिणें हें सर्वस्वी व्यक्तीच्या मनोवृत्तीवरच अवलंबून असल्याकारणानें त्यांच्या शेंकडेवारींत वाढ होईलच असें मुळींच नाहीं.

## ६२ प्रोत्साहनाची आवश्यकता.

सामान्यतः असें मात्र म्हणावेंसें वाटतें कीं दैनंदिनीलेखनाच्या संवयीला प्रोत्साहन देणेंच अनेक प्रकारें उपयुक्त ठरेल. लेखकानें स्वतःची संवय व प्रवृत्ति यांकडे लक्ष पुरवलें कीं झालें. त्याला निश्चित असे विधिनियम पाळण्याची थोडीदेखील आवश्यकता नाहीं. लिहावयाचें तें प्रसंगवशात् कीं नियमित, थोडक्यांत कीं तपशीलवार हें त्याच्या स्वतःच्या मनोवृत्तीवर

अवलंबून राहील. त्यानें स्वतःची डायरी प्रसिद्ध करावी वा करूं नये. त्यानें एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं अधिकाराच्या किंवा स्थानाच्या माहात्म्यामुळें किंवा अनुकूल परिस्थितीच्या साहाय्यानें त्याची डायरी महत्वाची किंवा आकर्षक ठरेलच असें नाहीं. शिवाय खरें पहातां तिच्या महत्वाचा वा आकर्षकतेचा विचार करण्याचें त्याला कारणहि नाहीं. स्वतःला उपकारक म्हणूनच त्यानें मोकळेपणानें व प्रामाणिकपणानें डायरी लिहावी. येथें त्याचें स्वतःचें काम संपलें.

## इंग्रजींमधील कांहीं प्रसिद्ध डायरीकार

इंग्रजी डायऱ्यांच्या आरंभ सहाव्या एडवर्डांच्या डायरीपासून होतो. राजघराण्यामध्यें राणी व्हिक्टोरिया व सहावा एडवर्ड या दोघांच्याच डायऱ्या उपलब्ध आहेत. एडवर्डनें आपल्या वयाच्या बाराव्या वर्षापासून डायरी लिहिण्यास आरंभ केला या गोष्टीवर कांहीं मंडळींचा विश्वास नसल्यानें त्याच्या डायरीची विश्वसनीयता कमी झाली आहे. या डायरीचा आरंभ मार्च १५४९ ला होतो. त्याच्या लिहिण्यांत राजेपणाचा डौल आहे. त्यावेळेस राजाज्ञेनें होणाऱ्या वधांचा उल्लेख त्यानें अतिशय शुष्कपणानें आणि कांहींहि मत न देतां केलेला आहे. १५५० पासून १५६३ पर्यंतची हेन्री मॅचीनची डायरी पुष्कळशी त्याचीं स्वतःची धार्मिक मतें देणारीच आहे. या डायरींत तत्कालीन प्रेतसंस्कारांची फार तपशीलवार माहिती मिळते. इंग्लंडमध्यें लोकांचें ज्यावर फार कटाक्ष आहे अशा कुलमान दर्शविणाऱ्या ध्वजादि चिन्हांसंबंधीचे उल्लेख याच्या डायरींत खूप सांपडतात. त्याच्या डायरींत लॅटिमर आणि रिडले या दोन प्रसिद्ध धर्मोपदेशकांच्या जाळण्याचा उल्लेख आला आहे. एका मांजरीला धर्मोपदेशकाचे कपडे घालून फाशी दिल्याचाहि उल्लेख आहे. जॉन डीची डायरी यापुढें येते. हा ग्रंथकार होता, परंतु त्याच्या विद्येइतकीच त्याच्यावर शकुनादिकांची मोहिनी होती. त्याच्यावर एलिझाबेथ राणीची मर्जी होती व त्यामुळें त्याच्याकडे त्यावेळचे सर्व बडेबडे लोक ज्योतिष पहाण्याकरितां येत असत. त्यांचे फार गंमतीचे

नगर वाचनालय,



उल्लेख त्याच्या डायरींत आहेत. त्याची डायरी १५७७ ते १६०० पर्यंत लिहिलेली आहे. त्यांत कुंडली करण्याकरितां आलेल्या मंडळींचे उल्लेख आहेत. घरांतील नोकरांविषयीं आणि त्याच्यां स्वतःच्या प्रकृतीविषयींहि त्यांत नोंदी आहेत. त्यापैकीं त्याचा मूतखडा नाहींसा झाल्याचा व त्यावर त्यानें जें औषध घेतलें त्याच्या नोंदीचा उल्लेख करावासा वाटतो. या वेळेस आणखी दोन डायरीकार होऊन गेले, सर फ्रॅन्सिस वाल्सिंगहॅम आणि दुसरा सर थॉमस कॉनिंग्जबी. कॉनिंग्जबीच्या डायरींत त्या वेळच्या फ्रान्स-मधल्या सुप्रसिद्ध ' रूवें ' च्या वेढ्याविषयीं लष्करी दृष्ट्या खूप माहिती दिली आहे.

सतराव्या शतकांत प्रसिद्ध डायरीकार सॅम्युएल पेपिस होऊन गेला. परंतु त्याच्याहि पूर्वी सर सिमंड्स डूएस आणि सर हेन्री स्लिंग्जबी यांच्या डायऱ्या उपलब्ध आहेत. सर सिमंड्स डूएसच्या डायरींत त्याच्या प्रमाणबद्ध डौल आढळतो. त्याच्या डायरींत इंग्लंडच्या इतिहासाला उपयोगी पडेल असा बराच भाग आहे. बेकनविषयीं हा लिहितो :—" त्याचे दुर्गुण भयंकर होते आणि त्यामुळें त्याच्या होत्या नव्हत्या त्या सर्व सद्‌गुणांवर त्याच्या दुर्गुणांची कृष्णच्छाया पसरली आहे." आपल्या आईवरचें त्याचें प्रेम आणि बापाशीं झालेलें भांडण आपल्या डायरींत तो नोंदतो. त्याच्या बायकोविषयींचे उल्लेख फार थोडे असले तरी पुत्रसंततीविषयीं त्याची निराशा त्यांत ठिकठिकाणीं आढळते. सुदैवानें त्याच्या दुसऱ्या बायकोपासून त्याला पुढें मुलगा झाला. याला आपल्या कुळाचा फार अभिमान होता आणि या कुळांतील एका प्रसिद्ध पुरुषाचें वृत्त आपल्या वंशजांनीं वाचावें अशी इच्छा त्याच्या डायरींत त्यानें व्यक्त केली आहे. सर हेन्री स्लिंग्ज-बीच्या डायरींत त्याच्या राजकीय आणि घरगुती कर्तृत्वाचा उल्लेख आहे. आपल्या लहानग्या मुलाचें शिक्षण आणि आपल्या बायकोवरचें प्रेम यांचा उल्लेख त्याच्या डायरींत वारंवार येतो. बायकोच्या आजारांत पुष्कळ डॉक्टरांना दाखवूनहि अखेर त्याची बायको मेली याविषयींचे त्याचे डायरींतील उल्लेख फार हृदयस्पर्शी आहेत. एका ठिकाणीं त्याच्या घरच्या

स्वयंपाक्यांविषयीं तो नोंद करतो. आपल्या ५।६ अव्यवस्थित स्वयंपाक्यांत एका बऱ्या स्वयंपाक्याचा उल्लेख करून तो लिहितो कीं हे लोक जेव्हां पळून जातात तेव्हां ३।४ दिवस त्यांजविषयीं कांहींच बातमी नसते ! ते निघून जात असतांना आपण त्यांना शक्य तेवढें संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा मला थोडाहि उपयोग झाला तरी मी त्यांना ठेवून घेत असे. त्यांच्या स्वयंपाकांतील नैपुण्याविषयीं आपल्याला कधींच अनुभव आला नसल्याचें तो लिहितो ! यापुढें सॅम्युएल पेपिसची डायरी कालक्रमानुसार येते.

इंग्लिश डायऱ्यांत सॅम्युएल पेपिसच्या डायरीला अग्रमान मिळाला आहे. डायरींचीं जीं महत्वाचीं लक्षणें आहेत तीं सर्व पेपिसच्या दैनंदिनींत आढळतात. असें म्हणण्यापेक्षां असें सुद्धां म्हणतां येईल कीं दैनंदिनी या प्रकारचें लक्षण पेपिसच्या डायरीवरूनच प्रथमतः ठरलें ! सार्वजनिक प्रसंगांचें निवेदन, वैयक्तिक घरगुती बाबींचें कथन आणि पूर्ण आत्माविष्करण या दैनंदिनींत आहे. यानें १६६० पासून १६६९ पर्यंत आपली डायरी लिहिली आहे व त्याचे सहा भाग आहेत. तो आपली डायरी कूटलिपींत किंवा शेल्टनच्या लघुलिपींत लिहितो ! त्यांत परभाषांचाहि गुप्ततेसाठीं उपयोग केला आहे. आपण डायरी लिहिल्याचें दुसऱ्याला सांगितल्याबद्दल त्याला झालेल्या पश्चातापाचा उल्लेख तो करतो त्यावरून आणि त्याच्या कूटलिप्यांवरून आपली डायरी कोणाच्या दृष्टीस पडावी अशी त्याची इच्छा नसावी. परंतु आपली डायरी जाळावी असेंहि त्यानें लिहून ठेविलें नाहीं हें तितकेंच खरें आहे. स्वतः त्यानें ती पुन्हां वाचल्याच्या खुणा पण आढळत नाहींत. स्वतःच्या अविवेकासंबंधींचे उल्लेख त्यानें केलेले आहेत. त्यानें सवय म्हणून डायरी ठेवली असेंच म्हणावें. त्याला विशेष भाषाशैली आहे असें नाहीं; तो गप्पा मारण्यासारखी ती लिहितो. जीवनाविषयींची लालसा हा त्याच्या लेखनाचा स्थायीभाव आहे; नाटकें, धर्म, राजकारण, चित्रकला, गायनकला, यंत्रशास्त्र, उद्यानशास्त्र, जलयंत्रस्थितिशास्त्र, ज्योतिष, अश्वारोहण, नृत्य, व्यायाम, कपडेलत्ते, भोजनपान, नानाविध विषय त्याला लेखनांत लिहावेसे वाटतात. डोळे आणि कान या दोन्ही इन्द्रियांचा उपयोग त्यानें केला आणि डायरी

लिहिली. स्वतःचें त्याचें आत्मखंडन बेताचें आहे. त्याला दुःखजनक दृश्यांची बाधा फारशी होत नसे. तो पूर्णपणें जीवनवादी होता. साधारण माणसापेक्षां त्याची कलात्मकता विशेष होती. त्याच्या डायरीवरून त्याचा पोरकटपणा, अविवेक, सर्वांचाच प्रत्यय येऊन आपण येथें आपल्यासारख्याच एका मानवाचें चरित्र वाचीत आहोंत हें पाहून समाधानच होतें. स्वतः विषयीं मतें त्यानें फार दिलीं नाहींत; पण त्याच्या तपशीलवार नोंदींवरून तर्क करणें अप्रशस्त नाहीं. स्वतःच्या आजारासंबंधीं तो फारच थोडें लिहितो. अन्नपानादिकांचा त्याचा आनंद अवर्णनीय आहे. भोजन म्हणलें म्हणजे त्याचा उत्साह उचंबळून येतो. दारू सोडण्याचा त्याचा निश्चय त्यानें नमूद केला आहे. अन्नपानाइतकीच कपड्यालत्त्याची त्याला आवड होती. नोकरचाकर, शिंपी या सर्वांविषयीं तो उल्लेख करतो. आपल्या बायकोची व आपलीं झालेलीं भांडणें अगदीं मोकळेपणानें तो लिहितो. मानवी रागलोभाचें फार हृदयंगम चित्र येथें आपल्याला पाहण्यास सांपडतें. सौंदर्यानें त्याला आकर्षण होतें. चर्चमध्यें एका तरुणीनें आपल्याला पिनांनीं कसें बोचलें व दुसरीनें आपला हात आपल्याला कसा दाबूं दिला या गोष्टींचेंहि तो वर्णन करतो! शेक्सपियरचीं नाटकें पाहिल्याचा उल्लेख त्यानें केला आहे. पिटमध्यें बसून आपण नारिंगें खात असूं हा तपशील तो लिहितो. त्याचा गायनाचा नाद हा सौंदर्यासक्ति किंवा नाट्य यांना मागें सारणारा होता. त्याच्या दरबारी वागणुकीचे अति बारीक तपशील आपल्यास उपलब्ध आहेत. त्याच्यावेळीं लंडनमध्यें झालेल्या प्लेगमधील कहराची आणि लंडनमधील अग्निप्रलयाची नोंद त्याच्या डायरींत आहे. त्याची धर्मपरता आणि पैशांविषयींची काळजी त्याच्या डायरींत स्पष्ट प्रतिबिंबित झालेली आहे. इंग्रजी भाषेत हा फार मोठा डायरीकार होऊन गेला.

जॉन एव्हेलिनची डायरी पेपिसइतकीच प्रसिद्ध आहे. पण पेपिस आणि एव्हेलिन यांचें समाजांतील स्थान अत्यंत भिन्न होतें, त्यामुळें त्यांच्या डायरीलेखनाची पद्धति, डायरीलेखनाचे हेतू, त्यांचा जीविताकडे पाहण्याचा

दृष्टिकोण या सर्वांतच फरक आहे. एव्हेलिन हा उत्तम शास्त्रज्ञानी होता. स्टुअर्ट काळांतील बऱ्याच गोष्टींची नोंद याच्या सहासष्ट वर्षांच्या डायरींत सांपडत असल्यामुळें ती डायरी त्या काळच्या इतिहासास फार साहाय्यक होते. याचें दुसऱ्या चार्लससंबंधीं फार बरें मत आहे. त्याला जर बायकांचा इतका नाद नसता तर किती बरें झालें असतें याविषयींचे त्याचे उल्लेख मर्मस्पर्शी आहेत. याच्या डायरींत यांत्रिक उपकरणें, घड्याळें, रेशमी पायमोजे विणण्याचें यंत्र इत्यादि यांत्रिक गोष्टींविषयीं खूप उल्लेख आढळतात. लंडनला २७ ऑगस्ट १६६६ मध्यें जी फार मोठी आग लागली त्याचें वर्णन त्याच्या डायरींत सांपडतें. बायकांनीं तोंडास व अंगास रंग लावावा याचा त्याला आलेला राग त्यानें आपल्या डायरींत व्यक्त केला आहे. हेन्री टेऑन्ज आपल्या डायरींत जहाजावरच्या जीवनाचें वर्णन मोठ्या उल्हासानें करतो. त्यानें आपल्या बायकोवर केलेली कविता त्याच्या डायरींत आहे. तो आपल्या खाद्याचें मोठें चटकदार वर्णन करतो. त्यानें केलेलें एका अरब बाईचें वर्णन वाचनीय आहे, त्यांत या बाईनें नाकांत घातलेल्या नथीचें वर्णन आहे.

सतराव्या शतकांत इंग्लंडमध्यें बऱ्याच डायऱ्या लिहिल्या गेल्या. जॉन मॅनिंग्हॅमच्या डायरीत तत्कालीन रीतीभाती आणि नवीन टुमी यांचें उत्कृष्ट वर्णन येतें. त्याच्या डायरींत राणी एलिझाबेथच्या मृत्यूचें वर्णन आहे. जॉन रूसच्या डायरींत उपहासपर काव्यें आहेत ! सर बुइलियम ब्रेरेटनच्या डायरींत जशीं प्रवासाचीं वर्णनें आहे, तशींच सेलिया फीएन्नेसच्या डायरींत आहेत. सीलिया तत्कालीन पार्लमेंटच्या सभासदांविषयीं लिहिते: 'त्याना ज्या गांवांतून ते पार्लमेंटमध्यें निवडून आले, त्याच्या ज्ञानाव्यतिरिक्त सर्व वस्तूविषयीं अज्ञानच असतें!' ॲडॅम आयरच्या डायरींत पुस्तकांविषयीं माहिती असून आपली बायको आपल्याशीं कशी भांडली याचें दुःखदायी वर्णन तो करतो. जाईल्स मूर आपल्या डायरींत जमाखर्चच लिहितो !! राल्फ थॉरेस्बीच्या डायरींत १६७९ मध्यें हालतीं चित्रें पाहण्यास गेल्याचा उल्लेख करतो. चित्राच्या मागल्या कळीमुळें जहाज समुद्रावर कसें चालतें, टांगा

गांवांतून बाहेर निघतांना घोडा आणि चाकें फिरतांना स्पष्ट कशीं दिसतात, किंवा चित्रांतील मनुष्य सगळ्यांना सलाम कसा करतो यांविषयीं नोंद तो करतो. डॉ. एडवर्ड राजकन्या मेरीच्या प्रिन्स ऑफ ऑरेंजशीं ( म्हणजे पुढें तिसरा वुइलियम ) झालेल्या लग्नाचें वर्णन करतोः

" नोव्हें. ४. रात्रीं नऊ वाजतां राजकन्येच्या दिवाणखान्यांत लग्न लागलें. लग्नाच्या सर्व वेळभर चार्लस ( दुसरा ) फार खूष होता; त्याच्या मनांत आपल्या बहिणीला लंडनच्या बिशपनें लग्न लावण्याच्या आंत मूल झाल्यास फार पंचाईत होईल ही चिंता होती...अकरा वाजतां परिणीत दांपत्य शयनगृहांत गेलें. "

डॉ. एडवर्डनें स्वतःची वैयक्तिक अशी फारच थोडी माहिती दिलेली दिसते; ती म्हणजे त्याच्या बायकोच्या अकालप्रसूतीचीच माहिती होय. अब्राहाम डीला प्रायम हा उत्तम लेखक आहे याची साक्ष त्याच्या डायरीवरून मिळते. त्याच्या भाषाशैलींत चित्रगुण आहेत. तो कांहीं गमतीचे चुटके डायरींत लिहितो. याच्या डायरींत सर आयझॅक न्यूटनविषयीं उल्लेख आहेत. पूर्वायुष्यांत त्याचा कल गूढविद्येकडे होता त्याविषयीं तो लिहितो. टिमोथी बुरेलच्या डायरींत चित्रें काढलेलीं आहेत. चारचाकी टांगे, दांताळीं, गवत उलटून टाकण्याचे चिमटे, लंगडीं तारवें, हॅट्स, चर्च, पारधीची बंदूक, एकचाकी गाड्या, नोकरी करणारी बाई, ( आपल्या मुलीस नवे पायमोजे आणले असतील तेव्हां ) पायमोजा घातलेला पाय, अंगरखे, घोडे, गाड्या, केरसुण्या, गाई, दारूचे किंवा पाण्याचे पेले, खिडक्या, डुकरें इत्यादि अनेक वस्तूंचीं चित्रें काढलेलीं आहेत. त्या चित्रांतील वस्तूंपेक्षां त्या वस्तू काय प्रसंगानें किंवा कारणानें काढल्या आहेत हेंच सर्वांत महत्वाचें आहे. त्याला ख्रिसमसच्या वेळीं आलेल्या देणग्यांचें उल्लेख तो करतो. जॉन मोर आपल्या डायरींत स्वतःच्या लोकमताविरुद्ध केलेल्या वर्तनाची नोंद ठेवतो. तो डायरींत कविता लिहितो; ड्रायडननें प्रेमकाव्यापेक्षां अधिक चांगलीं काव्यें लिहावींत म्हणून आपण स्वतः त्याला एक कविता लिहून पाठविल्याचाहि उल्लेख तो करतो. सेलिआ फिएन्नेस आपल्या प्रवासाची नोंद करते. संपूर्ण इंग्लंड

देशाची तरी नीट कल्पना यावी म्हणून इंग्लंडभर प्रवास करण्याची शिफारस ती सर्वांना करते.

अठराव्या शतकांत प्रसिद्ध डायरीकारांत जॉन वेस्ली, अर्ल ऑफ एग्मॅांट, फॅनी बूर्नें इत्यादि डायरीकार येतात. जॉन वेस्ली हा ६६ वर्षें डायरी ठेवतो ! याची शरीर प्रकृति फार उत्तम होती, त्यामुळें यानें लिहिलेल्या डायरींतून त्या विषयींची माहिती वाचतांना वाचकाला मोठा आनंद होत. डायरी तो लघुलिपींत, संक्षिप्त लिपींत किंवा कूटलिपींत पुष्कळ वेळां लिहितो. स्वतः वेळोवेळीं केलेल्या वागणुकीच्या नियमांविषयीं तो नोंद करतो. त्यांत कधींहि एक क्षणसुद्धां न हंसण्याविषयींचा त्याचा नियम त्यानें लिहिला आहे. आपली प्रकृति शेवटपर्यंत उत्तम कां राहिली याविषयीं परमेश्वराची अत्यंत कृपा आणि पहांटे चार वाजतां पन्नास वर्षें उठणें, सकाळीं पांच वाजतां धर्मोपदेश करणें, त्याचप्रमाणें दरवर्षी खुष्कीनें किंवा समुद्रानें कमींत कमी चार हजार पांचशे मैलांचा प्रवास करणें, अशीं चार कारणें तो देतो. त्याच्या डायरींत केवळ एकदांच त्याला आलेल्या तापाचा उल्लेख आहे. त्याच्या धर्मोपदेशांचें सर्व कार्य त्यानें नोंदलें आहे. याची या कार्यांतील चिकाटी किती जबरी होती त्याची कल्पना त्याच्या डायरीवरून पूर्णपणें येते. मोठ्या लोकांच्या माता नेहेमींच मोठ्या असतात. याच्या आईविषयीं यानें लिहिलेल्या उल्लेखांत ती शिस्तीची अत्यंत भोक्ती होती असा उल्लेख आहे. (“ मुलांच्या रडण्याचा कंटाळवाणा आवाज आमच्या घरांत क्वचितच ऐकूं येई. ”) आपल्या मुलांच्या इच्छेवर तिनें पूर्ण ताबा राखला होता. बिरेलनें तिजविषयीं असें म्हटलें आहे कीं मुलांच्या शरीरापेक्षां त्यांच्या आत्म्याकडेच वेस्लीच्या आईचें लक्ष होतें ! व्हायकाऊंट पर्सिव्हाल ( अर्ल ऑफ एग्मॅांट ) हा वॉलपोलचा स्नेही होता आणि इंग्लिश राजघराण्याशीं याचा नेहेमीं संबंध येत असे. याच्या डायरींत सार्वजानिक राजकारणाविषयींच फार नोंदी आहेत.

फॅनी बुर्नेची ( मॅडम द आर्ब्लेची ) डायरी आठ भागांत प्रसिद्ध झाली आहे. हिच्या डायरीवरून पत्रलेखन आणि डायरीलेखन यांतील संबंध

किती निकटचे आहेत याची कल्पना येते आणि या दोहोंमधला फरक कसा अंधुक होत जातो त्याचीहि साक्ष मिळते. हिची एव्हेलिना नावाची कादंबरी प्रसिद्ध आहे. पंधराव्या वर्षींच या लेखिकेनें डायरी लिहिण्यास आरंभ केला. आपली डायरी वाचायला वाचक निश्चित आहे या समजुतीनें ही डायरी लिहिली आहे. पूर्ववयांत हिचा आत्माविष्कार काहींसा अहंकाराच्या स्वरूपाचा आहे. अर्थात डायरीमध्यें अहंकार दिसणें पूर्णपणें क्षम्यच आहे. एवं जीवनभर तिच्याभोंवतीं प्रतिष्ठित आणि मातबर मंडळींचें कडेंच असे. आणि त्यामुळें तिच्या डायरींतील उल्लेखांना फारच प्रसिद्धि मिळाली हेंहि तितकेंच खरें आहे. तिच्या संवादांच्या नोंदींत तिच्या तीक्ष्ण स्मरणशक्तीची साक्ष मिळते. गंभीरपणा आणि विनोद यांचें विलक्षण मिश्रण तिच्या कांदबरींत त्याप्रमाणेंच डायरींतपण आढळतें. बुद्धिपुरःसर केलेला बनावटपणा आणि मिथ्यावर्णन यांचा आरोप जरी फॅनीवर केला नाहीं तरी कल्पकतेचा भाग कांहीं प्रमाणांत तरी या डायरींतील नोंदींतून नसेलच असें म्हणणें कठीण आहे. प्रसिद्ध डॉ. जान्सन, नट गॅरिक, बर्क, शेरिडन, राणी शार्लट यांचेशीं तिच्या झालेल्या संभाषणांचे उल्लेख फार मजेचे आहेत. तिच्या दरबारी जीवनांतील कित्येक उल्लेख अत्यंत आश्चर्यकारक आहेत. तिची लेखनशैली स्पष्ट, भरघोस, सहज, किंचित् उपहासपर व नित्य विनोदी आहे. परंतु जॉनसनच्या लिहिण्याचा परिणाम होऊन कांहीं ठिकाणीं तिची शैली शब्दावडंबर, पोकळ डौल, आढयता आणि जाडीमपणा यांनीं भरून ओसंडते आहे असें वाटल्यावांचून राहात नाहीं. दैनंदिन नोंदींत आढळणाऱ्या सहजतेपलीकडे हिचें लेखन गेल्यामुळें तिच्या डायरींत बुद्धिपुरःसरता आलेली आहे.

अठराव्या शतकांतील आणखी प्रसिद्ध डायरीलेखक म्हणजे राइट ऑनरेबल बुइलियम बुइंडहॅम हा होय. जरी लॉर्ड रोजबरीनें त्याची डायरी प्रसिद्ध झाल्यानें त्याच्या प्रतिष्ठेत आणि मोहकतेत भर न पडतां कमीपणा आला, असें आपलें मत दिलें आहे तरी हें मत जरा एकांतिक आहे, असेंच समजणें आवश्यक आहे. एका अत्यंत हुषार, विचारी, विद्याभक्तानें लिहि-

लेखी डायरी कशी असते याचा ही डायरी उत्तम नमुना आहे. नीरस नोंदींबरोबरच याचें आत्मपरीक्षण आणि गमतीचे कल्पनातरंग फार मनोरंजक आहेत. डॉ. जॉन्सनच्या प्रोत्साहनामुळें यानें डायरी लिहिण्यास आरंभ केला. याला जॉन्सनविषयीं मनस्वी प्रेम आणि भक्ति होती. आपली डायरी दर सातव्या दिवशीं बौद्धिक आणि नैतिक शिरस्ता म्हणून हा लिहितो. त्याच्या विद्येचा पसारा खूप मोठा होता. दरक्षणीं बौद्धिक उत्साह आणि व्यापार यांनीं याचें मन भरून गेलेलें असे. ग्रंथ, काव्यें, व्याकरण, गणितशास्त्र यांविषयीं याचा दांडगा व्यासंग होता. एकदां चार स्थानांची बेरीज तीन स्थानांत बिनचूक कशी करतां येईल याविषयीं दहा मिनिटें डोकें खाजवून अचूक उत्तर काढल्याचा उल्लेख तो करतो. पावसांत चालत असतांना काव्याचें भाषांतर, काव्यरचना आणि लॉगॅरिथमस यांनीं याच्या डोक्यांत गर्दी केल्याचा उल्लेख तो करतो, तर स्वतःचें चित्र सर जोशुआ रेनॉल्ड्स काढीत असतां ६८२४ ला आपण २६३२ नीं कसें गुणलें हें तो लिहितो. उतारवयांत आपल्या बुद्धीची शक्ति कमी होत आहे काय याची हा वारंवार विवंचना करीत असतो. पण या गंभीर माणसाच्या स्वभावाला विनोदाची बाजू आहे. आपलें गाणें गुणगुणणें पलीकडच्या खोलींतल्या माणसाच्या कानावर गेलें, आपण पार्लमेंटच्या बैठकीनंतर हाइडपार्कमध्यें जातांना एकमेकांवर दगड कसे फेकले किंवा सेंट जेम्स रस्त्यावर एकमेकांवर नारिंगें कशी टाकलीं हेंहि तो लिहितो. स्वतःच्या एकलकोंडेपणाविषयीं १७९० मध्यें एक उल्लेख त्यानें केला आहे. ( १७९८ त त्याचें लग्न झालें. ) त्याचें एक ऑपरेशन झाल्यावर तो मेला. त्याच्या अगोदर आपले 'दिवस आज भरले' असें तो लिहितो !

एकोणिसाव्या शतकांतील डायरी लेखकांत हेडान, बायरन, चार्लस ग्रेविल, वुइलियम कॉबेट, व्हिक्टोरिया राणी व जनरल गॉर्डान हे प्रसिद्ध आहेत. हेडॉन हा चित्रकार होता. त्याचा अहंकार वेडांतच जमा होण्याइतका होता. त्याची तत्कालीन सर्व वाङ्मयसेवकांशीं अगदीं जवळची ओळख होती. त्याच्या डायरींत, रागरंजित आणि बहकणाऱ्या जीवाचें

आत्मचरित्र आहे. त्याची प्रत्येक गोष्ट अतिरिक्त होती. त्याने प्रचंड चित्रें रंगविलीं, त्याचा अहंकार जबर होता, त्याची महत्वकांक्षा अमर्याद होती, त्याचा आनंद पराकाष्टेचा होता, त्यानें आत्मनिंदा एखाद्या वेड्यापिशया-सारखी केली, त्याचा विमनस्कपणा आत्मघातापर्यंत पोंचला होता, त्याची निराशा अपरंपार होती, त्याची मैत्री हर्षोन्मत्त असे, त्याचें शत्रुत्व कहर जबरदस्त होतें, त्याची काम करण्याची शक्ति आटोकाट व दुर्दम्य होती त्याचा आळस तितकाच दीर्घ आणि कमाळीचा होता—या सर्वांचें प्रतिबिंब त्याच्या डायरींत उमटलें आहे. परमेश्वरविषयक उद्गार असोत, स्वतःचें घर सोडावें लागलें म्हणून केलेली नोंद असो, मित्राच्यासंबंधींचें मत असो, पार्लमेंटच्या मोठ्या अधिकाऱ्यांविषयीं उद्गार असोत, सर्वच ठिकाणीं त्याचा अतिरिक्तपणा ओसंडून चाललेला दिसतो. इंग्लिटच्या खालोखाल याच्या वाङ्मयीन शक्तींचें वर्णन कीट्सचा चरित्रकार सर सिडने कॉल-विन यानें केलें आहे! याची डायरी वाचण्याची शिफारस प्रत्येक वाचकास केल्यावांचून रहावत नाहीं.

बायरन डायरीलेखनानें मानसिक विश्रांति प्राप्त होतें असें लिहितो. आपलें लेखनवाचन, मतें, जीवनविषयक संवेदना, अन्नपान, आरोग्य चित्तवृत्ती या सर्वांविषयीं तो लिहितो. त्यानें सर्कशीच्या शिकारखान्याचें केलेलें एक वर्णन फारच विलक्षण आहे; आपल्याला दंतवैद्य काय म्हणतो, आपल्या काव्याकरितां किती पैसे मिळाले, भोजनविषयक निर्बंध (सहा-बिस्किटें फक्त!) कोणते, आपली भावी पत्नी कशी आहे इत्यादि.

डोक्यांत येणार वाटेल ते विचार-सिगारेट कोणत्या उत्तम आहेत.—दररोजची झोंप, कपडे, दारू, बटनें लावणें (आणि उघडणें), या सर्वांत वेळ जाऊन निव्वळ जीवन किती उरतें याचा हिशेब, लग्नावरचे विचार (त्याचा स्पष्टपणा मोठा अवर्णनीय आहे, त्याची बायको त्याला एक वर्षा-तच सोडून गेली!), नेपोलियनचें भविष्य, स्त्रियांची संगत (मिसेस म्यूल या त्याच्या मोलकरणीविषयींसुद्धां तो लिहितो!), व्यायाम, बर्फ, तत्वज्ञान, या ना त्या सर्व तऱ्हेच्या विषयांवरच्या नोंदी त्या डायरींत आहेत. सर वॉल्टर

स्कॉटबरोबर दारु पिऊन झिंगणें आपल्याला कसें आवडतें, तेहतिसाव्या वाढदिवशीं आपण इतकें जगलों आणि तेंहि केवळ निरर्थक हे विचार, गेलेल्या वर्षावर एक हास्यकारक मृत्युलेख, नाना तऱ्हा त्याच्या डायरींत आहेत.

चार्लस ग्रेविलची डायरी इतिहासाचें साधन म्हटली पाहिजे. उत्तम भाषेंत पार्लमेंटमधील आणि राजकारणांतील सर्व गोष्टी तो तपशिलानें लिहितो. बुईडहॅमची डायरी यानें पाहिली होती; त्याच्या आत्मनिंदालेखनाचा परिणाम ग्रेविलवर झालेला आढळतो.

राणी व्हिक्टोरियाची सर्व डायरी प्रसिद्ध झालेली नाहीं. परंतु जेवढा भाग प्रसिद्ध झाला आहे त्यावरून जर कल्पना करावयाची झाली तर व्हिक्टोरिया राणीच्या काळाविषयीं ज्या सामान्य कल्पना विसाव्या शतकांत झालेल्या दिसतात त्यांचा मागमूस राणीच्या प्रत्यक्ष जीवनांत कुठेंच नाहीं. वयाच्या तेराव्या वर्षांपासून तर ब्यांयशीव्या वर्षांपर्यंत या सम्राज्ञीनें डायरी लिहिली. ही डायरी संपादित आहे हें जरी खरें असलें, जरी ती व्हिक्टोरियाची डायरी आहे म्हणूनच लोक शंकित झाले, तरी डायरी वाचल्यावर ही बाई सरळ, विशुद्ध होती, तिनें डायरींत ढोंग केलेलें नाहीं, येथें विशिष्ठ भूमिका पत्करून किंवा दांभिकपणानें कांहीं लिहिलें नाहीं हें स्पष्ट दिसतें. फॅनी बूर्नेची भाषाशैली या राणीला नसेल, विशेषणें किंवा रूपकें यांची पुनरुक्ति तिच्या डायरींत झाली असेल, पण त्याचें कारण ती फार शिकलेली नव्हती हेंच खरें. ती हेकेखोर होती, परंतु तिनें आल्बर्टवर प्रीती केल्याची जी हकीगत आहे व त्याविषयीं तिच्या डायरींत जो उल्लेख आहे त्यावरून तिनें ही डायरी मानवी भूमिकेवरूनच लिहिली हें उघड होतें. लिटन स्ट्रॅचीनें प्रत्येक पानावर येणाऱ्या मार्लबरोच्या उल्लेखाची टवाळी केली आहे; पण राणीचा त्याला काय उपाय ? डायरी लिहिणें हें तिनें कर्तव्य म्हणून केलें; तसें करणें तिला आवश्यकहि होतें. या डायरीवरून आपली डायरी लोक वाचतील ही भूमिका तिच्या लेखनामागें आहे हें नाकबूल करतां येणार नाहीं. परंतु मानवी दोष वा गुण यांना ती पारखी नव्हती याचा प्रत्यय या राणीच्या डायरीवरून येतो.

जनरल गोर्डॉनची डायरी फारशी खाजगी स्वरूपाची नाहीं. विसाव्या शतकांत फारच थोड्या डायऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. आहेत त्या बहुतेक शिपाई पेशाच्या लोकांच्या आहेत. त्यांत लॉर्ड बर्नार्ड, गोर्डॉन-लेनॉक्स, बार्बेलियन वगैरेंच्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्यासंबंधीं पूर्ण मत व्यक्त करण्याचा काळ पुढें असल्यानें इंग्रजीमधील प्रसिद्ध डायरीलेखकांविषयी ही संक्षिप्त माहिती इथेंच पुरी करतों.

## मराठी डायऱ्या

श्री. गोरे यांचें पुस्तक मराठीमध्यें एकमेवाद्वितीय असें प्रसिद्ध झालेल्या दैनंदिनीचें उदाहरण आहे. मराठींत डायऱ्या नाहींत, त्या मुद्रित झालेल्या तरी नाहींत. फार पूर्वींपासून सर्व दिवसभर प्रत्येक जातींतील माणसांची वर्तणूक कशी असावी याविषयीं अगदीं बारीक असे नियम धर्मशास्त्रादि स्मृतिग्रंथांतर्गत आहेत. वात्स्यायनाच्या कामशास्त्रांत नागरिकाची दिनचर्या दिलेली आहे; तसेंच कौटिलीय अर्थशास्त्र, मनुस्मृति, बाणाची कादंबरी इत्यादि ग्रंथांतून दिनचर्येची तपशीलवार वर्णनें आलेलीं आहेत. परंतु हा दिनक्रम म्हणजे जशी डायरी नव्हे, तशीच महानुभाव ग्रंथांतील दिनचर्या (किंवा पूजावसर, भावे, महाराष्ट्र सारस्वत, उतारा पृ. ९५–१०१ भाग १ पहा) म्हणजे डायरी होऊं शकणार नाहीं. लीळाचरित्र हा ग्रंथ घटकाभर जरी चक्रधराच्या डायरीसारखा वाटला तरी तो 'स्मृति' (मेम्वार्स) ग्रंथांत समाविष्ट होईल. त्यांत दिवसामागून दिवस चक्रधरानें काय काय केलें याची माहिती सूक्ष्मपणानें आली असून आजार, भोजनपान, चुटके, इत्यादि तपशील त्या चरित्रांत आहे. हेमाडपंती मस्तकांतून दिनचर्याविषयक मजकूर आला तरी तीं डायरींच्या स्वरुपाचीं नव्हत. नियमावली म्हणजे डायरी नव्हे ! पूर्वीं मोगलांच्या दरबारीं किंवा मराठी दरबारांतहि रोजचीं पत्रें येत. पण तीं बातमीपत्रें या सदरांत पडतील. मोगली अखबारांत ज्या मोठ मोठ्या खबरा आहेत त्या याच स्वरूपाच्या आहेत. "बादशहा दरबारीं उठल्यापासून कचेरी बरखास्त करीपर्यंत त्याची काय दिनचर्या असे

त्यांची नोंद करणारे ' अखबार ' आहेत. त्यासाठीं अखबारनवीस असत, वाकेनवीसहि असत. " असें महामहोपाध्याय पोतदार लिहितात ( खासगी पत्र, दि. १९-७-५० ). ज्याला पेशवा डायरीज म्हणून सरदेसाई नांव देतात त्यांचेंहि स्वरूप डायरी वाङ्मयप्रकाराचें नाहीं. त्यांत कांहीं हिशेबी व कांहीं व्यवहारी टिपणें आहेत. रोज लिहिलीं जात म्हणून किंवा तारीखवारीची मांडणी होती म्हणून-रोजनिशी ( निवंश्तन=लिहिणें या फारशी शब्दावरून-निशी )-त्यांना म्हणत. पण पेशवे रोजनिशांना डायरी म्हणतां येणार नाहीं; रोजकीर्द, रोजखर्डा या समासचीं प्रकारांतच त्यांचा अंतर्भाव करावा हें प्रो. पोतदार यांचें म्हणणें योग्य आहे. माधवराव रानडे यांनीं " नोट्स फ्रॉम पेशवाज डायरी " म्हणून जें लिहिलें त्यांतील डायरी या शब्दाचा अर्थ हाच आहे. तोच प्रकार वाड-पारसनीसांनीं प्रसिद्ध केलेल्या भागांचा आहे. शिवाजीकालीं लिहिलेले हिशेबी कागद थोडेसे मिळाले आहेत. परंतु पेशवेकालीन रोजखर्ड्यांप्रमाणेंच यांची वर्गवारी होईल. अलीकडील ' दिल्ली डायरी ' ला दैनंदिनीचें स्वरूप नाहींच. यावरून असें दिसतें कीं स्मृति, बातमीपत्र, रोजकीर्दी हिशेब, टिपणें, टांचणें, दिनचर्या हीं सर्व प्रकरणें डायरी या स्वरूपाचीं नव्हत.

अव्वल इंग्रजी राज्य झाल्यावर कांहीं डायरीलेखन झालें असावें; परंतु तें मुद्रणगत तर नाहींच; परंतु उपलब्धसुद्धां नाहीं. दादोबा पांडुरंग, माधवराव रानडे, तेलंग, भांडारकर, चंदावरकर, भाटवडेकर, टिळक, केळकर यांच्या डायऱ्या असल्याचें ऐकिवांत नाहींत किंवा चरित्रकारांनींहि त्यांचा उल्लेख कुठेंहि केलेला आढळत नाहीं. अभिनव भारत या ग्रंथांत ( पृ. ११७ वर ) दैनंदिन्या जाळल्याचा उल्लेख आहे त्यावरून त्या मंडळींच्या डायऱ्या होत्या हें सिद्ध आहे. तसेंच वा. म. जोशी यांना शिक्षा झाल्येच वेळीं विजापूरकरांची डायरी कोर्टांत आल्याचें ऐकिवांत आहे. श्री. रा. टिकेकर यांच्या वडिलांची डायरी होती. ती कोठें आहे तें कळत नाहीं. कांहीं वाचकांनीं त्यांतील पानें स्वतःपुरतीं फाडून नेल्याचें समजतें, इतर डायरीचा पत्ता आहे कीं नाहीं समजत नाहीं.

५५१ आ।४।८८

ल. रा. पांगारकर यांनीं आपल्या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेंत १८९४ पासून डायरी लिहिल्याचा उल्लेख केला आहे. त्यांच्या ४० वर्षांच्या डायऱ्या त्यांनीं ठेवल्या होत्या व त्यांचा उपयोग त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहितांना केला. ( चरित्रचंद्र, प्रस्तावना पृ. १२ ) ते लिहितातः " चांगला विचार कोठें आढळला, सुचला किंवा ऐकला, तर तो रोजनिशींत टिपून घ्यायचा, कांहीं महत्वाचे प्रवास, कोणाच्या गांठीभेटी, संवाद यांचीं टांचणें ठेवायचीं अशी संवय लागली. " प्रसिद्ध कवि रे. टिळक यांना डायरी लिहिण्याची संवय असावी. डायरी न ठेवल्याबद्दल केळकरांनीं आपल्या " गत गोष्टी " या आत्मचरित्रांत उल्लेख केला आहे. ( प्र. पृ. ३२–३३ ) त्यांचे मित्र कै. दादासाहेब करंदीकर यांच्या पन्नास वर्षांच्या स्मरण-वह्या असल्याचा उल्लेख त्यांच्या प्रस्तावनेंत आहे. विजापूरकर व मुंजे यांच्या रोजनिशा चोरल्या गेल्याचा उल्लेख ते करतात. खापर्ड्यांची रोजनिशी असली पाहिजे असेंहि अनुमान त्यावरून निघतें ( हृद्गत पृ. ३४ ) पण यापैकीं एकहि रोजनिशी प्रसिद्ध झालेली नाहीं !

महाराष्ट्रांतील प्रसिद्ध नाटककार कोल्हटकर, खाडिलकर यांच्या डायऱ्या असत्या तर त्यांनीं काय काय प्रकाश त्यांच्या वैयक्तिक जीवनावर पडला असता तें सांगतां येत नाहीं. परंतु जें नाहीं किंवा उपलब्ध नाहीं त्याविषयीं कल्पनातरंग करून काय मिळणार ?

रा. गोरे यांच्या डायरीनें एक नवा वाङ्मयप्रकार मराठींत येत आहे आणि त्यांना आद्य प्रसिद्ध दैनंदिनीलेखकाचा महत्वाचा मान मिळून एका नवीन वाङ्मयप्रकाराचें योग्य तें श्रेय मिळत आहे. हा डायरीप्रकार पुढें फोफावून आपल्या वाङ्मयांत भर पडावी येवढीच इच्छा सध्यां प्रकट करितां येईल.

नगर वाचनालय, सातारा.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | चूक | बिनचूक |
|---|---|---|---|
| २ | २५ | घटनाची | घटनांची |
| ४ | २५ | हृद्गत; | हृद्गत, |
| ५ | ११ | पत्रे | पत्रें |
| ६ | २१ | चिंतनशीतलची | चिंतनशीलतेची |
| ८ | १० | डायऱ्याचे | डायऱ्यांचे |
| ८ | ११ | खंडासहित | खंडानें |
| ९ | ५ | ता खेळाच | तारखेलाच |
| ९ | १० | क्रेंद्रीकरण | केंद्रीकरण |
| १२ | १८ | सधि | संधि |
| १३ | २२ | डायरी लेखकांत | डायरीलेखकांत |
| १४ | ६ | निराळाच | विरळाच |
| १५ | १२ | व्हावे | व्हावेत |
| २१ | १५ | विचारांना...होत | विचारांना...होते |
| २१ | २४ | किंव | किंवा |
| २२ | १३ | लिहावेच | लिहावेतच |
| २५ | ६ | दैनदिन | दैनंदिन |
| २५ | ७ | रोग्यांच्यां | रोग्यांना |
| २७ | १० | गभीर | गंभीर |
| २७ | २० | अर्धवट | अर्धवट |
| २९ | १ | आत्मसंशोधक | आत्मसंशोधन |
| २९ | ३ | सूष्टींनीं | गोष्टींनीं |
| २९ | १७ | प्रछन्न | प्रच्छन्न |
| ३१ | १ | वाङ्‌मयांतील | वाङ्मयांतील |
| ३५ | १६ | थडपणानें | थंडपणानें |

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | २७ | क्रीडाची | क्रीडांची |
| ३६ | ७ | चित्रदशी | चित्रदर्शी |
| ३७ | १९ | दतकथांचे | दंतकथांचे |
| ३९ | ४ | दैनंदिनी लेखकांनी | दैनंदिनीलेखकांनी |
| ४२ | ६ | नव्हे | नव्हे |
| ४२ | २० | जिवतपणाच्या | जिवंतपणाच्या |
| ४५ | १ | पुथ्वीच्या | पृथ्वीच्या |
| ४८ | ७ | स्वतः | स्वतः |
| ५५ | ११ | प्रसिद्धीकरण्याच्या | प्रसिद्धीकरणाच्या |
| ५७ | ३ | पुढ...दिल | पुढें...दिलें |
| ५९ | १२ | त्याच्या | त्याचा |
| ६१ | ६ | तपशीवार | तपशीलवार |
| ६१ | १६ | शैक्सपियरचीं | शेक्सपियरचीं |
| ६३ | ८ | दापत्य | दांपत्य |
| ६६ | ११ | भाषांतर | भाषांतर |
| ६७ | २ | महत्वाकाक्षा | महत्वाकांक्षा |
| ६७ | १२ | वाङ्मपयीन | वाङ्मयीन |
| ६८ | १० | विसव्या | विसाव्या |
| ६९ | १,३ | गोडॉर्न | गोर्डॉन |
| ६९ | १८ | (मेग्वार्स) | (मेम्वार्स) |